
# हुतात्मा दामोदर हरि चापेकर यांचे आत्मवृत्त



संपादक - वि. गो. खोबरेकर

साहित्य आणि संस्कृति मंडळ
महाराष्ट्र राज्य

अनुक्रमणिका

# हुतात्मा

# दामोदर हरि चापेकर

## यांचे

## आत्मवृत्त

संपादक
**वि. गो. खोबरेकर**

**महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृति मंडळ,**
**मुंबई.**

अनुक्रमणिका

प्रथमावृत्ती, १९७४, शके १८९६

© १९७४, महाराष्ट्र राज्य साहित्य—संस्कृति मंडळ

**प्रकाशक :**
सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य-संस्कृति मंडळ,
सचिवालय, मुंबई ३२.

**मुद्रकः**
केशव चौधरी
निदेशक,
आंतर भारती मुद्रणालय,
४२, ग. द. आंबेकर मार्ग,
वडाळा, मुंबई ४०००३१

**किंमत : रुपये ९-५०**

## अनुक्रमणिका

# अनुक्रमणिका

निवेदन ........ ५

प्रस्तावना ........ ६

चापेकर कुलवृत्तांत ........ १२

प्रारंभीचे उद्योग ........ १५

सुधारक मंडळीवर टीका ........ २८

पलटणीत रहाण्याचा प्रयत्न ........ ३७

शिवजयंती उत्सवावर टीका ........ ४३

इंग्रजी शिक्षणावर टीका ........ ५३

रयतेवर जूलुम ........ ५९

परिशिष्ट क्र. १ ........ ६८

परिशिष्ट क्र. २ ........ ६९

परिशिष्ट क्र. ३ ........ ७१

परिशिष्ट क्र. ४ ........ ७३

परिशिष्ट ६ ........ ७७

परिशिष्ट क्र. ७ ........ ७८

# निवेदन

मराठी भाषेला व साहित्याला आधुनिक ज्ञानविज्ञानाच्या व आधुनिक सांस्कृतिक मूल्यांच्या अविष्काराचे सामर्थ्य प्राप्त व्हावे, आधुनिक शास्त्रे, ज्ञानविज्ञाने तंत्र आणि अभियांत्रिकी, त्याचप्रमाणे भारतीय प्राचीन संस्कृति, इतिहास, कला इत्यादी विषयात मराठी भाषेला विद्यापीठाच्या स्तरावर ज्ञानदान करण्याचे सामर्थ्य प्राप्त व्हावे, विविध विद्या व कलांबाबत उत्कृष्ट ग्रंथांची निर्मिती करून मराठी भाषेला उच्च स्थान मिळावे या उद्देशाने महाराष्ट्र राज्य साहित्य-संस्कृति मंडळाने बहुविध वाङ्मयीन कार्यक्रम आखला असून तो व्यवस्थितपणे कार्यवाहीत आणण्याकरिता विश्वकोश समिती, इतिहास समिती, भाषांतर समिती, मराठी वाङ्मयकोश समिती, ललितकला समिती, प्रकाशन समिती आदी समित्या स्थापन केल्या आहेत.

१. मराठी भाषेला विद्यापीठीय प्रगल्भ स्वरूप व दर्जा येण्याकरिता मराठी विज्ञान, तत्त्वज्ञान, सामाजिक शास्त्रे आणि तंत्रविज्ञान या विषयांवरील संशोधनात्मक व अद्यायावत् माहितीने युक्त अशा ग्रंथाची रचना मोठ्या प्रमाणावर होण्याची आवश्यकता आहे.

२. रॅन्ड साहेबांचा खून केल्यामुळे दामोदर हरि चापेकरांना फाशीची शिक्षा झाली असता ऑक्टोबर, १८९७ मध्ये येरवडा कारागृहात त्यांनी आपली सर्व हकिकत मोडीत लिहून ठेविली. श्री. वि. गो. खोबरेकर संचालक, पुराभिलेख व पुरातत्त्व विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी सदर मोडी हस्तलिखिताचे बालबोधीकरण व संपादन करून ते प्रकाशनासाठी मंडळाच्या स्वाधीन केले. श्री. खोबरेकर यांचे मंडळ आभारी आहे.

३. हे मोडी बाड इतकी वर्षे येरवडा कारागृहात होते. ते पुस्तकरूपाने प्रसिद्ध झाल्यास मराठी वाचकास एका क्रांतिकारकाच्या मनाची तळमळ, त्यांनी आपल्या साध्याकरिता केलेली साधना या सर्वांचा परिचय होईल व त्यामुळे क्रातिकारकांवरील वाङ्मयात मोलाची भर पडेल, या उद्देशाने मंडळाने सदर ऐतिहासिक हकीकत प्रकाशित करण्याचे ठरविले. सदर हकीकत “हुतात्मा दामोदर हरि चापेकर यांचे आत्मवृत्त” या शीर्षकाने प्रकाशित करण्यास मंडळास आनंद होत आहे.

वाई :
२९ नोव्हेंबर, १९७४.
८ अग्रहायण,
कार्तिक शुक्ल १५, १८९६

**लक्ष्मणशास्त्री जोशी**
अध्यक्ष.
महाराष्ट्र राज्य साहित्य-संस्कृति मंडळ
सचिवालय, मुंबई ३२.

अनुक्रमणिका

# प्रस्तावना

इ. स. १८९७ साली पुण्यात प्लेगच्या साथीने कहर केला होता. ह्या साथीचा बंदोबस्त करण्यासाठी इंग्रज सरकारने मि. रॅन्ड, आय्, सी. एस्, आणि ले आयर्स्ट अशा दोन लष्करी अधिकाऱ्यांची नेमणूक केली. त्यांनी पुणेकरांचा अनन्वित छळ केला. त्याचा बदला घेण्याची संधी महाराणीच्या हीरक महोत्सवी समारंभाने आणून दिली.

दामोदर हरि चापेकर व बंधू बाळकृष्ण या दोन हुतात्म्यांनी परकीय ब्रिटिश सत्तेस हादरा देण्याच्या हेतूने, पुणेकरांवर जुलूम जबरदस्ती करणाऱ्या, त्यांची अब्रू घेणाऱ्या दोन उन्मत्त ब्रिटीश अधिकाऱ्यांचे २२ जून १८९७ रोजी खून पाडले. त्या भयंकर कृत्याबद्दल दोन्ही भावांस फाशी देण्यांत आले.

ह्या वर्षी व्हिक्टोरिया राणीच्या राज्यकारभाराचें ६० वें वर्ष होते म्हणून त्याचा हीरक महोत्सव ब्रिटीश साम्राज्यांत अतिशय दणक्याने साजरा होत होता. पुण्यासही गणेशखिंडीत राजभवनवर यथोचित समारंभ आयोजित केला होता. त्या समारंभात इतर अधिकाऱ्यांबरोबर रॅन्ड आणि आयर्स्ट यांनीही भाग घेतला होता.

हे दोघे अधिकारी समारंभाहून परत येत असता दामोदर हरि चापेकर आणि त्यांचे बंधू बाळकृष्ण यानी त्यांस गोळ्या घालून ठार केले. वरील भीषण कृत्य करून चापेकर आणि बंधू निमिषार्धात नाहीसे झाले. त्यांचा तपास गणेश द्रविड नांवाच्या चुगलखोराच्या सहाय्याने ब्रिटीश पोलीस अधिकारी सुपरिन्टेंन्डेन्ट ब्रोव्हिन याने लाविला. चापेकर बंधू पकडले गेले. त्यांच्यावर ब्रिटीश अधिकाऱ्यांच्या खुनाचा आरोप ठेवून कोर्टांत खटला भरण्यांत आला. ८ ऑक्टोबर १८९७ रोजी दामोदर हरिकडून हा खून करण्यास तो का प्रवृत्त झाला. त्यासंबंधीची हकीगत लिहून घेण्यांत आली त्यातूनच या आत्महकीगतीचा जन्म झाला. दामोदर हरि यांना १८ एप्रिल १८९८ रोजी सकाळी येरवडा जेलमध्ये फांशी देण्यांत आले.

दामोदर हरि यांनी लिहून ठेवलेली हकीगत मोडींत आहे. प्रत्येक बंद दोन्ही बाजूंनी पाठपोट लिहिलेला आढळतो. असे हकीगतीने भरलेले एकंदर ९६ बंद आहेत. त्यांचे चोपडे व बाड जे त्यावेळेपासून येरवड्याच्या जेलमध्ये होते ते सन १९५५ मध्यें त्यावेळच्या मुंबई शासनाच्या स्वातंत्र्य संग्राम इतिहास लेखन समितीच्या ताब्यांत आले. त्यांतील मजकुरांचे इंग्रजी भाषांतर त्यांनी प्रसिद्ध केलेल्या 'स्वातंत्र्य संग्राम इतिहासाची साधने,' भाग २, या ग्रंथांत पृष्ठे ९५५ ते १०१५ वर छापलेले आहे. ही आत्महकीगत बाळबोधीत तयार करून ती आम्ही क्रांतीवीर दामोदर हरि यांच्या शब्दात मराठी वाचकांस सादर करीत आहोत.

दामोदर हरि चापेकर यांचे घराणे मूळचे कोंकणातले. पण त्याचे वडील त्यांच्या जन्माअगोदर चिंचवडास येऊन स्थाईक झाले. दामोदर चापेकरांचा जन्म चिंचवडास झाला. तदनंतर त्यांच्या वडिलांनी पुण्यास बिऱ्हाड केले. ते सर्वजण पुण्यासच राहू लागले. रॅन्डच्या खुनाच्या वेळी दामोदर चापेकरांचे वय २७ वर्षाचे होते. त्यांचे शिक्षण मॅट्रीकपर्यंत झालेले होते. त्यांना आणखी दोन बंधू होते. त्यांच्या मागचा बाळकृष्ण त्याचे वय २४ वर्षाचे व धाकटा बंधू वासुदेव १८ वर्षाचा होता. चापेकर स्वतः कीर्तन करीत असत व त्यांचे दोन बंधू त्यांना त्यासंबंधात साथ देत असत. दामोदर आणि बाळकृष्ण या दोघांची लग्ने झालेली होती. रॅन्डच्या वधाच्या वेळी दामोदरांना एक मुलगा व बाळकृष्णास एक मुलगी होती. दामोदर लहानपणापासून शिपाई बाण्याचे होते तिघेही बंधू तालीमबाज होते आपण लष्करांत जाऊन देशसेवा करावी म्हणून आपली

अनुक्रमणिका

लष्करांत भरती होण्यासाठी दामोदरनी खूप प्रयत्न केले व पण ते सर्व प्रयत्न व्यर्थ गेले. आपले काहीतरी वैशिष्ट्य दाखविण्याकडे दामोदर हरि यांचा लहानपणापासून ओढा होता. भारताला परकीयांच्या दास्यातून मुक्त करावयाचे असेल तर प्रत्येक भारतीयाने हिंसा, क्रांति आणि शस्त्रास्त्रांची नीति आत्मसात करून घेतली पाहिजे अशी त्यांची विचारधारणा होती. हीच शिकवण त्यांनी आपल्या भावास दिली होती. त्यांचा भाऊ बाळकृष्ण याने रॅन्डला ठार मारण्याच्या कृत्यांत त्यांस सहाय्य केले होते.

दामोदर चापेकरांनी लिहून ठेवलेली हकीगत वाचल्यावर रॅन्डसाहेब कोण होता, चापेकरना त्याचा खून करण्याची प्रेरणा कशी झाली आणि त्याचा खून त्यांनी कसा केला, हे कळते.

सुरवातीसच रॅन्डसाहेबाच्या खुनाची तपशीलवार हकीगत चापेकरांनी दिलेली आहे. रॅन्डसाहेबावर ज्या रात्री गोळ्या झाडल्या त्या दिवशी सबंध दिवस हे कृत्य करण्यासाठी आपण कोणती तयारी केली, आपल्या हेतूचा सुगावा लोकांस लागू नये म्हणून कोणती काळजी घेतली आणि शेवटी आपण योजिलेल्या स्तुत्य  कृत्यास गजाननाने आपणास साहाय्य करावे म्हणून त्या सुखकर्त्याची प्रार्थना करून आपण हे सत्कृत्य करण्यास कसे निघालो व हे कृत्य कसे केले याबद्दलची साद्यंत हकीगत चापेकरांनी दिली आहे.

यापुढील निवेदनांत चापेकरानी रँड साहेबाचे गुणवर्णन केलेले आढळते.

शिवाय त्यांच्या लिखाणांत पुनरावृत्ती बऱ्याच ठिकाणी झालेली आढळते. पुनरावृत्ती झालेल्या मजकुराचे शीर्षक व मजकुर ज्या पृष्ठावर मूळ बाडांत लिहिला आहे त्याचे पृष्ठांक खाली दिले आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १० | भयंकर कृत्ये करण्याचा विचार | ४, | ७१ |
| २० | वडिलांचा व्यवसाय | ६, | ७१ |
| ३० | बापूसाहेब कुरुंदवाडकरास पत्र | ७, | ७१ |
| ४० | मुलांना शिक्षण | ९, | ७३ |
| ५० | मारुतीची स्थापना | १०, | ७४ |
| ६० | सुधारकाच्या संपादकावर हल्ला | १८, | ७४ |
| ७० | भावाचे नेपाळी गमन व आगमन | ३२, | ७६ |
| ८० | प्रो. वेलणकरावर हल्ला करण्याचा बेत | ३८, | ७५ |
| ९० | राणीच्या पुतळ्याची विटंबना | ४२, | ७६ |
| १०० | परीक्षेचा मंडळ जाळण्याचा बेत | ४८, | ७७ |
| ११० | भावे स्कूलच्या मास्तरावर मारहाण | ४९, | ७७ |
| १२० | युरोपियन माणसाचा खेळ | ५२, | ७७ |

वरील द्विरुक्तीचा मजकूर सोडल्यास दामोदर हरींनी आपल्या वडिलास पाठविलेली दोन पत्रे, नातेवाईक मंडळीची हकीगत, आपल्या तपशीलवार कुलवृत्तांत स्वतः जमविलेल्या हत्यारांचा तपशील, ही

अनुक्रमणिका

माहिती या वृत्तांतात दिलेली असून त्यावरून क्रांतिकारक आपल्या साध्याकरिता कोणती तयारी करत असे याची कल्पना येते.

चापेकर बंधूंच्या कुमार अवस्थेतील हकिगती मनोरंजक आहेत. चापेकर बंधू विद्यार्थीदशेत असता त्यांनी वडिलांसमवेत कीर्तनाच्या निमित्ताने पुष्कळ प्रवास केला. रायपूरच्या निबिड अरण्यात प्रवास करीत असतां त्यांच्या मनांत भयंकर कृत्ये करण्याचे विचार चालू होते. त्यावेळी दोघा बंधूंचे वय अनुक्रमे १५ व १२ वर्षाचे होते. या वयात त्यांना इंग्रज हे आपले कट्टर शत्रू वाटू लागले. त्या बळकट शत्रूस आपल्या घरातून म्हणजे हिंदुस्थानातून हाकलून लावण्यास स्वतःस शरीरबळ व लोकांची मदत ह्या दोन गोष्टींची आवश्यकता त्यांना वाटू लागली. म्हणून चापेकर बंधूंनी सर्वप्रथम शरीर कमविण्याकडे लक्ष पुरविले. सूर्य नमस्कारांस सुरवात करून त्यांनी दरदिवशी १२०० पर्यंत नमस्कार घालून दीड तासांत ५॥ कोस म्हणजे ११ मैलांची दौड करण्यास सुरुवात केली. ह्यामुळे त्यांना वडिलांचा रोष पत्करावा लागला. वडील हरदासी व्यवसाय करणारे होते. पण निर्मळ मनाचे होते. शरीर शिस्तबद्ध कमविण्यासाठी दामोदर हरीनी बापूसाहेब कुरुंदवाडकर यांना आपणास त्यांच्या तालीमखान्यांत ठेवण्यास विनंती केली त्यांनी नकार दिला म्हणून कोल्हापूरकरांना आपल्या सेवेचा स्वीकार करण्यास विनविले. त्यांचेकडूनही निराशा झाली. धार येथे वडिलांबरोबर कांहि कामानिमित्त ते गेले असतां तिथे त्यांनी बंदूक नेमबाजीचे शिक्षण घेतले. आपल्याला तुरुंगवास पत्करावा लागणारा हे लक्षांत ठेवून त्यांनी खडतर जीवन जगण्याची तालीम सुरू केली. आपले इप्सीत साध्य करून घेण्यासाठी मोंगलाई मुलखांतून हत्यारे जमविण्याचा उपक्रम चापेकर–बंधूंनी सुरु केला. तसेच लोक जमविण्यास सुरुवात केली. मुले जमावून त्यांस हरतऱ्हेचे व्यायाम व कवायतीचे खेळ शिकविण्यास सुरुवात केली. गोफण शिकविली, त्यांच्यासाठी मारुती दैवताची स्थापना केली. हत्यारे चालविण्यासंबंधीची व्याख्याने दिली. चापेकर जुन्याचे अभिमानी होते म्हणून त्यांनी सुधारकांवर टीकास्त्र सुरु केलें. त्याच्या लग्न वरातीवर दगडफेक करविली. जुन्या ऐतिहासिक वस्तूंचा संग्रह करण्यास साथीदारांस सांगितले. चापेकरांना क्रिकेट हा परकीय खेळ म्हणून त्या खेळाविषयी मनस्वी घृणा वाटत असे. परंपरेचे जाज्वल्य अभिमानी असल्यामुळे त्यांनी नोव्हेंबर १८९५ साली ठाकुरद्वारी जी सामाजिक परिषदेविरुद्ध सभा भरली होती तीत हिरीरीने भाग घेतला होता. राष्ट्रीय सभेचे अधिवेशन पुण्यास भरले होते त्यातील फुकट वाचाळता ऐकून चापेकरांचे मन विटले ते म्हणतात, " स्वदेशहिताकरिता स्वप्राणाची पर्वा न करिता कोट्यावधी पुण्यवान लोक समरांगणी धारातीर्थाचे ठिकाणी पतन पावतात तेव्हां स्वदेशहित होते, फुकट होत नाहीं. एवढी अक्कल या आधुनिक विद्वानांना नसावी मोठ्या दुर्दैवाची गोष्ट होय " (पृष्ठ २१). एवंच पुण्यासच राष्ट्रीय सभा झाल्यामुळे विद्वानांपैकी स्वदेशाकरितां कोण दीर्घ प्रयत्न करत आहेत हे त्यास स्वतःच्या डोळ्यांनी पहावयास सांपडले. चापेकर आपल्या आत्महकीगतीत लिहितात की जर ह्या पुढारी लोकांना परकीयांचा जुलमी प्रकार सहन होत नसेल तर त्यांनी जीव, धन, इष्टमित्र, सुत, कन्या यांची माया सोडावी व मनगटाचे जोरावर हक्क मागावे, व्यर्थ बोलण्यांत आणि लिहिण्यांत इंग्रजांवर टीका करून सक्तमजुरीच्या शिक्षेस पात्र होऊ नये (पृष्ठ २३). पण ह्या उपदेशांचा लोकांवर कांही परिणाम झाला नाही.

राष्ट्रीय सभेचे अधिवेशन संपल्यावर चापेकर बंधूनी युरोपियन मिशनरी लोकांचा पुष्कळ प्रकारांनी छळ केला. शस्त्र चालविण्याची माहिती आत्मसात व्हावी म्हणून चापेकर बंधूंनी पलटणीत नोकरीस रहाण्याचा प्रयत्न केला. युद्धकला शिकविण्यासाठी बाळकृष्ण नेपाळात जाण्यास निघाला होता, पण नेपाळांतील वागणुकीसंबंधी ऐकून तो अलाहाबादेहूनच परत आला. महाराष्ट्रांत जो शिवाजी उत्सव त्यावेळी सुरू झाला होता, त्यावरही दामोदर चापेकरांनी टीका केलेली आढळते. त्या उत्सवांत एक

प्रतिज्ञेचा श्लोक मोठ्याने म्हणून शेवट असा केला. " अरे मारिती वासरे आणि गाई महादुष्ट चंडाळ जैसे कसाई । हरा क्लेश तीचे परा आंग्ल मारा । रिकामे नका राहू भूमीस मारा । " लो. टिळकाविषयी आपले मत देताना चापेकर लिहितात की " टिळक धड सुधारकही नाहीत आणि स्वधर्मनिष्ठही नाहीत. ते म्हणतात, की " खरे स्वधर्मनिष्ठ आहेत त्यांची आम्ही गुलाम आहोत, धर्मनिष्ठ नाहीत त्यांचे आम्ही कट्टे शत्रू."

स्वदेश सेवा हे एकच ध्येय असलेल्या चापेकरांना शिवजयंती उत्सव आणि गणपति उत्सव यांतील व्याख्यानबाजी मंजूर नव्हती. कोणत्याही बाष्कळ सार्वजनिक कृत्यांत न पडतां द्रव्यप्राप्तिसाठी त्यांनी गणपतीचे मेळ्याचे बुक छापण्यास मुंबईच्या प्रेसमध्ये दिले ते पोलिसांनी जप्त केले व त्यांना पोलिस ठाण्यावर नेऊन असे कृत्य न करण्याचीं तंबी दिली. या खटल्यापासून चापेकरांनी बोध घेतला तो हा की पुन: असे पोलिसांच्या डोळ्यासमोर येण्यासारखे काम करावयाचे नाही. ह्यानंतर प्रोफेसर वेलणकर यानी धर्मांतर केले त्याचा राग येऊन चापेकर व त्यांचे मित्र साठे यांनी त्याजवर मस्तक प्रदेशी पोलादी कांबीचा जबरदस्त तडाखा मारला आणि धूम ठोकली. ह्या प्रकरणी पोलींस तपास चालू असता नामी शक्कल योजून ते त्या प्रकरणांतून सहीसलामत सुटले. या प्रकरणानंतर जय मिळणे न मिळणे हे प्रारब्धावर आहे, त्याचा संबंध आपल्या मोठेपणाशी बिलकूल नाही असे समजून इंग्रजांशी वैर करण्यास आपण कंबर बांधली असे चापेकर सांगतात. असे जे काहीतरी कृत्य करावे की जे केल्याने इंग्रजास अत्यंत वाईट वाटून राजद्रोहाचा स्पष्ट शिक्का आपल्याला मिळाला पाहिजे हा चापेकरांचा विचार. त्यासाठी त्यांनी मुंबई कोटातील आंग्लराणीच्या पुतळ्यास डांबर फासून त्याची विटंबना करण्याचे ठरविले. हे कृत्य कोणा दुष्ट प्रवृत्तीच्या व्यक्तीने केले अशी वृत्तपत्रांत खूप बोलवा झाली पण चापेकर बंधूचे नांव ह्याप्रकरणी घेतले गेले नाही.

यानंतर सन १८९५ मध्ये ग्रांथिक सन्नीपाताची साथ मुंबईस सुरू झाली. मुंबई सोडून लोक निरनिराळ्या शहरी व आपआपल्या गांवी पळून गेले. बाहेरगांवचे लोक साथीला भिवून येईनासे झाले. अशा संधीस मॅट्रिक परीक्षेचा समय आला. येथील परीक्षेसाठी भव्य मंडप कुलाब्याजवळ दरवर्षीप्रमाणे बांधला होता. रोगाची साथ क्षणोक्षणी वाढत चालली होती. निरनिराळ्या ठिकाणचे लोक परीक्षा पुढे ढकलावी म्हणून सरकारकडे विनंती करत होते. पण सरकार आपला हट्ट सोडीत नव्हते. चापेकर बंधूना हे सरकारचे अडेल धोरण अन्यायाचे वाटू लागले, त्यांनी ह्या अन्यायाचे परिमार्जन करण्याची युक्ती शोधून काढली. परीक्षेच्या मंडपास आग लावण्याचे ठरविले. आणि मंडपास आग लावण्याची कामगिरी चापेकर बंधूनी पार पाडली. मंडपाची आहुती अग्नीने घेतल्यावर सरकारला परीक्षा पुढे ढकलणे अपरिहार्य झाले. परीक्षा पुढे ढकलली गेली. राणीच्या पुतळ्यास तोंडावर डांबर फासल्याबद्दल व परीक्षेचा मंडप जाळल्याबद्दल वर्तमानपत्रे पुणेकरांचा संशय घेऊ लागली. ते वाचून व ऐकून चापेकरांना मनांतून गुदगुल्या होत. भावे स्कूलमधील समाजकंटक थोरात मास्तर यास शिक्षा दिल्यावर चापेकर बंधूंचे लक्ष रॅन्ड साहेबाने पुण्यात जे आपल्या सत्तेचे थैमान सुरू केले त्याजवर केंद्रित झालें.

चापेकर लिहितात की, पुण्यांत ग्रंथिक सन्नीपाताचा आजार वाढत चालल्याची वार्ता ऐकू येऊ लागली. सरकारने ह्या साथीचा बंदोबस्त करण्यास वाईस कामगार असलेला रॅंड साहेब, आय. सी. एस्. यास नेमले. त्याने दिनांक १७ फेब्रुवारी रोजी कामाचा अधिकार पत्करला त्यावेळी प्लेंगचा जोर पुण्यास जास्त होता; तो कमी होण्यासाठी रॅन्डने आपल्या सोजिरांच्या सहाय्याने जालीम उपाय योजण्यास सुरवात केली. लोक इस्पितळांत रोगी मुद्दामच पाठवित नाहींत म्हणून त्यांनी घराची तपासणी सक्तीने करण्याचे धोरण स्वीकारले. रोगी अथवा प्रेत दडवून ठेवल्याच्या निमित्ताने लष्करी शिपाई प्रत्येक घराची तपासणी करू लागले. घर तपासणीच्या मागोमाग दूषित घरे साफ करण्याच्या मिषाने त्यांच्यातील हव्या त्या वस्तूंची

अनुक्रमणिका

अग्नीत आहुती देऊ लागले. लोक घाबरून घरादारांस कुलुपे ठोकून बाहेर जाऊं लागले. त्यामुळे ती घरे सोजिरांनी लूटून खऱ्या अर्थाने साफ केली. रोगी किंवा प्रेत घरांत सांपडल्यास ते तर घरांतून ताबडतोब हलविण्यात येईच शिवाय त्यांच्या कुटुंबियांना सेग्रिगेशन कॅम्पमध्ये नेऊन कोंबण्यात येई. तिथे राहण्या जेवण्याची कांही एक व्यवस्था नसतांना देखील या कॅम्पमध्ये लोकांना दहा दिवस रहावे लागे. सर्व शहराला लष्कराचा वेढा असून परवान्याशिवाय राबता बंद करण्यात आला होता. या लष्करशाहीमुळे कित्येक लोकाना रात्रीच्या रात्री बाहेर काढाव्या लागल्या. घराची तपासणी करताना हे गोरे सोजिर स्त्रियांची अब्रू घेऊ लागले. या जुलूमजबरदस्तीविरुद्ध टिळक केसरीतून सरकारवर कोरडे ओढीत होतेच. राजकीय चळवळीपासून अलिप्त असलेले पण सामाजिक अन्यायाचा तीव्र प्रतिकार करणारे आगरकराचे पत्र एवढे संतापले की कायदा हातांत घेऊन लोकांनी वाटेल ते संकट सोसण्याची सिद्धता दाखवून झाल्या प्रकाराचा सूड घ्यावा असे ते उघड उघड प्रतिपादन करू लागले. आगरकरांचे संपादक आपल्या सुधाकर पत्रांत लिहितात :-

"इंग्रज सरकारचे अंमलदार इतके बेगुमान होतील असे वाटले नव्हते. घर तपासताना रँडच्या सोजिरांनी यमदूतांची वागणूक दिली ! घरांत बाळंतीण आहे ! ओढा तिला बाहेर ! डोळे दुखरे आहेत घाला गाडीत ! हा तडाखा सुरू आहे ! हे आहे काय! हा का बंदोबस्त का धुमाकूळ, का रॅन्डशाही! (सुधारक १२-४-९७) संपादक पुढील आठवड्याच्या (१२-४-९७) सुधारकांत लिहितात " इतक्या दिवस चोरीवर भागत होते, पण आतां बायकांच्या अंगावर हात टाकण्यांतहि मजल येऊन ठेपली आहे ! आणि इतके सारे प्रकार घडत असून आमचे लोक पहावे तो आपले शांत ! खरोखर आपल्या लोकांसारखे नामर्द लोक पृथ्वीच्या पाठीवर कोठेहि सापडणार नाहीत असे मोठ्या शरमेनें कबुल केले पाहिजे ! अरे तुम्ही असे अगदी नि:सत्त्व कशाने झाला? आपल्या आप्तांची अब्रू बचावण्यासाठी थोडी तरी हालचाल करा! अरे असे भागुबाई सारखे रडता का ! आडदांडास कायदा शिकवा ! .... अंगावर चालून आलेल्याचा प्रतिकार करणे, बेकायदेशीर वर्तन करणाऱ्याला कायदा किंवा हात दाखविणे हा काही गुन्हा नव्हे. माणसासारखे स्वत:च्या पायावर उभे राहा आणि दाखवा या ब्रिटीश खोडांना !"

सोजिरांचा जुलुम वाढत राहिला. त्यांची अनन्वित छळांची कृत्ये रोज ऐकायला मिळू लागली तसे संतापाच्या भरांत संपादक दिनांक १०-५-९७ च्या आपल्या सुधारकांत लिहितात, " या सगळ्यांतील इंगित एकच आहे. आमचा स्वाभिमान नष्ट झाला आहे. आणि थोडासा अवशिष्ट आहे तो हतवीर्य होऊन पडला आहे. पेटींतला पैसा गेला,.... तुमच्या काका मामास दहा-दहा जणांनी मिळून नागवे केले आणि नाचावयाला लाविले! इतके सगळे झाले तरी तुमच्या एकाच्यानेही त्याचा प्रतिकार जागच्या जागी करवला नाही हे कशाचे लक्षण! या खोंडांनी तुम्हाला आणखीही डिवचणें-तुमच्या आयाबहिणी-लग्नाच्या बायका यांची विटंबना केली-त्यांच्या अंगावर फुलें टाकिली, त्यांच्याशी पाठ शिवाशिवी केली तरी देखील तुम्ही आपले संथ ते संथच! धिक्कार असो असल्या समाजाचा!... इतका नेभळा सोशिकपणा तुमच्यात आला आहे ! मग कशाला ती बडबड? यातील अत्यंत दु:सह गोष्ट ही की इतका जूलुम चालला असता आपण इतके भित्रे की इतके नेभळे झालो आहोत" (सुधारक दिनांक १७-५-१८९७),

अशाच प्रकारचे चेव आणणारे उद्‌गार केसरीतूनही छापले जात होते हे सर्व लिखाण वाचून व लोकांचा अनन्वित छळ कॅ. रॅन्डचे सोजिर करीत असलेले पाहून चापेकरांच्या अंगाचा तिळपापड झाला. या अनन्वित कृत्याचा बदला घेण्यासाठीं सशस्त्र उठावणीचा मार्ग न्याय्य व क्रमप्राप्त आहे असे त्यांच्या मनाने घेतले. १८५७ सालीं राणी लक्ष्मीबाई, नानासाहेब पेशवे इत्यादिकांनी समरांगणावर इंग्रज सत्तेला

अनुक्रमणिका

महाराष्ट्रीयांच्या प्रतिकार बुद्धीची थोडी चुणूक दाखविली. हा इतिहास त्यांना मुखोद्‌गत होता. पर शत्रू करतां तयार ठेवलेल्या फौंजेचा उपयोग परचक्र आल्यावर कोणी  करील पण हे आमचे इंग्रज हकदार आणि त्यांची मर्दानी फौज संगिनी घेऊन अभागी झालेल्या अर्धमेल्या रयतेला सगळीकडून काबीज करून इस्पितळांत रवाना करतात. हा प्रकार रँन्ड साहेब मोठ्या खुशीने पहातो, म्हणून त्याचा जीव घ्यायचा, सोडायचा नाही असा निश्चय आपण केल्याचे चापेकरांनी नमूद केले आहे. त्यातच रॅन्ड साहेबाच्या जुलमाची पराकाष्ठा होत असता लोकांत तीव्र असंतोष झाला. तापाच्या साथीत परममित्र भुस्कुटेची आहुती पडली. या सर्व आपत्तीस रॅन्ड कारणीभूत आहे असे समजून त्याचा खून करण्याचे कृत्य चापेकरांनी कसे पार पाडले हे वर आलेच आहे.

दामोदर चापेकरांना अटक होतांच त्यांचे बंधू बाळकृष्ण हे पळून गेले. त्यांनी वेषांतर करून निजामी राज्यांत प्रवेश केला. तेथील जंगलांत त्यांनी कित्येक दिवस अतिशय हालात काढले. शेवटी त्यांचा शोध कसा लागला ही मद्रास मेल पत्राने दिलेली हकीगत अशी, " दामोदर चापेकर यांचा भाऊ बाळकृष्ण हा वानक्किबार येथे बरेच महिने बैराग्याच्या वेषात होता. तेथे लोकास मंत्र तंत्र करून रोग बरे करितो वगैरे सांगितल्यावरून तो तेथील लोकांस फार प्रिय झाला होता. त्याचे वर्णन मि. व्ही. पी. राजगोपाळ नायडू नांवाच्या एका गृहस्थाने वाचले असल्यामुळे त्यास व दुसऱ्या एका गृहस्थास या बैराग्याबद्दल शंका आली. त्यांनीं त्याची कृत्ये नीट लक्षपूर्वक काही दिवस पाहिल्यांवर तर त्यांचा संशय दृढ झाला. त्यानी त्यावरून मुख्य पोलिस ऑफिसराकडे बाळकृष्णाचे वर्णन मिळण्याविषयी अर्ज केला त्या अर्जाला उत्तर आले नाही. पण तेथील पोलिस इन्स्पेक्टरांस सदरहू बैराग्यावर  नजर ठेवण्याविषयी हुकूम झाला. १६ वे तारखेला पुण्याहून एक जमादार व एक शिपाई त्याला ओळखण्यासाठी गेले. त्यानी त्याला ताबडतोब ओळखले व त्याला लागलीच कैद करण्यांत आले. त्याजवर रीतसर खटला भरण्यांत येऊन त्यास दिनांक १२ मे १८९९ रोजी फाशी दिले.

त्यांचे दुसरे बंधू वासुदेव हरि हेही फाशी गेले. रॅन्डचा खून झाल्यावर त्याच्या खुन्याचे नांव सांगणाऱ्यास सरकारने वीस हजाराचे बक्षीस जांहीर केले. या आमिषास भुलून द्रवीड बंधूनी सरकारला चापेकर बंधूंची नांवे सांगितली. ही हकीगत वासुदेव हरीस समजतांच त्याने आपटे नांवाच्या आपल्या मित्रासह ह्या फितुरांचे त्यांना रस्त्यांत गोळ्या घालून मुडदे पाडले. ह्या कृत्याबद्दल त्यास पकडून इंग्रज सरकारने ८ मे १८९९ रोजी फाशी दिले. अशा रीतीने चौघा बंधूंनी देशासाठी हौतात्म्य पत्करले.

त्या जमान्यांत चापेकर बंधूसारखे देशप्रेमाने वेडे झालेले अनेक तरुण परकीय सत्तेस हादरा देण्यासाठी, ती खिळखिळी करण्यासाठी आपल्या जिवाची कुर्बानी करण्याच्या शर्यतींत उतरले होते. त्या तरुण साहसी वीरांनी आपले शोषण करणाऱ्या अनेक उन्मत्त परकीय सत्ताधीशांचे खून पाडले, अशी कृत्ये करताना त्यांनी आपल्या जिवाची, संसाराची पर्वा केली नाहीं. लाख मोलाचा जीव देशाच्या स्वातंत्र्यासाठी धगधगत्या अग्नीकुंडात झोकून दिला. ते सर्व अमर झाले. अशा ज्या अनेक राष्ट्रभक्तांनी आत्माहुती दिली ते त्यांचे बलिदान व्यर्थ गेले नाहीं. त्यामुळे स्वराज्य जवळ आले व मिळाले. अशा या शूरवीरांची स्मरण गाथा तरुण पिढीला स्फूर्तीदायक ठरावी.

**वि. गो. खोवरेकर**

अनुक्रमणिका

# चापेकर कुलवृत्तांत

### मूळपुरुष बाजी

विनायक बाजी चापेकर, राहणार चिंचवड. बाजी हे चिंचवड संस्थानचे कारभारी होते. विनायक हे आज चिंचवड येथे सुखवस्तु राहिले आहेत. विनायक यांस दोन कुटुंबे खालीलप्रमाणे : -

१. मोठी कासीबाई-ही विद्वांस यांची मुलगी, ठिकाण बुधवार पेठ, हुजूर पागेसमोर, इजला मुले :-

    १. हरि विनायक. हल्ली वस्ती ठिकाण ठाकुरद्वार, मुंबई व सदाशिव पेठ, पुणे, हरदास, उमर ५०.

    २. रामचंद्र विनायक. हल्ली इंदूरकडे, राजपुताना-माळवा रेल्वेकडे तारमास्तर-स्टेशन परळेकुंड, उमर ३०.

    ३. भरत विनायक. हल्ली मंडाळेश्वर, इंदूर, येथे ब्रह्मचारी होऊन आहेत, उमर ४५, लग्न जाहले नाही. तीर्थे करीत फिरतात.

    ४. गोदावरीबाई. ही इंदूरनजीक हातोळ गावी भाउसाहेब कापसे, सावकार, यांचे चिरंजीव बलवंतराव (आज कैलासवासी) याजला दिल्हेली आहे, तिची उमर ४५.

    ५. सखूताई ही इंदूर येथे, कृष्णापुऱ्याच्या मारुतीनजीक सुबरावजीचे. पिछाडीस राहणारे नारायणराव साने याजला दिल्हेली होती ती हल्ली मयत. मरतेसमयी उमर २५.

२. दुसरी बायको विनायक रानडे यांची मुलगी. ठिकाण जोगेश्वरी बोळ, पुणे. हीस मुले :-

    १. गणेश विनायक चापेकर, उमर वर्षे १८, धंदा वैद्यकीचा, राहणार चिंचवड.

    २. गोविंद विनायक चापेकर, उमर ३५, हल्ली मयत.

    ३. विष्णु विनायक चापेकर, उमर ४०, हल्ली राहणार चिंचवड, धंदा नाटकमध्ये मृदंग वगैरे वाजविणे.

    ४. लक्ष्मण विनायक चापेकर, उमर ३५, धंदा गवई, हल्ली वस्ती नाशिक.

    ५. अंबूताई ही उमरावतीस भिडे वकील यांस दिल्हेली होती. हल्ली दोघेही मयत. मरतेसमयी अंबूताईची उमर २५

अनुक्रमणिका

६. वेणूताई ही सोलापूर येथे कोल्हटकर यास दिल्हेली होती. ती मयत जाहली.

१. हरि विनायक चापेकर, उमर वर्षे ६०, यांचे कुटुंब द्वारकाबाई रामभाऊ लोंढे, ठिकाण सदाशिव पेठ, यांची मुलगी, उमर वर्षे ४८. हीस मुले :-

१. दामोदर हरि चापेकर, उमर वर्षे २७, धंदा किर्तनात बाजाची पेटी वाजविण्याचा, राहणार सदाशिव पेठ, पुणे व ठाकुरद्वार, मुंबई.

२. बाळकृष्ण हरि चापेकर, उमर २४, धंदा कितर्नात सारमंडळ वाजविण्याचा, ठिकाण मनऊर.

३. केशव हरि चाफेकर, उमर ५ वर्षे असता मयत

४. वासुदेव हरि चापेकर, उमर १८, धंदा कितर्नामध्ये टाळ वाजविण्याचा, ठिकाण मनऊर.

५. विष्णू हरि चापेकर, उमर ८ महिने असता मयत.

६. दुर्गाताई, उमर वर्षे १० असता मयत. ही तिचे वडील ग्वाल्हेर येथे असता मयत जाहली. ती दामोदर यांचेपेक्षा वडील होती.

७. येसूमाई, उमर वर्षे १४, ही विष्णू सदाशिव परांजपे यांचे पुतणे भिकाजीपंत परांजपे यास दिल्हेली. राहणार औदुंबर, पुण्यात ठिकाण बोलाईची खाण, उद्योग भावे स्कूलात शिकणे.

८. मथूताई, उमर वर्षे १२, ठिकाण नारायण गोविंद काळे, गुळवाचा वाडा, रविवार पेठ, उद्योग-न्यू स्कूलमध्ये शिकणे.

१. दामोदर उर्फ अण्णा हरि चापेकर, यांचे कुटुंब दुर्गाबाई-मेंढऱ्याचे तळे गावानजीक पिंपरी गावाचे होळकर यांची मुलगी, उमर वर्षे १७, ठिकाण डोळकर आडपत्र्या मारुतीसमोर, यांस मुले : -

१. विनायक दामोदर चापेकर, २ वर्षाचा असता मयत.

२. चिंतामण दामोदर चापेकर, उमर २ वर्षाचा असता मयत

३. धोंडी दामोदर चापेकर, उमर महिने ८

अनुक्रमणिका

२. बाळकृष्ण उर्फ बापूराव हरि चापेकर, यांचे कुटुंब नाव यमुनाबाई, साठे यांची मुलगी, साठे यांची बायको त्याजजवळ नसते. ठिकाण-सदाशिव पेठेत कासीनाथ गोविंद नातू वकील यांचे घराच्या पलिकडे, आपटे यांचे घरी. यांस मुले :-

१. गंगूबाई, उमर वर्षे ३.

२. महादेव बाळकृष्ण चापेकर, उमर वर्षे ११.

३. वासुदेव उर्फ नाना हरि चापेकर, यांचे कुटुंब सीताबाई, वासुदेव भट यांची कन्या. वासुदेव याचे ठिकाण बदामी हौदाजवळ शुक्रवार पेठ, पुणे. फॉरेस्ट अगर मोजणी खात्याकडे नोकर आहेत. कुटुंब लहान आहे, आम्ही तिघे भाऊ, बापाबरोबर किर्तनास साध्य करीत आहे.

**वडिलांचा व्यवसाय**

आमचे वडील किर्तनाचे पूर्वी कलक्टर ऑफिसात सोलापूर येथे क्लार्क होते व त्यानंतर तार ऑफिसात नोकरीस होते. ते आपल्या बापाबरोबर पूर्वी तिर्थयात्रा करून आले होते. सबब नोकरीस कंटाळून नोकरी सोडून किर्तन करण्याचा धंदा पत्करला.

अनुक्रमणिका

# प्रारंभीचे उद्योग

**आम्हां उभय बंधूंचा वृत्तांत**

शुचीनां श्रीमतां गेहे योगभ्रष्टोहि जायते ॥
तत्र तं बुद्धिसंयोगं लभते पौर्वदेहिकं ॥

आम्ही उभयता बंधु लहान असता वडीलांबरोबर किर्तनाच्या निमित्ताने पुष्कळ प्रवास केला. फिरता फिरता आम्ही नागपूर पलीकडे रायपूर म्हणून शहर आहे तिकडे आगगाडीने जात असता मार्गात जो निबिड वृक्षाछित डोंगराळ प्रदेश आहे तो आमच्या पाहण्यात आला. तो पहाता जी मनाची स्थिती जाहली ती मला अजून पूर्णपणे आठवत आहे. ज्याप्रमाणे एकाद्या गोष्टीचे एकाद्यास विस्मरण व्हावे आणि पुष्कळ दिवसांनी त्याची आठवण किंचित कारणावरून होऊन तो विस्मययुक्त होतो. तद्‌वत तो डोंगराळ प्रदेश आमच्या नजरेस येताच एकदम हा विचार मनांत उभा राहिला की ही जागा भयंकर कृत्ये करून आश्रय घेण्यास किती सोईस्कर आहे. असा विचार येऊन आम्ही उभयता बंधु त्यावेळेपासून या भयंकर कृत्याचा विचार करू लागलो.

**भयंकर कृत्ये करण्याचा विचार रायपूर कडील वृक्षाच्छित निबिड डोंगराळ प्रदेश पाहून**

या वेळेस आमचे दोघांचे वय अनुक्रमे १५ व भावाचे १२ असे असावे. हाच आमच्या मानसिक विचाराचा आरंभ होय. कोणाचा कोणासी द्वेषभाव पडण्यास काहीतरी कारण लागते पण आमचा जो या इंग्रज लोकाविषयी द्वेष जडला आहे त्याचे कारण पाहू लागल्यास जन्मीचे कांही कारण लक्षांत येत नाही. असो. ज्याअर्थी आम्हाला समंजसपणा ज्यावेळेला बिलकुल नव्हता अशा बाल्यावस्थेत इंग्रज हे आमचे कट्टे शत्रू असे मनांत येऊन तिकडे जी आमची चित्तवृत्ती गुंतून गेली याचे बीज वर लिहिलेल्या भगवती गीतेत त्या पवित्र श्लोकांत आहे असे म्हणण्यास कांही हरकत नाही. जे आम्ही उभय पोर होतो तेव्हा आमचे विचारही पोरकटच होते. ते आता आठवले म्हणजे शरम वाटते. म्हणून त्याचा उल्लेख या ठिकाणी करीत नाही. पण या ठिकाणी एवढे मात्र सांगतो की त्या पोरकट विचारांत दोन विचार मात्र खरे ठरले. म्हणून उल्लेख मात्र करतो. आम्ही जाणून होतो की आपल्या घरात शिरलेल्या जबरदस्त चोरांना हाकलून लावावयास मुख्यतः शरीरबळ स्वतः अनुकूल पाहिजे. दुसरे घरधनी होऊन बसलेल्या बंडखोरास दे माय धरणीठाय करण्यास पुरेशी लोकांची मदत हे दोन्ही विचार त्या वेळेच्या पोरकट विचारांत खरे महत्वाचे असल्यामुळे बाकीच्या सर्व विचारांचा लय होऊन हे दोन विचार मात्र शेवटपर्यंत आमच्या हृदयांत खेळत होते.

## घरांत शिरलेल्या चोरांस (इंग्रजांस) हाकलून लावण्यास मुख्यतः स्वतःचे शरीरबळ व लोकांची मदत यांची गरज

आम्ही लहानपणापासून शरीरबळाची किंमत जाणून ते प्राप्त करून घेण्यास आम्ही उभयता बंधु अहर्निशी प्रयत्न करून लागलो. आमच्या वडिलांनी आम्हास संस्कृत विद्या शिकविण्याचे मनांत आणून त्यांनी अमरकोश रूपावली, रघु, किरात वगैरे काव्ये शिकविण्यास आरंभ केला व उदर भरण्यास स्वतंत्र असा धंदा म्हटला म्हणजे वैद्यशास्त्र हा होय असा विचार वडिलांनी करून आम्हा उभयता बंधूना शिकविण्यास त्यांनी आरंभ केला. पण जोपर्यंत आम्ही लहान होतो तोपर्यंत त्यांच्या धाकाने जो अभ्यास झाला तो झाला. पुढे आमचे मन आमच्या इष्ट कार्याविषयी स्वैर विचार करू लागले. तेणेकरून अभ्यासाक़डे साहजिकच दुर्लक्ष होऊन आम्ही वडिलांचे मनांतून उतरत चाललो.

## शरीर कमावण्याकडे लक्ष

प्रथमतः आम्ही शरीरबळाकडे वळलो. आम्ही जोर बैठका मारण्याची संवय ठेऊ लागलो. ते आमचे कृत्य वडिलास समजे तेव्हा ते त्याबद्दल आम्हाला फार रागे भरत. आमचे लंगोट कित्येकदा जाळूनही टाकले. असा त्यांचा निषेध पाहून आम्ही व्यायामाची दिशा बदलली की जोर बैठकीच्या ऐवजी सूर्य नारायणास नमस्कार घालावयाचे सुरु केले. ते धर्मकृत्य असल्यामुळे वडिलांस नको म्हणता येईना. तरी जेव्हा आमचे नमस्कार बाराशेपर्यंत वाढले तेव्हा वडील कुरकुर करु लागले की नमस्कार घालणे ते किती याला लिमिट आहे की नाही पण या त्यांच्या ओरडीकडे विशेष लक्ष दिले नाही आणि शरीर सुदृढ करण्याचा प्रयत्न जारीने चालू ठेविला. पुढे माझा बंधु बाळकृष्ण उर्फ बापूराव यानी तालमीचा व्यायाम, कुस्ती वगैरे करण्याकडे त्याने विशेष जोर लाविला. मी मात्र नमस्कार व दौड हे दोन्ही व्यायाम पसंत करून त्याच्या नादी लागलो.

## जोर-बैठका दौड व्यायाम

मी नमस्कार १२०० पर्यंत आणिले आणि दौड एक तासांत ५॥ (साडेपांच) कोस म्हणजे ११ अकरा मैलाप्रमाणे चढविले. माझ्या बंधूची माझ्यापेक्षा ताकत जास्त आहे. मी पुण्यास असलो म्हणजे दररोज पहाटे ५ वाजाता उठून तो मी दौड करण्यास निघत असे. लकडी पुलाकडून खडकी स्टेशनपर्यंत मी जाऊन येत असे. कधी चिंचवडासही जात होतो. पुण्यापासून खडकी मार्गे चिंचवड हे ११ मैल आहे. अशी घरगुती गुप्त मेहनत आम्ही करीत असल्यामुळे तिचा परिस्टफू लोकात होत नसे. मात्र आमचे शरीर लोकास सांगत असे की मी शरीरबलानी अभिमानी आहे तेणेकरून पुण्यात असले पुष्कळ आमचे समवयस्कर ब्राह्मण मित्र आमच्याशी अप्रत्यक्ष रीतीने द्वेष करून लागले पण आमचे थोर मन त्याचा किंचितही विचार करीत नव्हते मात्र तो त्यांचा द्वेषाग्नि जर आपणास जाळू लागला तर मात्र त्याचा प्रतिकार करणे आम्हास जरूर आहे असे समजून आम्ही तयार रहात होतो. क्वचित प्रसंगी त्याचे आमचे तंटेही जाहले पण ते महत्वाचे नसल्यामुळे त्याचा उल्लेख यास्थळी करून जागा अडवीत नाही. आमच्या माझ्या भावाला अनुसरूनच परमेश्वरांनी आम्हाला वडील मातुश्रीची जोड दिली किंवा असे म्हणण्यापेक्षा बिजधर्माप्रमाणे आम्ही अंकुरही तसेच उदयास आले असे म्हणण्यास काही हरकत नाही.

अनुक्रमणिका

**वडिलांच्या हरिदासी धंद्याचे वर्णन**

माझे वडील हरिदास होते इतके कानी येताच कित्येक लोकास इतर हरिदास मंडळी मनांत येऊन ते आमची किंमत कमी करतील म्हणून माझ्या वडिलांच्या हरिदासी धंद्याचे येथे वर्णन करणे जरूर आहे. माझ्या वडिलांनी कांही वर्षामागे इंग्रजाची नोकरी करून नंतर ते पराधीनपणास कंटाळून स्वार्थ आणि परमार्थ मार्गास लागले. असा हा किर्तनाचा धंदा त्यांनी स्विकारला. मात्र या धंद्यांत जे निंध्य प्रकार इतर हरिदास मंडळीत दृष्टीस पडतात की ज्यामुळे हरिदासी धंदा वाईट गणला जातो. तो प्रकार आमच्या वडिलांच्या ठिकाणी बिलकुल नव्हता असे शोध केल्याअंती सर्वास कबूल करणे भाग आहे. माझे वडील कोणाच्याही घरी जाऊन माझी कथा करा असे म्हणत नसत. परघराचे ठिकाणी त्यांची दृष्टी मातृसमान असे हे दोन गुण हरिदास मंडळीत आढळून येत नाही. तेणे करून ते जगांत किंमतीस उतरले. कथेत लोकास उपदेश करावयाचा की यांच्या म्हणजे दारोदार फिरुन तोंड वेंगाडणे हे पाप आहे आणि स्वतः आपण गांवोगाव आणि दारोदार फिरून महाराज, मी अमुक गावाचा हरिदास आहे, माझी कथा कर असे म्हणून ईश्वर नामाची विक्री करायची परस्त्रीनेत्राने अंध लोभ करणारे पाप आहे असे कथेत प्रतिदाखल करायचे आणि स्वतः शतशहा धर्मढोंगाखाली लोकांच्या डोळ्यात धूळ फेकून त्यांना अनीतिमार्गास लावायाच्या. हरहर परमेश्वर त्यांना जरा गती देवो. लिहिण्यास कारण माझ्या वडिलांचे ठिकाणी हे दुर्गुण नसलेमुळे ते लोक प्रितीस पात्र असत. दुसरे ते किर्तनाचे ठिकाणी गुणसंपन्न मोहक आणि जनचिताचे आकर्षण करित असत. त्यात अज्ञानाचे रंजनाचे काम आम्ही उभयता बंधू आपण कुशलतेने करीत होतो. तेणे करून आमची कथा लोकमान्य होऊन आमच्या कथेस लोकांची फार फार गर्दी होत असे. आमचे वडील जरी कोणाचे घरी जात नसत तरी गुणी लोक घरी वडिलांस येऊन आमंत्रण करीत आमचे वडील तसेच आम्हीही निःस्पृहपणे जगात संचार करीत होतो. असे आमचे निःस्पृह वर्तन पाहून आमचे आप्त इष्टमित्रसुद्धा आमचा द्वेष करीत व म्हणत की बाप आहे तोपर्यंत यांची निःस्पृहता पुढे यांचे हाल कुत्रे पाहणार नाही. असे म्हणण्याचे कारण आम्ही पोट भरण्याचा कांही एक धंदा शिकलो नाही. तेव्हा वडिला पाठीमागे दारोदार भिक मागण्याखेरीज दुसरा उपाय नाही. मग निःस्पृहता आणि बेपर्वा हे कोणीकडे जाईल. असा त्यांचा भावार्थ पण आमचे मन किती थोर व दिलदार आहे याची परीक्षा त्यांना नसल्यामुळे ते असे बडबडतात असे समजून आम्ही त्यांच्याकडे दुर्लक्ष करीत होतो. अस्तु. आमच्या धंद्याची परीक्षा चाणाक्ष वाचकास सहज कळून येईल म्हणोन जास्त न लिहिता प्रमुख विषयाकडे वळतो.

लहानपणी यद्यपी आम्हाला हा नाद आहे तरी या गोष्टी अशा असल्या तरी अवांतर सामुग्री आमच्याजवळ नसल्यामुळे मुदतीत मिळण्याचा संभव नव्हता. म्हणून त्यावेळेस एवढेच आमच्या पहाण्यात होते की शरीरबल वाढवावयाचे त्याप्रमाणे ते आम्ही जारीने चालविले होते व मंडळी जमविण्याकरिता ही प्रयत्न करू लागलो. पण वय लहान असल्यामुळे आमचे तेज लोकांवर पडेना. जसजसे आम्ही मोठे होऊन लागतो तसे आमचे मनही या कर्माविषयी मोठे होऊ लागले. प्रथमतः आम्हाला असे वाटले की आपण या युद्धकलेत प्रवीण जाहले पाहिजे. असे समजून आम्ही त्याकरिता यत्न करू लागलो. पण आपले या इंग्रजी अंमलात निशस्त्र प्रजा असलेमुळे आम्हाला इकडे सिकणे घडले नाही. मग आम्ही असा विचार केला की, एकदा हिंदुस्तानांत सिकण्याची सोय जाहली तर पहावी असा विचार मनांत आणून आम्ही एक पत्र बापूसाहेब कुरंदवाडकर यांना एक बहुमान पुरःसर पत्र पाठविले. त्याची प्रत आम्ही ठेविली नाही पण त्या पत्राचा सारांश येणेप्रमाणे होय.

## बापूसाहेब कुरंदवाडकरना तालीमखान्यांत ठेवण्याविषयी पत्र

श्रीमंत राजश्री बापूसाहेब कुरंदवाडकर यांस पत्रलेखन उद्देश. परमेश्वराने सर्व गोष्टी एके ठिकाणी ठेवल्या नाहीत. कोठे कांही, कोठे कांही. जे लोक धनकनकसंपन्न आहेत त्यांना मनासारखे थोर विचार मनांत येत नसून ते कांहीतरी भिकार छंद करून आपल्या कुळांला कलंक लावितात आणि मजसारख्या गरीबास नाहीते श्रीमंती पण स्तुत्य कृत्य करण्याची आवड होते. यावरून ब्रह्मदेवाची प्रवृत्ती सर्व ठिकाणी सर्व गुण ठेवण्याची दिसत नाही ॥ उत्तपद्येते विलियंते दरिद्रनाम् मनोरथः ॥ याप्रमाणे आमची स्थिती असल्यामुळे आम्ही आपणास जरा तसदी देत आहे.प्रागजन्माप्रमाणे आम्हाला युद्ध कलेची फारच आवड आहे. पण अनेक कारणाने ती कला आम्हाला याठिकाणी प्राप्त होणे कठीण आहे. करीता विनंती करतो की आपण आमचे स्वजातीय आहांत, धनकनसंपन्न आहांत. चार जुने युद्धकलानिपुण लोक आपल्या पदरी आहेत. तरी कृपा करून बंधूस निदान वर्षसहा महिने भोजनाची तजवीज करून सिकविण्याची सोय केल्यास आम्ही फार आपले आभारी होऊ. आमच्या घरी ईश्वराने पोटास कांही कमी केले नाही पण केवळ हा नाद असल्यामुळे ही याचना केली आहे ती व्यर्थ होऊ नये ही विनंती. याप्रमाणे पत्राचा सारांश होता.

## त्यांचा नकार

याचे उत्तर थोडक्यात आले की सध्या आमच्या येथे ही सोय होणार नाही. हे उत्तर ऐकून मी याची किंमत केली. अहा, कोणीकडे याचे शूर वीर उदार वाडवडील आणि कोणीकडे यांचे हे निबळ वंशज कि ज्याच्या कृतीने वाडवडलांस कलंक लाविला. वाडवडीलांनी आपल्या आयुष्याचा वय स्वामीकार्यात धारातिर्थी खर्च केला आणि हे कोणी खबूतर उडवून कोणी तालमीच्या मातीने अंग लाल करून हलक्या लोकात बसून आणि कोणी आर्या करीत याणी खर्च केला ते तिघेही बंधु या रितीने वागत असल्याचे शोधन मनुष्यास समजून येईल. करीता माझी किंमत यानी काय करावी. आम्ही आर्या करणार किंवा तालिंबाज अथवा खबूतरे उडविणार या तीनपैकी कोणी असतो तर याणी आम्हास आश्रय दिला असता. असो.

## कोल्हापुरकरांकडे सेवेची याचना, त्यास नकार

अशी निराशा जाहल्यावर कांही दिवसांनी आमचे बंधु बालकृष्ण ऊर्फ बापूराव हे एकदा कोल्हापूरकर सयाजीराव यास भेटण्याकरिता मुद्दाम पुण्याहून कोल्हापूरास गेले व तेथे ते नव्हते म्हणोन तेथून पायी जाऊन पन्हाळा किल्यावर त्यांची गाठ घेतली त्यानी प्रथमतः बहुमान पुरःसर एक नारळ अर्पण करून नंतर अर्ज केला की आपण आमचे पुरातनाचे आश्रयदाते आहात. आम्ही ब्राह्मण (फटाले आहे)ची चाकरी करीत आलो. करिता उदार होऊन सरकारानी आमची योजना रिसाल्यांत करून आमच्याकडून सेवा घेण्यात यावी हा तोंडी अर्ज केला. तेव्हा कागलकर म्हणून कोणी त्यांचे नातेवाईक आहे तोही त्या ठिकाणी तेथे होता. त्यांनी दोघांनी आमच्या बंधूचा देह किंचित निरीक्षण करून म्हणाले की, तुझा चपडाई लई लहान आणि उंचबी कमी आहेस आणि पुण्याचा बामण आम्ही ठेवीत नाही. ही मुक्ताफळे मुखातून पडताच त्यांच्या क्षात्रबिजाची परीक्षा जाहली आणि किंचितही भाषण न करीता आमचे बंधु पुण्यास परत आले.

अनुक्रमणिका

**धार येथे बंदूक नेमबाजीचे शिक्षण**

नंतर आम्ही कांही दिवसांनी धार म्हणून एक संस्थान आहे त्याठिकाणी सहज वडिलांबरोबर फिरण्यासाठी गेलो. त्या ठिकाणी आमचा मुक्काम सरासरी दोन महिने होता. त्या ठिकाणी आम्ही मराठ्याचे मुलाची संगत धरली आणि त्याची बंदुक (फाटले आहे) आम्ही गावाबाहेर तळ्याच्या कांठी भरदुपारी कोणाला न कळविता बंदुकनिशाण शिकण्यास जात होतो. तो मुलगा पाखरे, पानकोंबड्या (फाटले आहे) निरउपद्रवी प्राण्यावर गोळी मारण्याचे न करिता निशाण मारण्यास काढून लावीत होता. त्याठिकाणी मुख्यतः बंदुक भरण्याची कला, छरे तयार कसे करीतात वगैरे माहिती करून घेतली. आम्हाला देश पहाण्यास मिळाले तेणे करून आमचा मोठा फायदा जाहला.

प्रत्येक (फाटले आहे) आपणास आता भयंकर कृत्यांत पडणे आहे. याकरिता सितउष्ण परजन्य याची तमा आपणास उपयोगाची नाही. करिता प्रवासात सहनशक्तीही येण्याकरिता अनुकूल साधने असोन आम्ही हाल सोसण्यास आरंभ केला.

**खडतर जीवनाची तालीम**

आमचे वडील पायरस्त्याने प्रवास करीत असता ते बैलगाड्या करीत. पण आम्ही केवळ पायी चालण्याची सवय असावी म्हणोन अशा वेळेस बैलगाडीतून न बसता बारा बारा कौस ऊनपाऊस न बघता पायी चालत होतो अंथरायला गाद्या असोन नुसत्या घोंगडीवर निजत होतो. खायाला विपुल असोन केवळ डाळचुरमुरेवर रहात होतो. याबद्दल आमचे वडील मातुश्री आम्हास रागे भरत असत. पण त्यांना आमचा मूळ संकेत माहित होत नसे. असा प्रवास आम्ही सहा महिने करून विश्रांतीस्तव पुण्यात रहाणे पसंत केले. पुण्यास बहुधा चार माहिने आम्ही विश्रांती घेत होतो. आम्ही पुण्यास असलो की शांत तऱ्हेने आमच्या कार्याविषयी विचार करायला सापडे. आपण (फाटले आहे) धर्माला जी कृत्ये संमत नसतील ती करायची नाही असा विचार आम्ही केला. आमच्या प्रिय कर्माविषयी प्रयत्न करायचे मनांत आणिले की आम्हाला वडीलमातुश्रीचा धाक फार असे. अशा वेळेस असे वाटे की जशी इतर पोरे आईबापाचा त्याग करून जातात तसे आपण ही परवशता सोडून इष्टकार्यास लागू पण अशा वेळी धर्माकडे नजर दिली म्हणजे तसे करण्यास आमचे मन आम्हाला होईना. म्हणून तो हेतू सोडून असा निश्चय केला की जे होईल ते होवो. वडीलकृपेकरून जे होईल ते करायचे.

प्रथमतः हत्याराचा नाद आम्हाला लागला इंग्रजी हद्दीत हत्याराची अशा (फाटले आहे) असे जाणून (फाटले आहे) मोंगलाईत फिरण्यास गेलो. त्यावेंळेस तिक़डे शोध केला पण तेथे पैशाची अडचण उभी राहिली. तेव्हा आम्ही विचार केला, तो आमचा असा बेत ठरला की आपल्या धर्मीय कार्याकरिता लागणारी कोणतीही वस्तु चोरून घेतल्यास दोष नाही, असा विचार करून आम्ही त्या कर्मास कंबर बांधिली.

**मोंगलाई मुलूखांतून हत्यारे मिळविण्याचा क्रम**

बिड म्हणून गांव आहे तेथे आम्ही प्रथम पांच रुपये घेऊन एक गुप्ती घेतली ते पाच रूपये बुके विकून आणि कांही जवळचे असे तयार केले होते. आणि नंतर त्याच दुकानातून पिस्तुल पाचबारी आम्ही चोरला हा

अनुक्रमणिका

आमचा हत्यारे चोरण्याचा पहिला श्रीमन्माहा होय. यानंतर आम्ही ज्या ठिकाणी प्रवासास गेलो त्या ठिकाणी जसजशी हत्यारे आढळली तसतशी ती नवी मिळाली तसी आणिली. त्याचा तपशील आता लिहू शकत नाही. यारितीने हत्यारे मिळवू लागलो.

**लोक मिळविण्याची खटपट**

मग असा विचार मनांत आणला की आज़ता मंडळी जमविली पाहिजे म्हणून मंडळीत स्वधर्मावर भाषण करून त्यांना चितविले पण कांही त्यापासून फायदा होईल असे वाटेना. कारण आम्हांला अशी मंडळी पाहिजे होती की जी आमच्या आज्ञेत वागतील तो प्रकार आमच्या जमलेल्या मित्राकडून पडेना. आम्ही बिनसिकलेले समजून ते आमच्यावर आपल्या अकलेचे तारे तोडू लागले. दुसरी गोष्ट जसी आमची स्वधर्माचे ठिकाणी निर्मळ भक्ती (फाटले आहे) म्हणून त्या मंडळीचा आम्ही त्याग केला. मग आम्ही विचार केला की आज्ञेत कोण वागेल. तेव्हा आमचे ठाम मत झाले की जी लहान मुले आपल्या हुकुमात वागत, त्यांची बुद्धि कोवळी असल्यामुळे जशी वळवू तशी वळेल असा विचार करून आम्ही ज्या ज्या ठिकाणी शाळेतील लहान मुले क्रिकेट खेळत असतील त्या ठिकाणी जाऊन त्यांना सदोपदेश करून त्या खेळाचा तिटकारा त्यांना उत्पन्न करून आमच्या खेळाची रुचि त्यांना लावित चाललो.

**मुले जमवून त्यांस गोफण शिकविली**

प्रथमतः सुमारे ८ मुले आम्हास मिळाली. ती घेऊन पर्वतीखाली असलेल्या टेकडीवर गेलो. त्या ठिकाणी त्यांना प्रथमतः बुदाबुदी खेळण्यास सांगून एक दोन दिवसांनी दोन तीन गोफणी आणून हळूच दगड मारण्यास सिकवू लागलो. असा आमचा क्रम चालत असता त्या ठिकाणी अवांतर पुष्कळ मुले जमत. त्यांना आम्ही असाच उपदेश करीत चाललो, तशी मुलांची संख्या वाढत चालली. ती दिडशेपर्यंत येऊन ठेपली. इतकी मुले प्रत्यही हजर होत नसत. सवडीप्रमाणे ती जमत. पुढे त्या मंडळीविषयी आम्ही नियम घातले प्रत्येक मुलाने आज्ञा शिरसावंद्य केली पाहिजे. मंडळीतून येऊ इच्छिणारांनी गोफणीकरिता दिड आणा मुख्याजवळ दिला पाहिजे. गोफण मारताना मनुष्यापासून निदान दहा हात तरी लांब असावे. कारण गोफण फिरवित असता आसपास कोणाच्या थोबाडांत बसेल. शिकणारा करिता एकीकडे जागा केली होती. तिकडे त्यांनी उभे राहून पहावे. कारण नवीन मनुष्याचा दगड अनियमित असल्यामुळे कोणाला लागायचा. पुढे मनुष्य जमाव पाहून दगड मारायचा. कारण कोणाला लागेल. आपसात कोणी भांडू नये असे नियम केले.

गोफणीत फेकण्याचे तीन प्रकार केले (१) भूगामी व (२) मध्यभामी (३) आकाशगामी, हे तीन भेद, शिवाय जोडगोळी आणि छरे मारावयाचे प्रकार. इतर प्रकार ज्यास साधारण आले तो मुलगा साधारण बरा समजून आम्ही त्याला ध्यानांत ठेवित होतो. असे साधारण प्रवीण जाहले. मुलांची संख्या जेव्हा पंचवीस तीसपर्यंत आली तेव्हा आम्ही निराळी योजना केली. ती अशी मंडळीच्या दोन टोळ्या करून एका टोळीचा अधिपती मी, दुसऱ्या टोळीचा माझा भाऊ याप्रमाणे केले. दोन टोळ्यास दोन भगवी निशाणे ती टोळीतील प्रधान निशाण होय. शिवाय दोन तांबडी निशाणे प्रत्येक टोळीत एकेकाप्रमाणे दिल्ही होती. शिवाय प्रत्येक टोळीत एकेक गोफण ज्याच्या गळ्यांत एकेक पिशवी असावयाची त्या पिशवीत लाविल्या जाणाऱ्या दवा, दगडीकोळसा, पान कणीस, बांबूचे पीठ ही औषधे, चालू काशी काटे काढावयाचा चिमटा, बिबे व सुई, आदिकरून सामान प्रत्येक पिशवीत असावयाचे असा टोळ्यांचा प्रकार झाल्यावर आम्ही प्रत्येक रविवारी

शनिवारी आम्ही एक पर्वतीकडे लांब एक जागा पसंत केली होती तिकडे जाऊन एकाने डोंगरावर आपले निशाण लावून जागा रोखावी आणि दुसऱ्याने खाली निशान लावून जागा धरावी, अशी सिध्दता जाहली की प्रथम प्रकारचा आवाज करावा की आरंभ व्हावयाचा. अशा वेळी आम्ही उभयता बंधु नुसती व्यवस्था करून कसा हल्ला करावयाचा हल्ल्याचा प्रतिकार कसा करावयाचा इत्यादी प्रकार करीत होतो. कोणास दगड लागला तर तांबडे निशाण दाखववावे. ते निशाण पाहतच गोफणी बंद ठेवाव्या. त्या औषधोपचार करून नंतर आरंभ करावा. अशा वेळी पुष्कळ मुलाना दगडाचा मार बसला पण कोणी डगले नाहीत. असा प्रकार चालला. पुढे कांही दिवस आमच्या बंधूची टोळी चतुरसिंगीकडे आसपास जाई आणि माझी टोळी पर्वतीकडे आसपास जाई आणि आठपंधरा दिवसानी दोघांच्या टोळ्यांची लढाई जाहली म्हणजे आम्ही कांहीतरी त्यांना आमच्या अनुकुलतेप्रमाणे थोड्या पैशांत पुष्कळ खाद्य येईल असे कांहीतरी डाळचुरमुरे आणून सर्वास वाटावे. की जेणेकरून मंडळीस आम्हाबद्दल कृतज्ञता वाटावी. अशा प्रकाराने सुमारे २/३ महिने जाले.

**त्यांच्यासाठी मारुती दैवताची स्थापना**

पुढे आमच्या मनांत विचार आला की, मंडळीस कांहीतरी दैवत पाहिजे. त्यासिवाय मजा काही नाही. करिता असे केले की पर्वतीचे एकेठिकाणी चांगली जागा सोईवार पाहून त्याठिकाणी असलेल्या निवडुंग श्रम करून काढून टाकला. प्रशस्थ जागा केली. ही जागा पर्वतीचे खाली टेकडीवर त्याच्या खालीच पाट गेलेला आहे त्या जागी एक लिंबाचे झाड आहे. त्याखाली देवाची बैठक योजिली व दैवत मारुति पसंद केले. कारण देवामध्ये बळपूर्ण मारुती सारखे दैवत नाही असा विचार करून मारुती पसंद केला आणि मारुताची मूर्ति कसी संपादन करावी या विचारात पडलो. तो एके दिवशी निजलो असता स्वप्न पडले आणि त्या स्वप्नांत बजरंग बलभिमाची मूर्ति पहाण्यात आली आणि ती अशी म्हणाली की ज्या ठिकाणी तुम्ही जागा तयार करीत आहात त्याच ठिकाणी मी आहे. मला शोधा. मी येण्यास तयार आहे. असे स्वप्न पडून मी जागा जाहलो व बंधूना सांगितले तो त्यालाही असेच स्वप्न पडल्याचे ऐकिले. पण आमचा त्या स्वप्नावर विश्वास बसेना. कारण आम्ही इतके पुण्यवान असल्याचे मन सांगेना तरी आम्ही ही हकिगत मंडळीस सांगितली. त्यावरून पुष्कळ खोल जमीन खणली तो मूर्ति निघाली. त्यावेळेस आम्ही उभयबंधू त्या ठिकाणापासून दूर होतो. तेथे सांगत आले की मारुती सापडले. आम्ही अतिउल्हास वृत्तीने पहाण्यास गेलो. ती सुमारे दिडवीत मूर्तिवर सेंदराचे जाड कवच पण ते मूर्ति पासून गळून खाली पडले व मूर्ति स्पष्ट दिसू लागली. मूर्तिच्या एका हातात द्रोणगिरी पर्वत, दुसऱ्या हातात गदा, पायाखाली जंबुमाळी अशी मूर्ति पाहून आम्हाला फार संतोष जाहला व मूर्ति घेऊन घरी गेलो. या मूर्तिची स्थापना विधी समारंभाने करावयाचे आम्ही योजिले. ही मूर्ति सापडण्यापूर्वी आम्ही एक सेंदूर लावून उगीच दगड बसविला होता. त्याची पूजा सर्व मंडळी मोठ्या भाविकपणे करीत असत. ही मूर्ति पाहून सगळ्यांची लालसा लागली की, केव्हा मूर्तिची स्थापना होईल, चांगला दिवस पाहिला. तो १५ दिवस लांब होता तोपर्यंत आम्ही घरीच त्याची पूजा करीत होतो. मारुती आरती दररोज जाहली पाहिजे असा विचार करून एक चांगल्या चालीवर आरती केली. या मारुतीचे नांव आम्ही गोफण्यामारूति असे ठेविले.

॥ आरती गोफण्यामारूतिची ॥ चाल ॥ आरती भुवनसुंदराची

आरती मारुति पदकमला करूनी तरू सुखेभवाब्धीला ॥ धृ ॥ जन्माता फलशंके रविला घेतली उडी धरायाला ॥ हर्षे भुभुकार केला तो भू भरूनि नभी गेला ॥ चाल ॥ दचकले सर्व याहुनि सर्व देव हातगर्व, करिती तव स्तुतीला, आला मोद बहुत कवीला ॥ १ ॥ आ ॥ तो नर भजेल हनुमंता, तयाची कोण करीत

समता ॥ नसे त्या दैन्य दुरित चिंता भूवरी कोण त्यासी जेता ॥ चाल ॥ जलधीचे नीर लंघुनि तीर पाऊनी धीर, देत राम सतिला, झाला मोद बहुत कविला ॥ २ आ.॥ सुत दामोदर वदला, गोफण्या मारूति मज वळला म्हणुनी आलासी पर्वती पासी, दीन आम्हासी, साह्यकारी झाला म्हणुनी हर्ष आम्हाला झाला ॥ आरती मारूती पद ॥

असी आरती करून ती सगळ्यांना पाठ करण्यास दिली. ती आरती म्हणोन आम्ही प्रत्येकी मारुतीची आर्ती करू लागलो. याप्रमाणे तो दिवस आला की जो आम्ही स्थापनेस पसंत केला, होता त्या दिवसाचे दोन दिवसांपूर्वी सर्व मंडळीस आम्ही सभ्यरितीने आमंत्रण चिठ्ठ्या पाठविल्या. त्यांतील मजकूर, येणेप्रमाणे होता. चैत्र वद्य २ शनिवारी दुपारी पर्वतीच्या खाली नियमित केल्या ठिकाणी स्वयंभू बलभिमाची स्थापना सर्वानुमते ठरली आहे. करिता आपण सभेचे सभासद आहांत म्हणून अशा शुभप्रसंगी आपण अगत्य येणे जरूर आहे. येताना कोणी फुले, नारळ, बुका, गुलाल वगैरे पूजा दरपण आणिल्यास त्याचा साभार स्विकार केला जाईल. आपला स्थापक-दामोदर हरी चापेकर-बालकृष्ण हरी चापेकर. याप्रमाणे चिठ्ठ्या वाटल्या. पण भवितव्य काही विलक्षण असते. मंडळीचा उत्तरोउत्तर वाढण्याचा प्रकार पाहून आम्हाला जो आनंद होई तो लिहिता येत नाही.

मी जाणून होतो की या अतिआनंदात कांहीतरी विघ्न येणार व तिची कोणत्या बाजूने येतील तेही पण आमच्या लक्षांत येऊन चुकले. आम्हाला एकतर असे वाटे की या खेळाची समाप्ती एखाद्या मुलास वर्मी दगड लागून होईल म्हणून त्याबद्दल आम्ही फारच काळजी घेत होतो. दुसरे असे वाटे की ही बातमी पोलीसात समजून ते आपणास विघ्न करतील. म्हणून आम्ही व्यवस्था केली की मुलांचा मोठा मेळा करून शहरांतून येऊन परत जाऊ नये तर पाच पाच मुलानी टोळी करून यावे व जावे. त्याप्रमाणे टोळ्या जोडून दिल्या. येताना प्रत्येक टोळ्याचे मुख्यांनी भिकारदहाचे गेटाकडून एक रस्ता आलेला आहे आणि एक चिंचेच्या तालीमीकडून आला आहे या दोन रस्त्याचे मधी एक कंदील आहे त्या कंदिलासी प्रत्येक टोळीने एकवार येऊन जावे व परत जाताना ठेविलेला दगड काढून टाकावा. असा नियम केला. यातला उद्देश इतकाच की पुढे मुले किती गेली आहेत हे समजावे. हे दुसरे कारण झाले. तिसरी अशी भिती वाटते की ही मंडळी वाटेत कोणासी भांडण करतील आणि आपणास निस्तरावे लागेल कारण ही विद्या अशी कांही चमत्कारीक आहे की ती मनुष्यास अविचारी करील, अथवा या विद्येचा धर्मच असा आहे की जसे हातात कातरी घेतली की कातरावेसे वाटते. जी वस्तु हातात घेतली तिचा गुणधर्माप्रमाणे मनुष्याची इच्छा व्हावयाची तद्वत दांडपट्टा, गोफण मारणे, कुस्ती करणे हे सर्व खेळ होते, वाढविणारे आहेत या नियमला अनुसरून माझी मंडळी जाता येता तंटे करून लागले व तो बोभाट माझ्या कानावर आला. एक दिवस असी गोष्ट जाहली की आम्ही जावयापूर्वी मंडळी पर्वतीचे खाली जमली व ती तेथे कोणी असता एक बाट्या मिशनिरी त्याच्या बरोबर एक त्याचा मित्र, एकाच्या हातात जोडनळी बंदूक असे. आमच्या मंडळीच्या परतीच्या टप्प्यातून चालले ते पाहून आमची मंडळी तो समजून त्याची तोंडानी थट्टा करू लागले. पण त्यानी त्याच्याकडे जाऊन केवळ भितीने दुर्लक्ष केले वगैरे. पुढे आम्ही उभयता बंधु आलो व झाली हकिगत मंडळीनी आम्हास सांगितली. त्याबद्दल आम्ही त्यांना रागे भरलो की उगीच कुणाचा तंटा करून नसता तंटा घरांत आणू नका. असे म्हणून आम्ही संध्याकाळचे वेळी नित्यनियमाप्रमाणे टोळीटोळीने शहरांत येण्यास निघालो.

अनुक्रमणिका

**दोन मिशनऱ्यांची कुरापत**

आम्ही दोघे आणि दुसरी दोन चार मुले असी सर्वच्या पाठीमागून जावयाचा परिपाठ असे. त्यानी त्या नियमाला अनुसरून आम्ही शहरात जात असता पर्वतीच्या तळ्याच्या काठावर ज्याची यानी थट्टा केली होती ते दोघे बंदुक घेऊन आमचे समोरून आलेले पाहिले. त्याना पाहताच आमच्या मंडळीने संकेताने आम्हाला सांगितले की ही ती मंड़ळी. त्यांनीही याना ओळिखिले. आणि आता हे थोडे आहेत या घमेंडीत ते आम्हाला सिवी देता असे म्हणून ते कुरापत काढावयास आले. त्यावेळी आम्ही पुढे होऊन यद्यपि आमच्या मंडळीचा पूर्वी अन्याय होता तरी याबद्दल त्यांचा एकीकडे कान पिरगळला आहेच. अशावेळी आपला पक्ष जरी अन्यायी आहे तरी वाणीकरिता मागे घेणे नाही असे समजून आम्ही त्यांत पडलो. आणि त्यास सांगितले की बाबा वाटेने जा. आता आमच्या तुझ्याबद्दल कांही एक गोष्टी चालल्या नव्हत्या. मग तुला सिव्या देण्याचे कारण काय त्यावर त्याची आमची बोलाचाली जाहली. ती येथे घेणे रास्त नाही. अखेर असे जाहले की, ते म्हणाले उद्या तुम्ही त्या टेकडीवर या तरी खरे. जर याल तरच खरे ब्राम्हण, त्यावर आम्ही सांगितले आम्ही तर नेहमी तेथे येतो. तुम्ही जर खरे बाटे असाल तर उद्या या. असी उभयतांची आणीबाणी जाहली. दुसऱ्या दिवशी रविवार होता. आम्ही सर्व मंडळी २ वाजता दुपारी पाचारण करून सांगितले की मित्रहो. तुम्ही जी विद्या सिकता आहा तिच्या परीक्षेचा साधारण समय हा आहे. करिता डगु नका. असे म्हणून कशा रितीने व्यूह रचावयाचा ते सांगितले मुख्य मारुतीच्या ठिकाणी चार समय मुले म्हणजे युक्तीवाद करणारी मुले ठेवली. त्यांना सांगितले की तुम्ही नुसता साम म्हणजे तंटा मिटेल असे करावे. आणि लावून द्यावे. बाकीची मुले सर्व खाच-खळण्यांत लपून बसविली आणि सर्वास सांगितले की गोफणीचा उपयोग होता होईल तितका करायचा नाही, फार जाहले तर हाताने दगड मारावे. पण गोफण दाखवू नये. याचे कारण आपण गोफणीबाज आहोत हे प्रसिद्ध करावयाचे नाही असा बंदोबस्त केला. ते होऊन जर मारामारीचा भाव दाखवू लागले तर प्रथम कोणत्या टोळीने हल्ला करावा आणि त्या टोळीचा निभाव लागत नाही असे पाहिल्यावर अनुक्रमाने कोणीकोणी या टोळ्यांनी कशा प्रकाराने कसे हल्ले करावे याबद्दल सर्वास चांगली माहिती देऊन आम्ही दोघे दूर पण ज्या ठिकाणाहून तेथील सर्व प्रकार स्पष्ट रीतीने दिसून येईल अशा ठिकाणी सभ्य पोशाख करून सभ्य होऊन बसलो. उद्देश इतकाच की त्याना चवदावे रत्न दाखवून लागलीच आम्ही संभावित मध्ये पडून त्यांना चार शब्द बोलून तंटा मिटवून टाकायचा कारण त्यांचा भयंकर प्रकार होणे आम्हाला इष्ट नव्हे. कारण त्याठिकाणी आम्हाला पुष्कळ दिवस काढावयाचे आहेत असा आमचा हेतू होता. एवढ्या करिता ही सौम्य तजवीज आम्ही योजिली. असी आमची तयारी करून वाट पहात बसलो संध्याकाळ जाहली तरी ती मंडळी कांही आली नाहीत. शेवटी आम्ही ती मुले बातमीदार म्हणून वाटेवर बसविले होते. त्यानी येऊन सांगितले की ती मंडळी आपल्या जागेकडे पाहून भिऊन इकडे आले नाही. त्याचे बरोबर पाच मुसलमान होते. ते आम्हाला भिऊन वागले. हे ऐकून आम्ही घरोघर गेलो. पुन्हा अशी विघ्ने येऊ नये म्हणून त्यासंबंधानी मंडळीस आम्ही सक्त ताकीद दिली की उगीच कोणाचे वाटेस लागू नये.

त्यानंतर तिकडे पायी हवा खाण्यास दोन युरोपियन आले होते. त्याला पाहून आम्हाला ही भान न रहाता त्यांच्यावर हल्ला करण्यास मंडळीस उलटे उत्तेजन दिले. त्यांना आमचा एक एकही धोंडा लागला नाही. कारण ते लांब होते. परंतु त्यांचे नजीक धोंडे जाऊन पडले. तेणेकरून ते भयभीत होऊन पळून गेले. पुढे थोड्याच दिवसांत डेक्कन हेरल्ड म्हणून इंग्रजीत पत्र आहे त्यांत आमच्या मंडळीची कागाली केली आहे असे ऐकिले.

अनुक्रमणिका

**गोफणीच्या दगडांस दोन युरोपियन भितात**

आमच्या बाजूस कांही सुधारक मंडळी हवा खाण्यास येत असत. सुधारक मंडळीची आम्ही चांगली ओळख करून घेतली होती. कारण सुधारक म्हणजे आमचे कट्टे शत्रू आम्ही समजतो. त्यांची सर्वाची नावनिसी आम्हास माहिती आहे. पण येथे देऊन मी आपला लेख विटाळीत नाही. आम्ही शहरांत ज्या वेळेस परत फिरत होतो त्यावेळेस आम्हाला हे धर्मबंड सुधारक भेटत. त्यांची शाब्दिक थट्टामस्करी करावयाची मंडळीना पूर्ण मुभा असे असा प्रकार कांही दिवस जाहल्यावर सुधारक चिरडीस जाऊन त्यानी ज्ञानप्रकाश पत्रात पोलिसास इशारा केला की या उभय पोरांचा बंदोबस्त सरकारानी करावा. असा मजकूर छापला तेव्हा आम्हाला वाटले की या बाजूने कदाचित आमच्या आनंदात विरजण पडेल. असे मनांत आम्ही भीत असता तर वर निर्दिष्ट केलेला मारुति स्थापनेचा शुभ दिवस येऊन पोचला. त्याच्या आदल्या दिवशी आम्ही सर्व मंडळीसह मोठ्या आनंदात होतो. खालचे पाटाचे पाणी आणून देवळाचे काम केले होते. ज्या लिंबाखाली मारुतीचे देऊळ केले होते त्या लिंबाचे झाडास एक वास बांधून मोठे एक भगवे निशाण लावले. त्याच्यावर असी अक्षरे लिहिली होती । स्वधर्म निधनं श्रेयः पराधर्मो भयावहः गोफण्यामारुति की जय ॥ गोफणीचा अभ्यास करीत होतो असा आनंदाचा प्रकार चालला आहे तो ईश्वरी इच्छा बलियसी त्याप्रमाणे एकदम असी वार्ता कानी आली की कोणा एका मंडळीबाहेरच्या म्हणजे मार्गावरून जाणाऱ्या मनुष्यास धोंडा लागला. तेव्हा लागलेच आम्ही उभयता तिकडे गेलो. तो मार बसल्यावर संतापून आम्हाला सीव्याची लाखोली मोजित आहे. आम्ही त्याकडे जाऊन दादा बाबा करून आमचे जवळील औषध उपचार त्याला प्रथम केला पण त्या गृहस्थाने आमची कीव न करीता मी पोलीसाकडे जाणार म्हणून निघोन गेला. आम्ही विचार केला तो गावात जाईल. पोलिसास वर्दी देईल तोपर्यंत आपण पसार होऊ असा विचार करून आम्ही सर्व मुलास नियमाप्रमाणे वाटेने रवाना केले आणि सर्वाच्या गोफण्या एकाजवळ देऊन प्रथम त्यास रवाना केला. पाठीमागून आम्ही कांही मुलांसह चाललो ती आम्हास पोलिसानी पकडले मी सिपायास सांगितले की मी कांही त्याला दगड मारिला नाही.

**पोलीसांकडून अटक व सुटका**

मी सहज फिरावयास आलेला मनुष्य, काय गडबड आहे म्हणून पाहाण्यास गेलो तो याना जखम जाहल्याचे दिसले. त्यावरून मला माहित होता तो मी उपाय परोपकारबुद्धीने करावयास गेलो तो मजवर चांगला प्रसंग आला. सिपायाने सांगितले ज्याने दगड मारला तो मुलगा दाखव, लहान मुलास पकडलेला पसंत न पडून मी त्यांच्याबरोबर फरासखान्यात जावयास सिद्ध जाहलो. वाटेने जाताना सिपाई बोवांची पुष्कळ प्रकारे स्तुती केली, तेव्हा ते म्हणाले आम्ही काय करावे आमच्याकडे फिर्याद आली तेव्हा तुम्हाला नेणे जरूर आहे. तेव्हा मुलांची स्तुति केली की आपण ब्राम्हण आहात आपली जखम कांही फार मोठी नाही एक दोन दिवसांत बरी होईल. अशा रितीने सामदामभेद उपाय केले. तेव्हा गृहस्थ तोंडाने म्हणाले की, आमची फिर्याद नाही त्यांना सोडून द्या. तो सिपाईबोवास आवसान येऊन ते म्हणाले , आमच्या हाती आलेला गुन्हा सोडता येत नाही. पुन्हा त्याची स्तुती केली तेव्हा ते म्हणाले याच्या बापास विचारून ते जर फिर्याद करण्यास तयार नसतील तर पाहिन. हे ऐकून मला पुष्कळ बरे वाटले. कारण ब्राम्हण लोक पुष्कळ विचारी असतात. तेव्हा ते कांहीतरी विचार करतील म्हणोन त्यांच्या घरी गेलो. हे गृहस्थ साठे म्हणोन उपनगराचे जोगेश्वरीचे बोळात रहातात. ते होय. त्यांचे घरी जाऊन खरा प्रकार सांगितला की दग़ड कोणी मारला ते मला ठाऊक नाही. जखमेस उपाय मात्र केला. ऐवढे ऐकून त्या सद्गृहस्थाने माझी फिर्याद या गृहस्थाविषयी नाही असा जबाब सिपायास दिला. त्यामुळे सिपाई नाईलाज होऊन गेला व मोठा आनंद

जाहला की, पोलीसच्या जबड्यातून मोठ्या हिमतीने सुटलो. कारण आमचा मोठा कटाक्ष होता की, पोलीसचा छाप ढुंगणावर घ्यायचा नाही. पोलिसामध्ये नांव दाखल होऊ नये असा आमचा पूर्व संकेत होता. त्याप्रमाणे हे विघ्न निवारण जाहले. याबद्दल आम्ही गोफण्या मारुतीचे स्तवनपूर्वक आभार मानले. पण दुसऱ्या दिवशी स्थापनेच्या जो बेत होता तो मात्र आम्ही रहित केला. कारण जी जागा पोलिसांनी दुषित केली ती पुन्हा उपयोगांत आणायची नाही असा विचार करून ती जागा सोडल्याचे सर्वास महसूस केले. पोलिसचा जाहलेला प्रकार सर्वास समजला. तेणेकरून बरीच मंडळी भयभीत होऊन आमच्या मंडळीतून निघून गेली. मग आम्ही विचार केला, आता कसे करावे. तेव्हा असा बेत केला की, गावातच एखादी बखळ पाहून त्या ठिकाणी मंडळीस शिक्षण देऊ असा विचार करून लोंढे यांची जागा दोन रुपये महिना भाड्याने घेतली व त्यांत मारुतीची मूर्ति बसवून पुढे कुस्त्या खेळण्यास जागा केली. त्याठिकाणी इतक्या गोष्टी आम्ही सिकवित होतो.

### हरतऱ्हेचे व्यायाम व कवायतीचे खेळ शिकवण्यास सुरुवात

कुस्ती, दांडपट्टा, कांही भाल्याची फेक, लांब रुंद उंच उडण्या, मुष्टीयुद्ध असे प्रकार चालत. वेळ चार वाजल्यापासून रात्रीचे सहा वाजेपर्यंत ठेविली होती. कवायतही सिकवित होतो. असा ठिकाणी सरासरी माहिना दीड माहिना चालला पुढे बदलीवाले लोंढे यामध्ये न जमून ती जागा सोडणे भाग पडले. मग दुसरी कोठे जागा पहाण्याचे उद्योगास आम्ही लागलो. तो खासगीवाले जोगेश्वरीच्या बोळांत रहातात त्यांचे वाड्यांत जागा आहे व ते खुषीने देण्यास कबूल करितात असे ऐकल्यावर शोध केला. तो जागा विस्तीर्ण असून प्रतिबंधित आम्हाला पाहिजे असी आहे. पण  ही विशेष सोईची जागा नादुरुस्त असल्यामुळे आम्ही फार श्रम करून ती दुरुस्त केली. जाग्यास सफेदी दिली. मध्य ठिकाणी असलेल्या कोनाड्यांत मारुतीची स्थापना केली. आसमंतात वीरपुरुषांच्या तसबिरी लाविल्या. वीर-पुरुषाखेरीज तसबिरा लावायच्या नाहीत असा आमचा नियम होता. विरपुरुषाच्या हकीगती ज्यांत आहेत असी ऐतिहासिक पुस्तके जमविली आणि एक वाचनालय काढले. आणि या वाचनालयाचे नांव आम्ही पुढे करून त्याठिकाणी प्रसिद्ध होतो. या ठिकाणी घेतलेली मुले पूर्ण विचारांनी जी इमानी वाटली तीच घेतली होती. मुलांची संख्या सरासरी पंधरा पर्यंत होती. त्यांना व्यायाम करण्यास सकाळी यावे असी ताकीद असे. दुपारी दांडपट्टा, कांठी वगैरे खेळ सिकवीत होतो. संध्याकाळचे पाच वाजता ऐतिहासिक पुराण आम्ही दोघापैकी कोणीतरी सांगे. कोणता तरी एखादा प्राचीन इतिहास सुरू करून जेणेकरून मुलांच्या मनावर स्वाभिमान, धर्माभिमान त्याकरिता म्हणजे तृणतुल्य आहे, असा ठसा उत्तम प्रकारे उमटेल असे प्रतिपादन आम्ही करीत होतो. त्याठिकाणी लढाईची हकिगत येई त्यांत मोरचे, खंदक, गनिमी कावा, छापा, हत्यारीची नांवे वगैरे सांगून येवढे शब्द स्पष्ट रितीने मुलास जेणेकरून समजतील अशा प्रकाराने आम्ही व्याख्याने देत होतो.

### हत्यारे चालविण्यासंबंधीची व्याख्याने

मुलांचे सामाजिक विचारशास्त्र आणि रूढी याना सोडून निराळे होऊ नये म्हणून ठिकठिकाणी धर्मचर्चा करीत होतो त्यांत सुधारकावर कडक टिका केली जात असे. जेणेकरून यांच्याविषयी मुलाचा द्वेष कायम होईल असा प्रकाराने हे ऐतिहासिक पुराण संपले की, मारुतिची आरती करायची व सेवट किंचित वेळ सर्वांनी एकतानवृत्तीने भजन करून हनुमंताची वीर रसप्रधान मूर्तिचे ध्यान करायाचे अशा रितीने सूर्यास्तापर्यंत कार्यक्रम चालत असे. रात्री आम्ही दोघे भाऊ वेषविपर्यास करून त्याची बतावणी बरोबर

करावयास पेटोपेटी जात होतो. सर्व मुलांस मेहनत झाल्यानंतर कांहीतरी खावयास म्हणून हरभऱ्याची डाळ भिजत घालून ठेवायची आणि ती खोबऱ्याच्या तुकड्यासह खाण्याची असी तजवीज केली होती.

**जुन्या ऐतिहासिक वस्तूंचा संग्रह करण्यास साथीदारांना सांगितले.**

सर्व मुलास ताकीद असे की, डाळ, खोबरे, ऐतिहासिक बुके, जुनी दप्तरे, जुने अंगरखे, निरनिराळे कपडे, आदीकरुन आपल्या उपयोगी पडण्याचे सामान ज्याला जसे मिळेल तसे त्यांनी आणून हजर करावे मग तो निंद्य मार्गे असो अगर चांगला असो. उपयुक्त वस्तूंचा संग्रह जाहला पाहिजे असा आम्ही नियम केला. तेणेकरुन पुष्कळ जिन्नस आमच्या पुढील कालांत साठल्या मग त्या सर्व वस्तूंची नीट व्यवस्था राहिली पाहिजे म्हणून निरनिराळ्या मुलांकडे निरनिराळी कामे देऊन त्याची जबाबदारी आम्ही त्याजकडे करून दिली. या जागेला मोठा दरवाजा असे तो बंद करून नुसती दिंडी मात्र उपयोगाला आणित होतो. आत मध्ये एक घंटा बांधली असून तिची दोरी बाहेर सोडली असे. प्रत्येक मुलाला नंबर दिले होते. त्यानी दारापासी आले की दोरी ओढून घंटा वाजवावी की आतमध्ये आलेल्यांनी नंबर विचारावा आणी पटले की दार उघडावे. या समाजास आम्ही राष्ट्रहितेच्छुमंडळी असे नांव दिले होते.

**क्रिकेट खेळाविषयी तिटकारा**

आमचे क्रिकेट खेळाची मोठी किळस असे. आपले हजार खेळ एकीकडे सारून क्रिकेटच्या नादी लागलेली मुले आणि त्यानंतर उत्तेजन देणारे त्यांचे गुरुमास्तर लोक यांच्याबद्दल आम्हाला फार द्वेष येऊ लागला. मुलांना मारामारी  करण्याचा चांगला राबता जाहला पाहिजे व त्याकरिता उगीच कोणाचा खेळ न जाहला पाहिजे म्हणून आम्ही तजवीज केली ती असी की, पाच सहा मुलांची टोळी करून तिला क्रिकेट खेळ ज्याठिकाणी चालला असेल तिकडे पाठविण्याचे आणि युक्तिप्रयुक्तीने त्याचे क्रिकेटसामन लांबवावयाचे असा क्रम चालला. त्यांत कोठे मारामारी होत असे कोठे मारामारी न करताच सामान हाती लागे. त्यावेळेस बोभाटा जाहला की  कोणी चापेकर म्हणून आहेत ते काम करितात. तेव्हा आम्ही आपले नांव रामचंद्र हरी मराठे असे ठेविले. आम्हाला हाका मारले तर मराठे असे हाका मारावी असे सांगितले. याच सुमारास कासिनाथपंत गाडगीळ म्हणून एक विलायतेहून आलेला सुधारक आहे त्यानी आपली मुलगी शास्त्राविरूध्द सोळावर्षाची करून नंतर तिचे लग्न चिंतामण नारायण भट म्हणून असाच एक सुधारक आहे त्याच्या मुलास देऊ करून मोठा लग्न समारंभ झाला. तो आम्हाला पसंत नव्हता. भट आणि गाडगीळ हे आमचे नातेवाईक आहेत तरी ते ज्याअर्थी शास्त्रा विरूध्द वागणारे आणि सुधारक आहेत त्याअर्थी ते आमचे कट्टे शत्रु आहेत. आमची प्रतिज्ञा असी आहे की आमचा बाप जर धर्मशास्त्राविरुद्ध वागेल तर तो सुद्धा आमचा शत्रु होईल. या भट आणि गाडगीळकडून आमच्या घरी भोजनास सुपारीस आमंत्रण दिले होते. पण आमच्या घरीची पुरुष मंडळीपैकी मी मात्र पान सुपारीस गेलो होतो.  पानसुपारीस जाण्याचे कारण आपण तेथे गेलो तर त्याचे सर्व धर्मबाह्य वर्तन प्रत्यक्ष पाहण्यात येऊन आपली खात्री होईल, असा विचार करून गेलो होतो. भोजनास गेलो नाही. कारण यांची योग्यता मी धेडाप्रमाणे निंद्य करतो. अखेर वरातीचा दिवस येऊन पोहोचला. तेव्हा आम्ही विचार केला की धर्मविरुद्ध लग्नसमारंभाची वरात मोठ्या थाट्याने धर्माभिमानाच्या ऊरावरून जावी हे आम्हाला लांछन होय एवढ्याकरिता कांहीतरी विघ्न वरातीला आले पाहिजे. असे म्हणून आम्ही सर्व मंडळीस इशारा दिला की आज रात्री वरातीवर हल्ला करावयाचा. आम्ही अंदाजाने ताडले की मोठी वरात आहे तेव्हा मोठ्या रस्त्याने जाईल. असा विचार करून मारकेटच्या रस्त्याची पहाणी करून गल्ल्यागल्यांत मुले बसवून दगड देऊन ठेविले. आणि सांगितले की आपल्या

आपल्या हद्दीत वरातीची मिरवणूक आली की जोराने हल्ला करावा या प्रमाणे व्यवस्था करून वाट पहात बसलो तो समजले की वरात मोठ्या समारंभाने राजरस्त्याने न जाता साधारण रस्त्याने जात आहे. मग आमचा सर्व बेत फिसकटला. तरी घाई करून कसातरी हल्ला केला पण तो मनासारखा जाहला नाही.

## सुधारक मंडळीच्या लग्नवरातीवर दगड

वधुवरापैकी एखाद्यास तरी इस्पितळांत जाणे भाग पाडले पाहिजे असी आमची इच्छा होती. हे ऐकून पुष्कळास आमच्या क्रौर्याविषयी विस्मय वाटेल पण क्षणभर विचारांती सूज्ञास असे कबूल करणे भाग पडेल की आह्मी केले तेच बरोबर आहे कोणालाही साम दाम भेद आणि दंड या चार उपयानी वश करावे असे शास्त्रनियमास अनुसरून माझे इतर स्वजातीबंधु सुधारकांसह भांडत आहेत. त्याचे भांडण कृष्ण आणि शुक्ल पक्ष या नावाने प्रसिद्ध आहे. त्या शुक्लपक्षाला हे दाद देत नाही त्याचे कारण त्यांचे हाती दंड नाही असा विचार करून तो दंड आम्ही आपल्या हाती घेण्याची इच्छा करून आम्ही हा आरंभ केला आहे. पण हा प्रथम प्रयोग मनासारखा जाहला नाही. इतकेच की कांही बायकास दगड लागले खरे. त्यामुळे त्यांना स्मरत असेल कीं असा प्रकार झाला होता खरा. म्हणून याठिकाणी लिहून ठेवले आहे.

अनुक्रमणिका

# सुधारक मंडळीवर टीका

## मुंबईस प्रयाण

यानंतर आमचे जाणे चातुरमासानिमित्त मुंबईस जाहले. मुंबईस जाताना मंडळीत एकास मुख्य करून त्याच्या छंदाने सर्वानी वागावे व मुख्यानी आम्ही घालून दिलेल्या नियमाप्रमाणे मंडळीस वागवावे असे करून आम्ही गेलो. पाठीमागे मंडळीने बरीच हत्यारे जमविली ती तीन जुन्या बंदुका, सहा तलवारी, काळी गुप्ती, असी हत्यारे जमविली. ती आम्ही जेव्हा गणपती पाहण्यास पुण्यास आलो त्यावेळेस मंडळीने आम्हाला ती हत्यारे दाखविली. शोध करता ती हत्यारे रानडे म्हणून एक मुलगा आहे त्यांनी आपल्या रहाते घरातून चोरून आणिली व त्याला साध्य भिडे आणि को. त्याबद्दल आम्ही त्यास शाबासकी दिल्ही. सर्व मंडळीचे निरनिराळे ऐकून घेतले. तेणेकरून दोन माहिन्याची हकिगत सर्व तऱ्हेने समजली. त्यात भिड्याबद्दल पुष्कळानी हकिगत सांगितली की सर्व तुमच्या पश्चात तुमची निंदा आमच्या जवळ करीतो. तेव्हा मी विचार केला की तो कांही विशेषपणा मंडळीत आल्यावर काय करील. करीता असी मंडळी चालवून कांही फायदा होणार नाही. करिता काय करावे असा विचार करून आम्ही सर्व मंडळीस जमवून सगळ्यास सांगितले की हे भिडे याणी आमच्या ठिकाणी कोणत्याही प्रकारचा दोष नसता केवळ आपल्या स्वभावाला अनुसरून याने आमची निंदा मंडळीपासी केली ती सर्व मंडळीस ठाऊक आहेच. करिता यापासून आम्हाला जो बोध जाहला तो हा की, आम्ही स्वदेशहित करण्यास पात्र आहोत. करीता आजपासून आम्ही सर्व गोष्टींचा त्याग केला असे. ज्या कोणास हे चालविणे असेल त्यानी चालवावे. त्या समाजापासून आम्हाला काही एक घेणे नाही असे म्हणून आम्ही समाजाबाहेर निघून गेलो. त्यानंतर पुष्कळ मुले घरी आली व रडली आणि म्हणाली की आपण समाज मोडू नका सर्वान भिडे हे फार रडले. सरासरी पसाभर पाणी या मायावी पुरुषाने गाळून मी असे म्हणालो नाही समाज मोडू नका. वगैरे विनंती केली पण आम्ही त्यांच्या बोलण्याला मान न देता निघून मुंबईस गेलो.

## जमविलेली हत्यारे पोलीसांकडून जप्त

पुढे कांही दिवसांनी असे समजले की समाजातील बहुतेक सामान देवधर म्हणून एक मुलगा आहे त्याने नेले त्यांत हत्यारे ही त्यानेच नेली व ती बातमी पोलीसास समजून ते झाडा घेण्यास देवधरच्या घरी जाणार असे त्या मुलास समजून त्याने आमचे घर जवळ पाहून आमच्या घरांत जाळीवाटे टाकून दिल्ही व एक कटार व कांही भाले मात्र त्यांनी जवळ ठेविली. इतक्यात पोलीसाचा झाडा घरांत येऊन त्या देवधरास पकडून त्याजवर खटला सुरू जाहला. ही बातमी आम्हास आमचा मित्र दत्तात्रय भिस्कुटे याणी ताबडतोब पत्राद्वारे मुंबईस कळविली. तेथे लागलीचे रात्रीचे मेलने पुण्यास येऊन भिस्कुटे यांच्या सहाय्याने हत्याराची निट व्यवस्था करून लागलीच परत मुंबईस गेलो. देवधरानी मंडळीपासून कोणाचीही नावे सांगितली नाहीत. त्यावेळेस चापेकर नांव घे असे पुष्कळ लोक त्यास सांगत होते. पण त्याने तिकडे लक्ष दिले नाही. पुढे तो अज्ञान समजून कोर्टाने सोडून दिल्हा. असा या समाजावर परिणाम जाहला.

प्रथमतः आम्हाला फार वाईट वाटले. पण पुढे विचार करिता गोफण्या मारुतीने आमच्या हिताकरिताच असा प्रकार केला असे वाटले. कारण मी खात्रीने सांगतो की तो जर समाज चालू रहाता तर

आमचे काम गुप्त रहाणे कठीण होते. पुढे आम्ही उभय बंधु वडिलांसह पुण्यास आलो मग आम्ही विचार करू असे ठरविले की आता उगीच मंडळी न जमविता जे करणे ते आपण आणि भिसकुटे या तिघाऊ मिळून करायचे म्हणजे फुटणार नाही असा विचार करून आम्ही वागू लागलो. सर्व मुलांस आमचे घरी येणेची बंद केली. एक भिसकुट्या मात्र येई. तोही रात्री यायचा असा परिपाठ ठेविला. इतक्यात राष्ट्रीय सभा येऊन पोचली.

**राष्ट्रीय सभेवर टीका**

यावर्षी पुण्यातच राष्ट्रीय सभा असल्यामुळे हे काय बंड आहे हे समक्ष पहाण्याची इच्छा होती. तत्पूर्वी गावात सामाजिक सभेबद्दल जुन्या नव्या लोकांत मोठा तंटा माजून राहिला होता. आम्हाला राष्ट्रीय सभाही मान्य नाही. आणि सामाजिक परिषद त्यांतून मान्य नाही. तथापि राष्ट्रीय सभेपासून जरी फायदा होण्याचा संभव नाही तरी तोटाही पण नाही. म्हणजे तोटा आहे पैशाचे संबंधीचा. लक्षावधी रुपये खर्च होतात हा तोटाच होय पण इतकेच समाधान की धार्मिक बाबतीत तरी तोटा नाही. यामुळे ती राष्ट्रीय सभा वर्षातून २५ वेळा का होईना तिची आम्ही करीत नाही. पण तिच्या पोटांतील जी एक या सुधारकानी चाळमुण कोंबली आहे ती मात्र आम्हाला सहन होत नाही. आम्ही जे सुधारक लोकास कसे शत्रू समजतो त्याचे मुख्य कारण हेच होय. आम्ही जाणून आहोत की सांप्रत काळी आम्ही स्वतंत्र आहो. तेव्हा जे ज्याला वाटेल तसे तो करतो. आपण मात्र शास्त्र मार्गाने चालावे पण त्या आमच्या स्वातंत्र्याला सुद्धा कायदा याने बंधन करण्याची तजवीज सुधारक लोकानी मांडली त्याबद्दल आम्ही त्यांचा सूड काय म्हणून उगवू नये. अलबत उगविला पाहिजे. यावेळेस गावात उभय पक्षांचा जोराने वादविवाद चालू होता. एका पक्षाकडे बाळ गंगाधर टिळक, दुसरीकडे माधव गोविंद रानडे असे अग्रणी होऊन वाग् युद्धास आरंभ झाला. ह्यावेळेस जुन्या पक्षास श्रीधर विटठल दाते अनुकूल जाहले. हा दाते मनुष्य धर्माचे कामांत चांगला अभिमानी आहे व त्याला इतर मंडळीपेक्षा आपले देशाचा अभिमान जास्त आहे व याकरिता वाटेल तितका पैसा खर्च करील पण आपला शह खरा करील असा बाणेदार मनुष्य जुन्या पक्षास मिळाल्यामुळे उभय पक्षास बराच जोर होता. पण त्या जोरांत कांही अर्थ नाही. कारण ज्या प्रयत्नांत तेज नाही म्हणजे बंड नाही तो प्रयत्न व्यर्थ हो. राष्ट्रीय सभेच्या मागण्यास जे यश येत नाही त्याचे कारण तरी हेच आहे. कारण इंग्रज लोक जाणून आहेत की यांची राष्ट्रीय सभा म्हणजे अख्या दिवसाची चंगल, ऐशआरामाची मजा-आणि बडबडीचा सुकाळ यापेक्षा याच्यात जास्त कांही एक नाही. जर असे टीकेसारखे तेजस्वी म्हणजे पाणीदार लोक आमचे असते तर ते झक मारीत आमचे बोलण्याचा विचार करीते. असे टीकेने राष्ट्रीय सभेने आपले हित करून घेतले म्हणून आम्ही त्याचा कित्ता घेतला. पण अखेर मागण्या कबूल केल्यावर त्या पाणीदार लोकांनी काय तजवीज केली इकडे कोणाचे लक्ष नाही. तर गेल्या वर्षी राष्ट्रीय सभा जाहली त्यापेक्षा यंदाची झोकदार जाहली पाहिजे ऐशआराम खाणेपिणे हांड्याझुंबरे बोलणे लिहिणे हे काढून पैशाचा चुराडा उडविला की देशहिताची कमाल जाहली असे हे विद्वान म्हणोन घेणारे नंदीबैल समजतात. असो.

**सुधारकाच्या संपादकावर हल्ला करण्याचा बेत**

हा विषय पुढे येणार असल्यामुळे मी या ठिकाणी जागा अडवित नाही. सारांश, जुन्या नव्या पक्षाचा नुसता वाचाळू तंटा चालला होता. तो आम्हास बिलकूल पसंत नव्हता. म्हणून आम्ही उभय बंधूनी विचार केला की या सुधारकापैकी कोणीतरी चांगली व्यक्ती पाहून तिला दंड करणे हितावह होईल. आमचा पूर्वीपासून सुधारकपत्रावर मोठा डोळा होता. पण ज्यावेळेस आगरकर त्याचा एडिटर होता त्यावेळेस आमचे

विचार कृतीरुपाने बाहेर प़डण्यास असमर्थ होते. म्हणून तो पापी आमच्या हातून सुटला. त्यावेळेस कांहीतरी कृती केली पाहिजे अशी उत्कट इच्छा होऊन ती पूर्ण करण्यास सुधारक पत्राच्या दोन एडिटरापैकी सापडेल तो घ्यावयाचा असा संकल्प करून आम्ही शोध घेवू लागलो. हे सुधारक पत्र जुन्या लोकास आणि त्यांच्या चालीरितीस नेहमी नांवे ठेवित असते. धर्मशास्त्राचे निरनिराळे अर्थ करून त्याविषयी लोकांत गैरसमज उत्पन्न होईल अशा रितीने (फाटले आहे) लेखनपद्धती असते. जे खरे धर्माभिमानी असतील त्यांच्या हृदयांत घरे पडतील अशी उद्दाम भाषा इंग्रजांच्या जोरावर हे पत्र वापरीत असते. हे पत्र वाचून आमच्या मनाची जी स्थिती होत असते ती लिहावयास मी असमर्थ आहे. कित्येक वेळा आमचा कोप अनावर होऊन आम्ही सुधारकांचे अंक जाळून टाकले आहेत. पण तो कांही मन शांत होण्यासारखा दंड नव्हे. म्हणून आम्ही देहदंड करावयाचा विचार करू लागलो. स्वजातीयपणा मनांत आला की आम्हाला त्याची कींव येत असे. म्हणून आम्ही असा बेत केला की याना देहांत दंड न करता साधारण दंड करायचा आणि मग ताकिदपत्र पाठवून त्याना इशारा करायचा. ऐकिले तर बरे आहे नाही तर यांची कीव करायची नाही असा बेत केला. आणि यांची घरे पाहून ठेविली. टेहळणी सुरू केली. इतक्यांत एके दिवशी कळाले की आनंदोद्भव थेटरांत संस्कृत नाटक आहे तेव्हा आम्हाला वाटले की ह्या ठिकाणी हे एटिटरद्वय येईल. पण त्यादिवशी कांही योग जुळून आला नाही. पुढे आर्यभूषण थिएटरमध्ये भावे स्कूलची विद्यार्थी मंडळी हॅम्लेट नाटक करणार असे कळले. तेव्हा आमचा सिद्धांत जाहला की या नाटकास येतील असा विचार करून कारण भावे स्कूल हे यांचे विरुद्ध आहे तेव्हा मत्सरबुद्धीने हे या नाटकास येतील असा विचार करून आम्ही दोघे आर्यभूषण थिएटरचे बाहेर गेलो पण आत कोणकोण आले आहेत हे बाहेरून समजेना. मग कसेतरी चार आण्याचे पैसे दिले आणि मी थिएटरमध्ये जाऊन आलो तो त्या ठिकाणी सुधारकाचा पटवर्धन नांवाचा एडिटर बसला आहे व तो दुसरा व नूतन मराठी विद्यालयाचा मास्तर (कुलकर्णी) हे दोन गृहस्थ माझे ओळखीचे निघाले. ते मी बाहेर येऊन बंधूस सांगितले व मग ते आत जाऊन त्यांनीही शकून ठेविला. व नाटक संपते केव्हा याची वाट पहात आम्ही बसलो. तो नाटक सुटले. पहिल्यांदा कुलकर्णी बाहेर प़डला त्याला मी हामजीखानाचे तालमीपुढे जो बोळ गेला आहे त्याच्या तोंडाशी साधारण डाका दिला. हा पाट आणि डोक्याच्या भागाला सौम्य रितीने बसला असावा तेव्हा त्याचेबरोबर दोन तीन मनुष्य होती. मी डाका देऊन शीघ्र गतीने निघून गेलो. यामुळे पटवर्धन थिएटरमधून निघाला त्याच्या पाठीवर आमचा भाऊ होताच. त्याला मी बुधवारांत मिळालो आणि त्याच्या पाठीमागे जात असता शालूकराचे बोळांत फुट्या बुरजाखाली त्याला आमच्या बंधून पुढे होऊन लोखंडाचे प्रहार केला. हा प्रहार कानसिल आणि डोक्यास लागला असावा. यावेळीस याच्याबरोबर तीन-चार मंडळी असावी. हे काम करून आम्ही घरी आलो व परमेश्वराचे फार फार आभार मानिले व दुसरे दिवशी लोक काय बोलतात याकडे आमचे लक्ष लागले. तो एकंदर स्वधर्मनिष्ट लोकास फार आनंद झाला असे दिसते. तेणेकरून आम्हाला फार आनंद जाहला व आम्ही एक मोठी धर्माची कामगिरी बजाविली असे आम्हाला वाटले. मग आम्ही विचार केला की आता यांना ताकीदपत्र पाठवून इशारा देण्यास कांही हरकत नाही यद्यपि आपण दोघे जण आहोत. तरी आपली एक मंडळी आहे असा यांचा एक समज जाहला पाहिजे. तेणेकरून यांना दाब बसून पुनरपि हे धर्मनिंदा करणार नाहीत असा विचार करून त्याप्रमाणे आम्ही एक पत्र लिहिले. याची नक्कल आम्ही ठेविली नाही. पण त्याचा सारांश येणे प्रमाणे होय.

**‘सुधारक’कर्त्यांना धमकी**

“ सुधारक लोकास सूचना तुम्ही जसा विधवा विवाह प्रतिबंधन निवारक समाज काढला आहे, तशीच आर्यधर्म प्रतिबंधनिवारक मंडळी अथवा स्वधर्मकरीता जीव देणारी आणि घेणारी मंडळी काढली आहे

या मंडळीस भीक मागणारे कांग्रेसही नको आणि सामाजिक परिषद त्यांहून नको. आमच्या हिंदूधर्मात कशाही चाली असोत. सिमग्यातल्या सुधारकांनी वाईट अनिष्ट चालीपासून तो एकंदर प्रकार आम्हाला इष्ट आहे. आमच्या धर्मात अगर रूढ चालिरीतीत किंचितही फेरफार करण्याची गरज नाही. करिता या पत्राने एकंदर सुधारक व मन सुधारक लोकास फर्माविण्यात येते की, यामागे जे सुधारक लोकानी केले ते त्यास माफ आहे पण पुढे मात्र सावधगिरीने वागावे. नाहीतर मोठ्या दिलगिरीने व डोळ्यास अश्रू आणून तुमच्या मानेवर तलवार चालविणे भाग पडेल. करीता केले सूचनेस मान देऊन नीट वागा. वाडवडिलास स्मरा आणि धर्मात हात घालून एकंदर समाजाचे वैरी होऊ नका. या उपर तुमचे प्रारब्ध.” याप्रमाणे पत्रसुधारकाचा एडिटर देवधर म्हणून आहे त्याला न्यू इंग्लिश स्कूलचे पत्यावर पाठविले ते त्यानी सुधारक पत्रात तारीख २५-११-९५ चे अंकात सारांशाप्रमाणे दिले आहे. यानंतर मुंबईत ठाकूरद्वारी सामाजिक परिषदेविरद्ध सभा भरली होती त्या सभेत आम्ही पुढे होऊन हे श्लोक म्हटले हे श्लोक माझ्या भावाने तयार केले आहेत. आम्ही कविता कामापुरती करू शकतो. आम्ही कांही कवि नव्हतो तरी ज्या गोष्टीची आम्हाला आवड आहे त्या गोष्टी विषयी जेणे करून लोकांत आवड उत्पन्न होईल ती गोष्टी करायची असा विचार करिता लोकांत संगीताची विशेष आवड दिसून आली तेव्हा त्या संगीत मार्गाने आपले विचार लोकापुढे मांडू असा विचार करून आम्ही कवितेच्या पाठीमागे लागलो. त्यात कविता करण्याचा छंद मला फार लागला. म्हणून मी स्वदेश अभिमानावर पुष्कळ कविता केल्या. आमच्या बंधूस जरी जाग नसे तरी मनांत आणीत तेव्हां कविता करित. सभेत पाटिभर बोलणे आम्हाला बिलकुल पसंत नाही म्हणून श्लोकांत आपला अंतस्थ हेतू खूप लोकास समजावा याउद्देशाने आमच्या भावाने दोन श्लोक तयार केले. मात्र एका श्लोकांत सामाजिक सभेचा मजकूर असून दुसऱ्यांत हायकोर्ट वकील याला उद्‌देशून आहे. हा ब्राम्हण धर्म त्यावेळेस बनियाच्या पंक्तीस बसून गोमांस भक्षण केल्याचा आरोप साबीत जाहला होता. तेव्हा ते आम्हाला सहन न होऊन आम्ही त्याच्यावर श्लोक रचून सभेत म्हटला. श्लोक खाली देतो.

ऐका राष्ट्रीय मंडपी जरी भरे सामाजिकांची सभा ॥
आर्ये सात्धकरू नये ॥ खचित त्या कॉंग्रेस ही निष्प्रभा ॥
धर्माची अवहेलना परिषदी आम्ही न ऐकू कधी ॥
दंडा घेऊनिया सुधारक चमू हाणोनी पाडू आधी ॥ १ ॥
म्लेंच्छादिकजनासी फार आदरे पंक्तीस बोलावूनी
खाती भिसकिट पाव मांसमदिरा धर्मासी धिक्कारुनि ॥
धर्मध्वंसक जे खरी परी सतत चांडाळ जाणा परे ॥
नाही लाज कसी सुधारक जना हाणू तया खेटरे ॥ २ ॥

मी वर लिहिलेच आहे की आम्ही कांही विद्वान काही नव्हत. करीता कविताशास्त्राप्रमाणे यांत अनेक दोष असतील तिकडे दुर्लक्ष करुन वाचकानी अर्थग्रहण करावे. या श्लोकावर पुष्कळ लोकांच्या टाळ्या पडल्या. सुधारक लोकास मात्र याचा अर्थ झोंबल्यासारखा होऊन ते सभेतून उठून गेले. सुधारक लोकास आमच्याकडून मार बसल्यामुळे ह्या लोकास चांगला दाह बसला. ज्यानी त्यानी आपल्या पाठीमागे पुरभये ठेविले. गाड्या वाचून कोणी हिंडेना व त्यानी या पूर्व चिन्हावरून ताडीले की जर सामाजिक सभा राष्ट्रीय सभेत जाहली तर खात्रीने मारामारी होणार असे समजून त्यानी असलेला हेका मागे घेऊन सामाजिक परिषद दुसरे ठिकाणी बसविण्याचे ठरविले. तेणे करून लोक फार खुष जाहले आणि आम्हालाही कृतकर्माचा विशेष आनंद जाहला. तरी सामाजिक सभेचा मंडप जाळून टाकण्याचा प्रयत्न चालू होता

आम्ही सर्व आग लावण्याचे साहित्य घेऊन रात्री दोन वाजता फर्ग्युसन कॉलेजचे टेकडीवर दोन तीनदा गेलो पण मंडपाचे काम अखेरपर्यंत अहोरात्र चालू असल्यामुळे तो बेत सिद्धीस गेला नाही.

**सामाजिक सभेचा मंडप जाळण्याचा प्रयत्न**

सामाजिक सभेनेही आपल्या सभासदास तिकिटे ठेविली होती. सभेत आपला प्रवेश जाहला पाहिजे म्हणून आम्ही यत्न करू लागलो. तेव्हा आम्ही काही सिकलेल्या मुलांस असा सल्ला दिला की एखादा सुधारणेचा समाज काढाल तर आपणास सामाजिक सभेची तिकिटे तरी मिळतील तेव्हा आमच्या आग्रहास्तव त्यांनी यंगमेन रीफॉरमरी म्हणून एक क्लब काढून त्याच्या नावाने तिकिटे मिळविण्याविषयी अर्ज केला तेव्हा महादेव गोविंद रानडे यांजकडून बोलावणे आले की आमच्या सभेच्या मागील कागदपत्रे घेऊन कोणातरीस आमच्या भेटीस पाठवावे.

**रानड्यांशी भेट**

हे ऐकून आमचे शिकले लोक भयभीत होऊन कोणी जाण्यास तयार होईना. तेव्हा मी सभेचा सेक्रेटरी म्हणून काही लटकेच कागद तयार करून त्यांच्या घरी संध्याकाळचे आठ वाजण्याचे सुमारास गेलो तेव्हा सुधारकांचा गुरु झोपाळ्यावर बसला होता दुसरा कोणी परगावचा गृहस्थ गप्पा मारीत बसला होता. या दोघांच्या जवळच मला खुर्ची मिळून मी बसलो होतो. बराच वेळ त्यांच्या गप्पा जाहल्या पण त्या धड ना इंग्रजी ना मराठी अशा धेडगुजराथी भाषेत जाहल्या म्हणून त्यांचा एकंदर सेवट मला समजला नाही. त्यांच्या भाषणांत पटवर्धन याला मारावयाची गोष्टही निघाली होती पण ते जाणत नव्हते की त्याचे अधीकारण आपले जवळच बसले होते. यांचा संवाद संपल्यावर रानडेबोवा माझेकडे वळले व माझी चौकशी करून एका मनुष्यास कागदपत्र पाहण्यास सांगितले. त्यानी ते माझे बनावट काम पाहून असी जात काय आपली नाही म्हणून विचारले. मी उत्तर दिले असल जात आम्ही सभेच्या बाहेरी कधी देत नाही. मग रानडे म्हणाले की, तुम्ही कोणाची संभावित गृहस्थाची ओळख द्या म्हणजे तिकिटे देऊ. त्यावर मी उत्तर दिले की, मी संभावित आहे दुसऱ्याच्या नांवावर कधीही विकला जाणार नाही. आपला विश्वास असल्यास द्या नाहीपेक्षा गरज नाही असे म्हणून मी निघून आलो. पुढे त्यांचा मनुष्य एकदोनदा माझ्या भेटीस आला पण भेट दिल्ही नाही. होता होता राष्ट्रीय सभेचा दिवस येऊन ठेपला. गावात परगांवचे लोकांची गर्दी उडून गेली. आमच्या शिकलेल्या विद्वान मंडळीचा आनंद तर गगनांत मावेना. सर्वाची लगबग उडून गेली आहे. त्याचा आनंद पाहून आमच्या घरच्या लहान पोराची आठवण जाहलीं त्या जशा भावला भावलींचा लग्न समारंभ करतात आणि त्या लटक्या खेळांत त्यानी मग्न होऊन खऱ्या लग्न समारंभापेक्षा ही आनंद मानतात पण सुकृतास किंचितही ते पाहून आनंद न होता त्याचे अज्ञानाचे मात्र राहून राहून हसे येते व पोरी म्हणून कौतुक करितात तव्दत या विव्दान म्हणविणाऱ्याची कृती होय. त्यांनी लुटुपुटूची पलटण तयार केली. तिची बिनहत्यारी कवाईत करून त्यातच तालीम जाहले. असा भावातील जीव नसल्यामुळे खेळणे व्यर्थ वाटते तसे शस्त्र रुपी जिवित्व ज्या पलटणीत नाही ती निर्जिव होय. राष्ट्रीय सभेचे थोर स्वरूप आत प्रवेश झाल्याखेरीज समजणार नाही असे जाणून आम्ही फुकट तिकिट मिळविण्याच्या मार्गास लागलो. तो एक मद्रासी बाबू फर्ग्युसन कॉलेजच्या पाठीमागे असलेल्या टेकड्यावर हवा खाण्यास आला होता त्याच्यासी आम्ही जरा प्रसंग आणून तो जातीने सुधारक आहे असी खात्री झाल्यावर आम्ही त्याचे तिकिट हिसकावून घेतले व निघून गेलो. त्या तिकिटावर आम्ही पाळीपाळीने आत जाऊन मजा पहात होतो. आत गेल्यागेल्यापासून आम्हास पुष्कळ प्रकार पहाता आले. हे विद्वान म्हणविणारे लोक सेवटल्या रावबाजीला

अनुक्रमणिका

नांवे ठेवतात की याने सगळे राज्य खाऊन ऐशआरामांत आणि चैनीत घालविले. पण त्यांची कृती जर पाहिली तर रावबाजी बरा असे म्हणावे लागले. कारण सर्व कामात स्वदेशहित हे काम फार कठीण आहे. इतिहासाचे पारायण करणाऱ्या या अति शहाण्याना मी विचारतो की त्यांनी कधी रिकामी बडबड करून आणि खाण्यापिण्याची चैन करून स्वदेशहित अमक्यांनी केले असे वाचिले आहे काय? जे जे म्हणून इतिहास प्रसिध्द पुस्तक होऊन गेले त्यापैकी एकाने तरी राष्ट्रीय सभा करून अथवा व्याख्याने देऊन सर्व जगाची एकी करण्याचा प्रयत्न केला आहे काय? नाही असेच उत्तर देणे भाग पडेल. स्वदेशहिताकरता स्वप्राणाची पर्वा न करता कोट्यावधी पुण्यवान लोक समरांगणी धारातिर्थाचे ठिकाणी पतन पावतात तेव्हा स्वदेशहित होते. फुकट होत नाही. एवढी अक्कल या आधुनिक विद्वानाना नसावी. मोठ्या दुर्दैवाची गोष्ट होय.

**जीवनाचे सूत्र**

शालेय इतिहासात तोंडपाठ करून करावयाचे काय? शिवाजी अमुक साली जन्मला अमुक साली मरण पावला हे पाठ करण्यात कांही अर्थ नाही तर त्यांनी जन्मून मरेपर्यंत केले काय? राष्ट्रीय सभा करून गोरगरीबाची पै पैसा जमा करून स्वदेशहिताच्या ढोंगाखाली वर्षातून एकदा आपल्यासारखेच स्वहितभोंदू जमवून चैन केली का दुसरा काही भयंकर विचार मनात आणून आपले सर्व आयुष्य सिलमित्रासह स्वदेशहिताकरता दुःखात लोटले? या गोष्टींचा धडा जर इतिहास वाचण्यापासून घेतला नाही तर फायदा काय तर आजपर्यन्त मी राष्ट्रीय सभेची हकिगत दरवर्षी वर्तमानपत्रांत वाचीत असे त्यावरून माझी खात्री जाहली होती की हे निव्वळ ढोंग आणणाऱ्या गोष्टीचा मी पूर्ण विचार करिता माझे जे सिध्दांत जाहले आहेत ते येथे देणे जरुर आहे. पहिल्यांदा मी असा विचार केला की या राष्ट्रीय सभेचे जनक म्हणजे पुढारी " ह्यूमब्रंडला" वगैरे जे युरोपियन आहेत हे काय बंड आहे. म्हणजे आम्ही यांच्यावर कितपत विश्वास ठेवावा. जे इंग्रज आम्हाला या देशात किंचित विरुध्द केल्यास राजद्रोहया सदराखाली जन्मठेप काळ्यापाण्याची शिक्षा ठोठावतात तेच इंग्रज "ह्यूमब्रॅडला, सारखे अस्सल गोरे आम्हास विरुध्द उत्तेजन देत असतात. त्यांना विलायतेत जिवंत कसे ठेवतात. सर्व खपेल पण घरभेदेपणा सहन होणार नाही. कसे याचा हे जर खरे आहेत तर असा प्रकार कसा होतो किंवा हे संभवले विचार करीता माझा सिध्दांत नाइलाजे हे सर्व नाटक आहे. हिंदु लोकांचेविचार कधी क्रूर मार्गाकडे वळल्याचे म्हणून त्यांना योग्या वळण देण्यास हे मायावी राज्यकर्त्याच्या सल्ल्याने आम्हा लोकास ठकविण्यासाठी पुढे सरसावले आहेत यात बिलकुल शंका नाही. तसे नसते तर परोपकाराकरित याना स्वजातीयाकडून देहांतदंड सहज करायची पाळी केव्हाच आली असती. शिंगे मोडून वासरात शिरावयाची ही युक्ती होय. जरा एखाद्या युरोपियनाच्या मनात आले की आपणास हिंदू लोकाकडून बहुमान मिळाला पाहिजे. की तो लागलीच पार्लमेंटमध्ये हिंदुस्थानविषयी प्रश्न निघाला की त्यानी हिंदुस्थानची बाजू घेऊन वादविवाद करावा की लागलीच आमच्याइकडची शिकलेली मंडळी टिऱ्या बडवायला आलीच म्हणून समजावे. मग तो ठरला हिंदुस्थानचा कैवारी. तो जर कांही इकडे आला तर त्याची गाडी गाय ओढतील, दीपोत्सव काय करतील, मिरवणूक काय काढतील, की झाले यांचे देशहित. माझ्या आठवणीत मी निदान दोनतीन युरोपियनाचे समोर समारंभ पाहिले. त्यांचे समारंभ पाहून आम्ही उभय बंधूना संताप येत असे. वेषधारी संन्यासी जो अर्जुन तो जसा घटकेत मजा करून अखेर सुभद्रा घेऊन पळून जातो तद्वत हे गोरे हिंदुस्थानात येऊन सर्वास ठकवून जातात. यशश्री घेऊन विलायतेत निघून जातात. भेद इतकाच की वेषधारी संन्यासी सुभद्रेस घेऊन पळाल्यावर द्वारकेतले लोक समजले की हा लुच्चा अर्जुन होय. तसे आमचे विद्वान समजत नाहीत. कारण जर समजले तर या गोऱ्याच्या नादी कोण लागते ना. अस्तु. यंदा पुण्यासच राष्ट्रीय सभा असलेमुळे या विद्वान लोकाचे स्वदेशाकरिता काय दीर्घ

अनुक्रमणिका

प्रयत्न आहेत ते स्वनेत्राने पाहाण्यास सापडले. या राष्ट्रीय कामास जिवापाड मदत करण्याकरीता मद्रासकडचे एक बलि मनमोहन घोस की काय, मला त्याचे पूर्ण नांव स्मरत नाही पण तो राष्ट्रीय सभेचा भक्त आहे. विशेष खूण तो हिंदु असून पोशाखाने नखशिखांत युरोपियन होता. हिजड्या सारख्या मिशा काढतो. रंगाने गोरा असता तर बरे झाले असते. कारण तो इंग्रजी पोशाख मासुख तरी दिसला असता. पण तो अंगाने काळा असल्यामुळे आणि मिशा कापल्या असल्यामुळे इंग्रजी पोशाखाने त्याना फार विलक्षण सौंदर्य आले होते. हुबेहुब एकादा बाळ्या जसा याची आपल्या गाडीवर गाडी हाकणारा युरोपियन ठेवील असा. आजही त्याला (फाटले आहे) दरमहा रुपये ५०० द्यावे लागतात. त्यानंतर त्याची स्वदेशभक्ती चांगलीच दृष्टीस पडते. उघडच आहे. राष्ट्रीय हित करीत असता त्यांत अनंत अडथळे मार्गात येणार. तेव्हा अशा वेळेस रथ हाकण्याचे कौशल्य कांही सामान्य नाही लागत. करीता हिन कातर बैल मनुष्य हिंदुस्थानांत कोठला मिळायाला? तेव्हा अलबत विलायती आणला पाहिजे. पण एक शंका आहे की ज्या देशात कुशल सारथी मिळत नाहीत त्या देशांत रथी कसा मिळणार. कारण रथी ही सारथ्याच्या वरची पायरी आहे. या राजश्रीला मी जेव्हा पहिल्यांदा गाडीत जाताना पाहिले, तेव्हा मी प्रथमतः गाडी हाकलणाराच घौस समजलो आणि याला समजलो गाडीच्या पुढे हाकलणारा सिपाई. असो. ही एक स्वदेशभिमानीची मूर्ति पुण्यपतनस्थजनास मदत करण्यास अगोदरच आली होती. सिवाय आमच्या शहरांतल्या शाळेतल्या लहान मुलांपासून तो म्हातार्‍यांपर्यत एकंदर मदत अगदी मनापासून होती. आता झाले म्हणजे काय याची फोड करणे मला जरूर आहे. कारण इतर देशात स्वदेशहिताकरीता झटणे याची व्याख्या निराळी करतील. त्यांना वाटेल की हे स्वदेशाभिमानी जीवन उदास होऊन स्वदेशाकरीता मरण्यास तयार जाहले असतील पण तो समज चुकीचा आहे. या वेळेस आमच्या पुणे शहरांत देशोदेशीचे स्वदेशाभिमानी शत्रू जमा जाहले आहेत ते स्टेशनावर उतरल्याबरोबर स्वयंसेवक मंडळी त्यांच्या चरणसेपुटासह सामान हाती घेऊन महाराज इथे पाऊल टाका, पुढे दगड आहे, माती आहे, असी वरदी देत स्टेशननजीकच केलेल्या छोट्याशा पण सुंदर मांडवात त्यांचे प्रथमपूजन होते. त्याठिकाणी या पाहुण्यांना फळफळावळच हकानी यथेष्ट मिळते आणि गळ्यांत एक सुवासिक पुष्पहार. इतके जाहले की मग वाड्यांत बसून महाराष्ट्रीय सभेच्या नजीकच राहण्याकरिता केलेल्या सुंदर खोल्यात लहान पण सुबक पलंगावर गादीवर नेऊन बसवायचे.

**पुण्यांतील राष्ट्रीय सभेच्या महोत्सवावर टीका**

या खोलीत सर्व व्यवस्था असायची. एक बायको असती की नाही हे मात्र ठाऊक नाही. बाकी खायला प्यायला कोणत्याही गोष्टीची ना नाही. अभक्ष भक्ष अपेयपान याची विपुलता होती. स्नानाला उष्णोदकाचे हजारे केले होते. खाली सुंदर एक चौकोनी दगड आणि वर हे स्वदेशाभिमानी विराजित होऊन मग डोक्यावर उष्ण पाण्याचा हजारा सुटायाचा नंतर देशहित चालायचे. रात्री विजेच्या दिव्याचा प्रकाश चंद्राने हक्काप्रमाणे पाडायचा, आणि त्या उजाडांत हे देशाभिमानी हिंडायचे आणि मग देशहित चालायचे. दिवसा यांचा राष्ट्रीय दरबार भरायचा त्यावेळेस नावाजलेले देशाभिमानी शूर सभेत आले की टाळ्यांचा गजर व्हायचा. टिळक आले, वाजली टाळी. रानडे आले वाजल्या टाळ्या. आणि सुरेंद्रनाथ बानर्जी आले की काय तासतास टाळ्या झडायच्या हो. मी चुकलो. सुरेंद्रनाथ बानर्जी म्हणजे देवेंद्रनाथ इंद्रच होय. कारण याच्याबरोबर मागे सांगितलेली पलटण होती. असे वीरशिरोमणी जमले की वाग्युद्धास आरंभ व्हायचा. याचा प्रतीपक्षी जो इंग्रज तो मात्र तेथे नसतो. त्याचे एखादे काळे डगले मात्र तेथे असते. तो या वाग्शुराचे धाबे दणाणुन जाऊन फेफे उडून जायची. कदाचित कोणी सरकारी आमदाराने जर विचारले अथवा ज्यास मंदिरात जर उभे केले तर माझ्या बोलण्याचा असा अर्थ नाही. असे म्हणून हजारो रुपये खर्चून

वकील देऊन भांडायचे. हरहर देशबांधवो, इतके हल्लक का झाला तुमच्या मज्ञातंतूत खरा विचार कसा येत नाही की ज्यावेळी शिवाजी, बाजीराव, नाना फडणवीस आदि करुन पूर्वजांचे मनांत स्वदेशहित करण्याचे आले त्यावेळेस त्यांना का ह्यूम सो अथवा ब्राडला साहेबाची अक्कल घेणे भाग पडले होते काय? ज्यावेळेस या पुण्यवान पुरुषांनी यवनापासून आपणास योग्य  हक्क मिळाले पाहिजेत अशी इच्छा करून यत्न सुद्धा केला तेव्हा चतुःसींगीच्या मैदानांत मोठा राष्ट्रीय मंडप घालून विजेचे दिवे लावून सर्व देशावरचे वाणी उदमी शेट सावकार एके ठिकाणी जमून दिवसा बडबड करून आणि रात्री पलंगावर पडून मिळविले काय असे कोठे तुमचे वाचण्यात आले आहेत? कदाचित म्हणाल अमेरिकेत राष्ट्रीय सभेपासून हित जाहले तर त्याची ही निराकरण मी मागील पृष्टी केले आहे. मला इंग्रजी बोलता अथवा वाचता येत नाही. पण जी माहिती मला जाहली आहे ती खात्रीची आहे. याविषयी मी जितकी चर्चा करीन तितकी थोडी होणार आहे. करीता थोडक्यांत एवढेच सांगतो की मित्रहो सत्तेपुढे शहाणपण नाही, ही जुनी म्हण लक्षात ठेवा आणि एकतर त्याना मिळून जिकडून हित होईल ते करा. यद्यपि त्यानी तुमच्या इच्छेविरुद्ध कर बसविला तरी परकीय समजून सहन करा. त्यावर इलाज बडबड करणे किंवा वर्तमानपत्रांत लिहिणे हा नव्हे. जर परकीयांचा जुलमी प्रकार तुम्हाला सहन होत नसेल तर जीव, धन, इष्ट, मित्र, सुत, कन्या यांची माया सोडा. मनगटाचे जोरावर हक्क मागा. ती तुमची लायकी आहे असे मला वाटत नाही. कारण तसी लायकी जर तुमची असती तर केव्हाच उमजलो असतो. करीता व्यर्थ बोलण्यात लिहिण्यात इंग्रजावर टीका करून सक्त मजुरीच्या शिक्षेस पात्र होऊ नका. आणि मग हा जय मानून घेऊ नका. असो. अगर नुस्त्या बडबडणाऱ्या, शिक्षा झालेल्यावर तुम्ही पुष्पे उडवितात, तर सुदैवाने शिवाजीसारखा वीरपुरुष हिंदुस्थानांत उत्पन्न जाहला तर कोणती कृती करून त्याचे उतराई व्हाल? कारण सर्व कृती तुम्ही सामान्य जनास करून चुकलात. किंबहुना शिवाजीलाही पूर्व काळी जो मान मिळाला नाही तो तुम्ही सुरेंद्रनाथ बानर्जी, दादाभाई नवरोजी, ह्यूम वगैरे हीन लोकांस मान दिलात. यावरून यापलिकडे देशहित होणे राहिले नाही, असे समजता काय? चूक आहे तुमची. गर्जेल तो पडेल काय, आणि बोलेल तो करील काय? ही एक म्हण तुम्ही विचार कराल तर तुम्हाला शहाणपण घेण्यालायक आहे. करिता या म्हणीचा विचार करण्याविषयी विनंती करून मी आपल्या पुढील हकिगतीस लागतो. असा राष्ट्रीय महोत्सव पाहून आम्हाला फार वाईट वाटत असे. एकदां आम्ही असाही बेत केला होता की राष्ट्रीय मंडप जाळून टाकावा. पण लोकप्रितीचा विचार करीता हे करणे योग्य होणार नाही असे वाटले. जर सामाजिक परिषद या मंडपात भरली असती तर आम्ही हा मंडप जाळण्याचा प्रयत्न खात्रीने करणार होतो. पण पहिल्या प्रयोगाचे तिथे बिऱ्हाड आणल्यामुळे आम्ही जास्त कारस्थान न करिता नुसते बारकाईने याची अनन्वित कर्मे पहात दिवसा असा हा यांचा भातुकलीचा खेळ आटपून सर्व देशाभिमानी जन आपआपल्या गांवी निघून गेले. मग आम्ही मिशनरी उपदेशकांच्या पाठीमागे लागलो. आम्ही मुंबईस असता ब्यागबेवर उभे राहणाऱ्या युरोपियन मिशनऱ्यांचा पुष्कळ प्रकारे छळ करीत होतो. त्यांना दगड मारायचे, गडबड करायची.

### मिशनरी लोकांच्या मागे लागणे

एकवेळ आम्ही तेथे असलेल्या एका मंडमेची हातात अडकविण्याची एक पिशवी हरवली केली. त्या पिशवीत कांही इंग्रजी बुके तिच्या नावच्या चिठ्या आणि किल्ल्याचा एक जुडगा. एक पैसे ठेवण्याचे पाकिट हे मात्र सुंदर होते. यात फार सोई होत्या पण त्यांत एक पैसा आणि एक अडीच आण्याचे पोष्टाचे तिकिट इतके सामान होते. ही मडम ब्यॉटशँडवर राहते. तिचा बंगला आम्ही पाहून आलो. एकदा आम्ही पालव रोडवर असणाऱ्या चर्च मिशन हालची पाटी काढून आणली नी ती जाळून टाकली. पुण्यास आल्यावर या ठिकाणी असलेले युरोपियन मिशनऱ्याच्या पाठीमागे लागावयाचा बेत केला. आणि तपास चालविला तो ही

मंडळी बुधवारांत फिलिप्स अँड को. वरचे माडीवर उपदेश करीत असत असे कळले. त्या ठिकाणी प्रथम मी माझा आर्थबंधूना सदुपदेश करून व जाण्याविषयी मनाई केली. त्याप्रमाणे बरेच मित्रानी माझ्या बोलण्यास मान देऊन वर गेले नाहीत. त्यांची उपदेश करण्याची वेळी आली तरी वर एकही मनुष्य नसलेमुळे त्यांचे सर्व खुंटले. मी ज्या मंडळीस मनाई केली ती सर्व घरी निघून न जाता रस्त्यावर जमा होऊन उभी राहिली होती. वरच्या साहेब लोकास कळले की अमुक मनुष्य वर कोणाला येऊ देत नाही तेव्हा ते खाली येऊन म्हणू लागले की, हे तुम्ही कायद्याविरूद्ध करितां, आम्ही तुमच्यावर खटला करू. असे म्हणून त्यांनी पोलिसांस कांही सांगून तो घाट ही त्यांचा दिसला. तसा मी तेथून निघून जाऊन विचार केला की हे जर यत्न निष्फळ आहेत तर कांही तरी भयंकर प्रयत्न केले पाहिजेत. असा विचार करून आम्ही प्रथम या लोकांना शहरांत कोणीच जागा न देईल असे करावे. म्हणून त्या घरास आग लाविण्याची युक्ती योजू लागलो.

**मिशनऱ्यांच्या घराला आग लावण्याचा प्रयत्न**

या माडीचा जिना बुधवाराच्या भर सडकेवर सुटला आहे. जिन्याच्या तोंडासी खाली एक दार असोन वर एक दार आहे त्या दारास हे कुलुप लावून जात असत व खालचे दार नुसते कडी लावून बंद करीत तेव्हा आम्ही ठरविले की जिन्याचे खालचे दार उघडून वरील दारास आग लावून निघून जावे. खालच्या दारावर एक जाळी आहे तितून जिन्यांतल्या प्रकार बाहेरील लोकांस स्पष्टपणे दिसून येईल म्हणून आम्ही अशी युक्ती केली की जेणे करून आम्ही गेल्यावर मग आगीचा प्रकाश आत व्हावा. तो असा. मोठे एक उपरणे रॉकेलने भिजवून घेतले. ते प्रथमतः वर दारास चांगल्या तऱ्हेने लावून मग त्याला एक रॉकेलने भिजविलेली चिंधी बांधून ती खाली जमिनीवर लांबपर्यन्त पसरून त्यांच्यावर मग नळ्याची कौले पसरून त्याचा वोंगदा तयार करून त्यातून ती चिंधीं बाहेर किंचित आणली होती. उद्देश इतकाच की त्या चिंधीस पेटवून आपण निघून जावयाचे. कवलामुळे चिंधीचा प्रकाश बाहेर न पडता व त्या ठिकाणी हवा नसल्यामुळे ती चिंधी हळूहळू पेटून आपण लांब गेल्यावर मग ते फडक्याला शिलगवणार. असा प्रकार करण्यास आम्ही भिस्कुटे म्हणून आमचा मित्र होता त्याला प्रथम वर पाठविला व आम्ही दोघे त्याचे संरक्षण करण्यास मावळ्याचा वेष घेऊन चुरमुरे फाकित खाली बसलो. खाल्या दारास ज्यावेळी कुलूप लावावे म्हणजे विझविण्यास काही समय पडेल असा विचार करून एक चार पैशाचे कुलूप आम्ही विकत घेतले. तेही भिस्कुट्यापाशी दिले. व तो वर गेला. पण प्रथमचे काम असल्यामुळे तो घाबरून गेला. आणि कसेतरी काम करून खाली येऊन आम्हाला सांगितले केले. तेव्हा आम्ही त्याला घरी जाण्यास सांगितले. आम्ही दोघे तो प्रकार काय मजेचा होता हे पाहण्याकरिता इकडे-तिकडे हिंडून वाट पाहू लागलो. तो आग लागल्याचा बोभाटा काही ऐकू येईना. एक तास झाला तेव्हा आम्ही विचार केला की बेट्याने शिलगविले नाही. मग मी वर गेलो व बंधू खाली राहिले आणि वर जाऊन पेटवून खाली येऊन कुलुप लावून आम्ही निघून गेलो. किंचित लांब जातो न जातो तोच आग लागिल्याचे शिंग ऐकले. घरी येतो तो आमच्या घराजवळील बंबवाल्यांचेही शिंग ऐकिले. पण थोड्याच वेळांत परत टेलिफोन आला की, आग विझली. तेव्हा आमचा हिरमोड झाला की, प्रयोग तर झाला पण जसा व्हावयाला पाहिजे तसा झाला नाही. शोध करिता खाली लाविलेले कुलुप अगदी कुचकामाचे होते म्हणून आमचे दगडू हलवाई वाल्याने कुलुपासह कुस्ती करून दार खुले केले असे ऐकिले. चार पैशाचे कुलुप किती टिकाव धरील? जास्त किंमत खर्चावयास आम्ही असमर्थ होतो. म्हणून ही बाजू कच्ची राहिली. हा प्रकार झाल्यावर त्या घराचे मालकास इशारा दिला की, बाबा यांना काढून टाक नाहीतर कधीकाळी पुन्हा प्रयोग केला जाईल.

अनुक्रमणिका

## पलटणीत रहाण्याचा प्रयत्न

आमची विशेषइच्छा पलटणीमध्ये रहावयाची असल्यामुळे आम्ही नेहमी याविसी प्रयत्नशील होतो. दर रविवारी आणि बुधवारी जुन्या बाजारांत जाऊन त्या ठिकाणी जेपलटणीचे लोक आले असतील त्यांची मुद्दाम गांठ घेऊन त्यांना आम्हीविषयाची माहिती पुसत असता येणाऱ्या लोकांत जे आमचे मराठे असतत्याच्यासी (फाटले आहे) सोडून दिले होते. कारण या लोकांचा पक्का ग्रह या या इंग्रजांची करून दिला आहे की, तुम्हाला बुडविण्यास कारण ब्राम्हणहेच होत.

**ब्रम्हद्वेष्टी मंडळी**

सूज्ञ वाचकास माहित असेल की, पुणे आणि मुंबई शहरांत भलीमोठी एक ज्योतिबा फुले यांनी काढलेली ब्रम्हद्वेष्टी मंडळी आहेत. या मंडळींचे काम ब्राम्हणविषयी सर्व जातीत तिरस्कार उत्पन्न करायचा. त्याकरिता देशोदेशी फिरून व्याख्याने देऊन ब्राम्हण द्वेष वाढवावयाचा हा यांचा धंदा त्यांचे मुख्य वर्तमान 'दीनबंधू' म्हणून मुंबईस एक आठवड्याला पत्र निघते. या पत्रांत ब्राम्हणांची निंदा सर्व भरलेली असते. ज्योतिबा फुले मरण पावल्यावर लोखंडे म्हणून यांचे पुढारी झाली हे लोखंडे मूर्ख शिरोमणी असता स्वजातीयांत द्वेष पसरण्याची मुख्यकामगिरी हे बजावित असल्यामुळे इंग्रजांनी यांना "जस्टिस ऑफ पीस" म्हणून एक बहुमान दर्शक पदवी दिली आहे. अशा प्रकाराने पुष्कळ इंग्रजांकडून यांना मदत आहे असे सूक्ष्म अवलोकन करणाराला आढळून येईल. मात्र हा यांचा प्रकार दक्षिणच्या ब्राम्हणाविषयीच आहे. पाहू गेले असता दक्षिणी ब्राम्हणास जसा राजकीय गोष्टींचा नाद आहे व त्याकरीता बुद्धी आणि हिंमत ते जसे नेहमी खर्च करीतात तसे इतर देशांत दिसून येणार नाही. करीता अशा उलाढाली लोकांस सर्वसमान अनुकूल होणे इष्ट नाही. असा विचार परकीयांने करून त्यांनी या अज्ञान लोकांस बहुमान देऊन याकडे प्रवर्त केले आहे. यांत बिलकुल शंका नाही. यांच्या या आत्मघातकी प्रयत्नापासून पुष्कळ आमचे आनंदित जाहले असे होत आहे व पुढे होईल व परकियांचा फायदा होईल. प्रसंग आला आहे म्हणून या ठिकाणी त्यांच्या मताने खंडण करणे जरूर आहे. हे अज्ञान लोक नेहमी असे म्हणतात की ब्राम्हणानी राज्य घालविले. ब्राम्हण अप्पलपोटे आहेत ही दोन लक्षणे नेहमी पुढे करून ब्राम्हणाची मन मानेल तशी निंदा करून घेतात. प्रथम आरोप ब्राम्हणानी राज्य घालविले. हा आरोप पुढे आणताना शेवटला वजीची कारकीर्द उदाहरण घेतात. या बाजीरावाने ब्राम्हणभोजन घालून आणि पुष्कळ निंद्या प्रकार करून आपले राज्य परकियांच्या घशांत घातले. हा प्रकार इतिहास स्मरत असेलच. या राबबाजीला ब्राम्हण लोकांनी कधी चांगला म्हटला नाही व पुढेही म्हणणार नाहीत. त्यानी केल्या गोष्टी फार वाईट आणि देशास घातक झाल्या या बद्दल कोणाचाही मतभेद नाही. पण या ब्राम्हणद्वेष्ट्यांना मला इतकेच विचारावयाचे की ज्या वेळेस बाजीरावाने राज्य गमावले त्यावेळेस मराठे सरदार शिंदे, होळकर, गायकवाड, भोसले, सातारकर, कोल्हापूरकर हे सर्व गेले होते काय अथवा निवांत असून हातांत बांगड्या भरून लुगडे नेसून मराठमोळ्यात लावून बसले होते काय कि मिशा भादरून हिचडे झाले होते. त्यांना झाले होते काय हिंदुस्थानाचा बहुतेक भाग मराठी संस्थांनिकांनीच व्यापलेला आहे असे असून त्यावेळेला आपल्या गर्वाने वाकून साहेब लोकांच्या हातांत हात घालून आम्ही तुमचे दोस्त असे म्हणण्यास शरम कशी वाटली नाही बाजीराव बाहेर चालीचा होता हे जर खरे आहे तर सर्वानी गिल्ला करून त्याला कैद करून राज्यावर योग्य मनुष्य कांही नाही बसविला. उलट दूरदृष्टी नाना फडणवीस यांनी या पाजी बाजीरावाला बसवून राज्यांचा नाश करू नका असे वारंवार सांगता असता या

ग्वाल्हेरच्या शिंद्यांनी त्याचा पक्ष धरून त्याला गादीवर बसविले. या वरून राज्य बुडविण्यास कोण कारण झाला एकंदर पेशव्यांचे सरदार असतांना अखेर इंग्रजांस फितूर होऊन जागच्या जागी आपले गाठोडे सांभाळून राहिले. हा हरामखोरपणा कुठे फेडतील.

**ब्राम्हणांचे निर्दोक्षित्व**

आज जी संस्थाने हिंदुस्थानात हयात आहेत तितकी धन्यास बेमानी होऊन इंग्रजांस फितूर झाली म्हणून आज दृष्टीस पडतात. नाही पेक्षा तेव्हाच इंग्रजांची स्वहः करून टाकली. असती कदाचित कोणी असेही म्हणतील की, बाजीराव धनी होता तेव्हा तो चांगले वागेना सबब आम्ही त्याचा त्याग केला असे जर कुणी म्हणतील तर मी त्यांना विचारतो हीच कृती संभाजी वाईट निघाला म्हणून मोरोपंत पेशवे औरंगझेबाचे पक्ष धरला असता तर तुम्ही त्याला काय म्हटले असते. संभाजीच्या कारकिर्दीत आणि ते मेल्यानंतर जी कठीण स्थिती आली होती ती इतिहासांत वाचून तुम्हाला कळून येईल की, त्यावेळच्या शतांशाने बाजीरावाचे वेळेस कठीण प्रसंग आला नव्हता त्यावेळेस ज्या लोकांनी नेट धरून स्वदेशहितास्तव आटोकाट प्रयत्न केले त्यांची प्रशंसा करणे योग्य होय. तसा नेट पेशव्यांचे सरदार म्हणविणारे शिंदे, होळकर धरले तर आज या स्थितीला ते येऊन निंदेला पात्र झाले नसते. जे खरे देशाचे मालक जे पेशवे त्यांच्यापैकी सांप्रत एक तरी कृष्णवंदन करून जगावर परक्याला चाटीत वास्तव्य करीत आहे काय? बाजीरावाने राज्य इंग्रजांचे हवाली करून आपण ब्राम्हणवर्गात हरिहरि म्हणत बसले. पण त्यांचे दत्तकपुत्र धोंडोपंत नाना यांनी आपल्या बापाचे नावाला जो काळिमा लागला व तो पुसुन टाकावया करिता बाळासाहेब रावसाहेब, तात्या टोपे आणि झांशीकर लक्ष्मीबाई या बंधुमित्रासह रणभूमीवर कृतार्थ होऊन परलोकी गेले त्या वेळेसही या शिंदे, होळकर यांनी हरामखोर पणा केला. तो जर केला नसता तर आजला त्यांची आणि आमची ही स्थिती नसती. आमच्या ब्राम्हणांची बायको सुद्धा लढायला उभी राहिली. आणि दाढी मिशी ज्यांना आहेत ज्यांचे वाडवडिल जेथे धन्याचे धडे तेथे आपले शीर असे म्हणून एकनिष्ठपणे चाकरी करीत आले. त्यांचेच हे वंशज त्यावेळेस स्वामीपुत्रास साध्य न होता स्वामीशत्रू, धर्मशत्रू आणि यशशत्रू जो इंग्रज त्याला मिळण्यापेक्षा मराठ्यांच्या नीचपणा आणखी कोणता असतो विचार करा. उगीच ब्राम्हणाचे नांवाने ओरडू नका. ब्राम्हणांमध्ये वाईट कोणी नाही असे माझे म्हणणे नाही पण जसे ब्राम्हण वाईट आहेत तसे इतर जातींचेही लोक तुम्हास आढळतील. जसे आमचे ब्राम्हण इंग्रजांस अनुकूल होऊन जादूसारखे गाड्याघोडी सांप्रत उड्या मारीत आहेत तसे तुमचे मराठे नाहीत काय? किती दाखवू? एक न्याय तुम्हाला सांगतो. जितके आज इंग्रजांचे सितल छायेत तुकडे मोडीत पडले आहेत तितके त्यावेळेस पेशव्याशी निमकहराम होऊन स्वामी द्रोही बनले आहेत. त्यांत ब्राम्हण, मराठे, मुसलमान सर्व जाती आहेत. कुणी कुणाला हसावयाचे कारण नाही. हैद्राबादकर त्यावेळेस स्वतंत्र होते ना, मग ते का स्वस्थ बसले? का त्यालाही कारण ब्राम्हण बाजीरावच. अजून जी एकामागून एक मणीपूर ब्रम्हदेशासारखी संस्थाने इंग्रजांच्या घशात उतरत आहेत त्यांच्यात काय ब्राम्हणच आहेत काय? व जेथे दोष देता भीतर दुर्देवाला दोष देतो. आधी फिरते मग सर्व गोष्टी होतात. या ज्या मानी हिंदुस्थानच्या या टोकापासून त्या टोकापर्यंत असणारी निराळी संस्थाने विपरित मती होऊन इंग्रजांस मन मानेल तसे करून दिले त्यात कोणी कोणाला दोष द्यावा ?

**इंग्रजाशी सामन्यात धारातिर्थी पतन पावले ते निर्दोषी**

माझ्या मताने सर्वच दोषी आहेत जे इंग्रजांशी सामना देऊन धारातीर्थी पतन पावले ते मात्र निर्दोष होत. असे पुण्यवान पुरुष पाहू गेले तर आमच्या ब्राह्मणातच आढळून येतील. अजून पाहू गेले तर मी म्हणतो

तेच तुम्हाला दिसून येईल. ५७ साली नानासाहेब, त्यानंतर वासुदेव बळवंत आणि त्यानंतर आम्ही दोघे भाऊ दामोदर आणि बाळकृष्ण हरि चापेकर यांवाचून कोणी मराठा अगर मुसलमान स्वधर्म आणि स्वदेश यासाठी जीवावर उदार झाला आहे काय? पेशव्यांनी दिलेल्या जहागिरी संभाळून धन्या धत्तुरा आणि चोरा मलिंदा या म्हणी याप्रमाणे धनी तर मरून गेले आणि हे हरामखोर जिवंत राहिलेले आहेत. ह्यांच्याकरिता कोणता नरक उत्पन्न केला असेल यातून जास्त यांच्याबद्दल लिहू इच्छित नाही. कारण यांनी केलेल्या निमकहराम कृतीचे स्मरण झाले की मस्तक फिरून जाते. यांचा सूड घेणे झाले नाही याबद्दल मला फार वाईट वाटते. दिनकरराव रानडे शिंद्यांचे माजी दिवाण याविषयी आम्ही फार मनात जळत होतो. पण थोड्याच दिवसांपूर्वी तो मरण पावला असे ऐकले तेव्हा आमची निराशा झाली. आता तर सर्व मनोरथ पुढील जन्मावर टाकणे भाग पडले. परमेश्वर आमचे मनोरथ जन्मोजन्मी पूर्ण करो दुसरा आक्षेप खोडण्याचा राहिला आहे. पण असा सामान्य विषय याठिकाणी घेऊन विस्तार करू इच्छित नाही. याबद्दल कैलासवासी विष्णुशास्त्री चिपळूणकर यानी लोकहितवादी यांच्यावर जी टिका केली आहे ती वाचण्याबद्दल मी आपल्या वाचकांस शिफारस करितो त्यांत त्यांने उत्तम ग्रतिपादन केले आहे.लारांश इतका की असा ब्राह्मणविषयी द्वेशभाव इतर जातीत पसरला आहे. पलटणीत असणारे जे दक्षिणी मराठे यात हा भेद फार आहे असे मला अनुभवानी कळून आले आहे. चवथ्या पलटणीचा सुभेदारं मेजर कासिनाथ बाने म्हणून एक आहे. त्याची माझी चांगली ओळख झाली होती. प्रथम भेटीत त्यानी मला येण्याचे कारण विचारता मी सांगितले की मी युद्धकलेचा शोकी आहे. मला नोकरी मिळेल काय, त्यावर त्या गड्याने कपाळास आठ्या घालून मुद्दाम नकार स्वर नेऊन कोकणी भाषेत मला म्हटले, भटजीबोवा, ते सर्व खरे पण या ठिकाणी तुमचे सोवळे ओवळे कसे चालेल. येथे काही लाडू खाण्याचे नाहीत. हे पहा माझे पाय कसे लाल झाले आहेत. असे फिरणे पडते. ते काम आमचे आम्ही करू जाणे. याप्रमाणे त्यानी बरेच पांडीत्य केले. ते मी हळूच ऐकून घेतले. त्यावर मला वितंडवाद करावयाचा नसल्यामुळे मी त्यांना चढवून दिले की सुभेदारसाहेब धन्य आहे तुमची, लढाई अती तुम्हीच करावी. तुमचे लाल पाय पाहून मी थक्क होऊन गेलो. काय हे श्रम. इतके बोलून त्यांना चिढविले पण थोडे लागूनही बोललो की, पेशवे जे अटकेपार गेले त्यावेळेस त्यानी सोवळे नेसले होते काय? दुराणीची जी त्रेधा उडवून दिली ती भोजन करून लाडू खाऊनच उडविलीना? असे विचारताच सुभेदार साहेब मऊ आले आणि म्हणाले असे नाही. माझे म्हणे यांच्यात धर्म कर्म चालत नाही. अशा रितीने मी पलटणीत राहण्यास पुष्कळ प्रयत्न केला. त्यांत दक्षिणी मराठे आमचा उपहास करून आमची थट्टा करीत म्हणून आम्ही यांची गाठ घेणे सोडले.

आम्ही पलटणीच्या लोकासी स्नेहसंबंध करून आम्ही पलटणीतील माहिती करून घेत होतो. पलटणीतील लोक आम्हाला फौजेत राहण्यास कोण मत देईंना. ते म्हणत आम्ही दुर्दैवी म्हणून या पलटणीत नोकरी पत्करली. ते त्यांचे सांगणे आम्हाला रुचत नसे. आम्ही खूप प्रयत्न करीत होतो. पण आम्हाला यश येईना. तेणेकरून आम्ही नाईलाज जाहलो.

### पलटणीत नोकरीस रहाण्याचा प्रयत्न

आम्ही हिंदू संस्थानमधून प्रयत्न करू लागलो. बडोदा लष्कर, इंदूर, हैद्राबाद, सांगली वगैरे ठिकाणी बड्या लोकांच्या गाठी घेऊन आमचे विचार कळविले की आम्हाला रिसाल्यात राहण्याची इच्छा आहे. पण कोणीही आम्हाला आश्रय दिला नाही. मग आम्ही गोवे सरकारला एक अर्ज केला पण त्यानीही उत्तर दिले नाही.

अनुक्रमणिका

**सिमल्यात केलेला अर्ज फेटाळला**

पुढे आम्हाला कोणी सांगितले की तुम्ही सामान्य युरोपियनांस अर्ज करून काय उपयोग. सिमल्यात मुख्य सेनापतीला अर्ज करा म्हणजे दाद लागेल. त्यावर मी तिकडे चार अर्ज केले. त्याची उत्तरेही आली पण त्यांत कांही फायद्याची गोष्ट निष्पन्न झाली नाही. अर्थात् नकार मिळाला. त्याच्या नकला मी माझे मित्र ब्रुईन आणि केनडी यांच्याजवळ दिल्या आहेत. त्यांत एक सांगलीकरासही केलेला अर्ज आहे. ते सर्व यापुढे छापावे असे माझे मत आहे.

असो. कर्णकटू अक्षरे सिमल्याहून आली तेव्हा आमचा निश्चय झाला की ज्या देशांत इतकी स्वतंत्रता नाही त्या देशांत राहण्यापेक्षा परद्विपात राहणे फार उत्तम. असा विचार करून आमचे बंधु नेपाळ हा स्वतंत्र देश आहे असे जाणून तिकडे जाण्यास निघाले. इतक्या दूर जाण्यास आईबाप परवानगी द्यावयाचे नाहीत. आम्ही कधीही वडीलमातुश्रीचा त्याग करून स्वैर विहार यापूर्वी केला नाही. पण असा विचार केला की आपण जर आता स्तब्ध बसलो तर ऐन उमेदीचे दिवस व्यर्थ घालविल्यासारखे होणार आहे. कारण आम्ही जी कला शिकण्याची इच्छा करतो ती युद्धकला शरीरबल पूर्णावस्थेत आहे तो पर्यंतच शिकली पाहिजे. तेव्हा दिवस गत करून उपयोग नाही. पण एक नड आली की आपल्या पश्चात मातापितरांची काय तजवीज कारण त्यांना अंतर देणे हा आमचा धर्म नाही.

**युद्धकला शिकण्यासाठी नेपाळांत जाण्याची तयारी**

असे जाणून आम्ही असे ठरविले की मी घरी रहावे आणि बंधुंनी स्वकार्यसिद्धीकरिता नेपाळात जाऊन आपली दोघांची सर्व तऱ्हेने सोय करून नंतर मला लिहावे. असा विचार करून आम्ही निघण्याचा मुहूर्त पाहिला. त्यावेळेस माझ्या घरी सर्व मडळी ख्याली खुशालीत होती.वाचकहो, माझ्या वडिलांना किर्तनाच्या धंद्यात चांगला पैसा मिळे. माझे वडील खर्चिक असत. तेणेकरून ते नेहमी आला सणवार आनंदाने घालवित. पाहुणे परगांवचे आले तर त्यांचा पाहुणचार ठेवण्यास माझे वडील मोठे उल्हासित असत. तेणे करून आमच्या घरी कधी इष्टमित्र जमून मिष्ट पदार्थ भोजनास झाला नाही असे क्वचितच घडत असेल. परमेश्वर कृपेने आमचा संसारही उत्तरोत्तर वृद्धींगत होत चालला असल्यामुळे आमचा आनंदही त्याबरोबर वाढत्या प्रमाणावर असे. त्यात विशेष गोष्ट ही की संसारात सुख उत्पन्न होण्याचे साधन जे प्रेम ते आमचे घरी पूर्णतऱ्हेने होते. मी पुष्कळ घरात पाहतो पण ज्या घरांत तंटा नाही असे निर्मळ घर मला दिसत नाही. आगा लावा त्यांच्या बाकीच्या सुखाला. पैसेवाले असतात. कुटुंबही मोठे असते पण एकाचे तोंड पूर्वेकडे तर दुसऱ्याचे तोंड उत्तरेकडे. असा प्रकार आमच्या घरी नव्हता. मजपेक्षा जितके लहान तितके माझ्या आज्ञेत असत. माझी अमर्यादा कधीही त्यांनी केली नाही. याबद्दल मी त्यांचा कसा उतराई होऊ. परमेश्वर त्यांचे कल्याण करो. असे प्रेमाने वागणारे माझे बहीणभाऊ मातापितर सुत कलम यानी घर कसे भरलेले होते. पण पूर्वजन्माप्रमाणे आम्हाला हा तिसराच नाद लागला. असल्यामुळे या एकंदर संसारातून आमचे चित्त तिसरीचकडे. सुमुहूर्त पाहून बंधूचा जाण्याचा बेत बस ठरला. त्या अतिलांब प्रवासाकरिता आम्ही पैसा सुमारे ४० रुपये जमवून ठेविले होते. ते वाटखर्ची करीता बंधुंनी बरोबर घेतले. आणखी बरोबर लागणारे सामानही घेतले. पहाटेच्या गाडीने जाण्याचे ठरले होते. त्याप्रमाणे आम्ही उभयता बंधू फार पहाटे उठून परमेश्वराची आराधना केली आणि प्रभूपासी करद्वय जोडून मागतो झालो की आम्ही सदर वासना धरून पाऊल बाहेर टाकतो. तू यश दे. नंतर मी वडिलपणाचे नाते मनांत आणून त्यास चार उपदेशपर शब्द बोलून क्षणभर विरहदुःखात निमग्न झालो. आजन्म आम्ही सर्व कुटुंबातून एकमेकास सोडून कधी दूर झालो

अनुक्रमणिका

नाही त्या आम्हा हे फार दुःख वाटले. त्यातून आमचे हे तर प्रेम बंधुवर्गासारखे नव्हते. माझ्या भावाने मला नमस्कार करून वडिल मातुश्रीस मनांत नमस्कार करून मनामध्ये गजानन नावाचा उच्चार करून गृहाबाहेर पाऊल टाकिले. मी बुधवारपर्यंत पोचविण्यास गेलो व मी परत फिरलो पण माझे मन उदास झाले. वाटे की शास्त्रनियमांप्रमाणे प्रवासास जाताना दुसरा कोणी सहवासास पाहिजे होता तो न घेता गेला आहे. परमेश्वर त्याला सुखी ठेवो. असे चिंतून घरी आलो. सकाळी १० वाजता भोजनाच्या वेळेस माझा भाऊ जेव्हा दृष्टीस पडला नाही तेव्हा वडिल समजले की हा कुठेतरी गेला. माझे वडिल मोठे दूरदर्शी असलेमुळे ते आमचे चेष्टीत तेव्हाच समजत.

**भाऊ दूर गेला म्हणून आईचा शोक**

मातोश्री मात्र भोळी पण वडीलांनी तिला जाणवले की बालकृष्ण कोठेतरी निघून गेला. मग काय विचारता तिने एक शित न खाता माझी पाठ धरली की बाळ कुठे गेला. हे तुला वडील आहे. करीता त्याला पत्र पाठवून परत आण. तेव्हा मी जेवीन. मी तिला सांगितले, तो मला विचारून गेला नाही. पण हे तिला खरे वाटेल काय? जिने नित्य क्रम आमचा पाहिला आहे. अशा आईबापास माझे म्हणणे खरे वाटेल कसे? अशा वेळी मला वाटले की मी व्यर्थ पाठीमागे राहिलो. मातोश्रीचा विलाप माझ्याने पाहवेना पण काय करू. आला प्रसंग पार पाडला पाहिजे. म्हणून त्याची खात्री होण्यास तो बडोद्यास गेला असे सांगून तिला जेऊ घातले. मातोश्री दररोज माझ्या पाठीमागे लागे. पण मी अधम दररोज तिला नवीन थाप देऊन दिवस घालवू लागलो. नीतीने वागणारे वडील-मातुश्री आमचे असता त्यांचा परित्याग करून त्यास त्रास दिल्याबद्दल मला फार वाईट वाटले. गावातही जो तो विचारू लागला की तुमचे बंधु कुठे गेले. तेव्हा मी सांगत असे त्याना की ते बडोद्यास गेले आहेत. अशा रीतिने बंधु जाऊन सुमारे पंधरा दिवस जाहले पण कुशलतेचे पत्र कांही नाही. मी चिंतातुर झालो. तो एके दिवसी एक तार आली की मला पंचविस रुपये तारेने पाठवून द्यावे. हे वाचताच काळजी दूर झाली. कारण शरीरप्रकृतीनी खुशाल आहे असे समजून मी खूष होतो. पण पैशाची मागणी का झाली याविषयी विचार करू लागलो. पण ती वेळ विचार करण्याची नव्हती. अगोदर रुपये कोठून आणावे या विचारात पडलो. आम्ही जरी चोरी करण्यात पटाईत आहोत असे आमचे वचनापासून सिद्ध होतो तरी कोणाचा एक छदाम हरण केला नाही. पैशाचे कामात आम्ही उलट लोकावर उपकार केले असतील तर कोणाचे देणे आम्ही कधीही उरांत ठेविले नाही. आम्हाला कोणतेही व्यसन नसल्यामुळे पैशाची जरूरीही लागत नसे. लागला पैसा तर या स्वदेशी हिताकरिताच लागणार असे. आम्ही पतीने लोकांत वागत असल्यामुळे लोकांत आमची चांगली पत असे. आम्ही जेथे शब्द टाकू तेथे व्यर्थ जाणार नाही. असी माझी खात्री आहे. त्याप्रमाणे मी एका मित्रापासून ही रक्कम मागताच त्यानी काढून दिले. त्याबद्दल मी त्यांचे फार आभार मानिले आणि लागलीच तारेने रुपये पाठवून दिले. तार अलाहाबादेहून आली होती त्याच ठिकाणी रुपये पोस्टाच्या पत्त्यावर त्यांनी मागविले. त्याप्रमाणे पाठविले. त्यानंतर आमचे बंधू गेले हे वडिलानी पाहून त्यांनी तर्क केला की अंदाजाची पाठीमागून हे वडील चिरंजीवही जाणार. असा तर्क त्यांनी करून तशी पत्रेही इष्टमित्रास पाठविली. रुपये पाठवून पंधरा तीन वार झाली तरी बंधूकडून पत्र आले नाही. म्हणून मी काळजी करीत असता एके दिवशी पहाटे मी जागा झालो असता माझ्या प्रिय भावाचा आवाज ऐकिला. तेणेकरून मला फार आनंद झाला.

अनुक्रमणिका

### बंधूचे पुनरागमन

प्रथमतः त्याला शरीराने खुशाल स्वनेत्राने पाहून मी परमेश्वराचे फार फार आभार मानले. विशेष आनंद मला हा झाला की माझ्या आईला परमानंद होईल. त्याप्रमाणे माझ्या आईला सकाळी बाळकृष्णास पाहून जो आनंद झाला तो तिच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होता. मग दुसऱ्या तिसऱ्या दिवशी मी बंधूना तिकडची हकिगत विचारली. त्यानी विस्तारानी सांगितली. नेपाळाविषयी जी आमची मोठी उमेद होती ती समूळ नाहीशी झाली. वाटेत बंधूवर जो जीवावरचा प्रसंग गुदरला इत्यादी हकिगत बंधूनी स्वहस्तानी घ्यावी असी इच्छा करून मी तो भाग सोडतो.

### आईवडिलांना अंतर न देण्याचा निश्चय

यानंतर आम्ही नियम केला की जे होईल ते होवो. आपल्या देशांत राहून जे करणे ते करू, वडीलमातुश्री यांना अंतर द्यावयाचे नाही. मग काय करावयाचे याचा विचार करीता मी बंधूना म्हणालो की अजून एक अर्ज असा करावा की जर तुम्ही आमच्यासारख्या युद्धकलेविषयी शोकी मनुष्यास योग्य ठिकाणी चाकरीस ठेवित नाही तर आम्ही आपला शोक कसा पूर्ण करावा. बंडे करावीत काय? अशा तऱ्हेचा अर्ज करणे म्हणजे उघड शत्रू होणे होय. असा विचार करून आम्ही ठरविले की इंग्रज हे आमचे कट्टे शत्रू होत. त्याच्यामुळे आपणास ही परतंत्रता प्राप्त जाहली आहे. करिता यांच्याविरुद्ध जितक्या गोष्टी होतील त्या करायाच्या हेच आमचे आणि इंग्रजाचे वाकडे होण्याची पहिले जबरदस्त कारण होय.

अनुक्रमणिका

# शिवजयंती उत्सवावर टीका

## शिवजयंती उत्सवावर टीका

इतक्यात शिवाजीच्या जन्म उत्साहाचा पहिला समारंभ प्राप्त झाला. हा उच्छाह आम्हा उभयतांबंधूना बिलकुल पसंत नाही. ज्या गोष्टीत निव्वळ बडबड आहे, त्या गोष्टी पाहिल्या की आमचा संताप होत असे. त्यात शिवाजीच्या उच्छवात कांही गोष्टी इतक्या अमर्याद आहेत की त्या प्रत्यक्ष शिवाजीससुद्धा आवडणार नाहीत. प्रथमतः शिवाजीची योग्यता देवाबरोबर करून जो जयंतीचा परिपाठ पाडला तो बिलकुल शिवाजीस पसंत पडणार नाही. कारण शिवाजी जरी महत्त्वांकांक्षी पहिल्या प्रतीचा होता आणि तसे असणे स्वाभाविक आहे. कारण एवढा जो जिवावर उदार होईल तो यशाकरताच. पण मला परमेश्वराचे बरोबर पुजीत जा असे तो कधीही म्हणणार नाही. कारण त्याचे गुरु जे समर्थ रामदास त्यांची योग्यता जर देवाबरोबर झाली नाही तर त्यांचा शिष्य एकदम इतक्या पायरीला पाय लावून कसा गेला. रामदासाची कांही जयंती नाही होत. पुण्यतिथी म्हणून करितात. जयंती करण्याचा प्रघात पडला म्हणजे वाटेल यानी वाटेल त्याची जयंती होईल. टिळक, आगरकर, यांचीसुद्धा जयंती होऊ शकेल. तेव्हा या शिवाजी उत्छाहात या शहाण्या लोकानी ही जी देवाची बरोबरी केली आहे ती आम्हास बिलकुल पसंत नाही. हा प्रथम उच्छाह सदाशिव पेठेत भाऊचे बागेत झाला. त्यावेळेस आम्ही त्या समारंभास जात होतो. पण आमच्या लोकांचा पोरगटपणा पाहून आम्हास फारच खेद होत होता. कारण शिवाजीपासून जे उदाहरण घ्यायचे ते कोणीही न घेता सर्व लहानथोर पोरगळ चाळे करतात हे आम्हास सहन न होऊन आमच्या बंधूनी त्याबद्दल दोन श्लोक तयार केले. ते फारच उत्तम तयार जाहले आहेत. ते आम्ही येत्या वेळी पाठ करून ज्या सभेत जिनसीवाले आणि भानु सुधारक यांचे वाग्युद्ध झाले त्या सभेत हे दोन श्लोक म्हटले या श्लोकांचा अर्थही जिनसीवाले आणि भानुसारखे जे बहुभाव आहेत त्याना उद्देशूनच आहे.

**शिवाजी सभेत म्हटलेले श्लोक** : वाक्शौर्योद्भव उच्चवृक्ष सुफला नाही कधी ऐकिले ॥ स्वप्नी स्त्रीमुख चुंबनी नच कधी संतानही जाहले ॥ बोलावे परी वृष्टीहीनघनसे गर्जु नका हो असे ॥ रंडानीति पराक्रमाविण जनी होते तियेचे हासे ॥ १ ॥ नाही होत स्वतंत्रता शिवकथा घोटूनि भाटापरी ॥ घ्यावे लागतसे शिवाजी बाजीपरि हे मस्तक स्वहस्तावरी ॥ हे जाणोनी तरी अता सुजन हो घ्या खड्ग ढाला हाती ॥ मारा थाप भुजावरी अरि शिरे तोडू असंख्यात ती ॥ २ ॥

या श्लोकावर कदाचित कोणी असे म्हणेल की लोकांना नांवे ठेविता तर तुम्ही काय केले हो. असे प्रश्न खासगी भाषेत पुष्कळांकडून आम्हाला झालेले आहेत. पण भरसभेत कोणी असे विचारल्यास त्यावर आपली प्रतिज्ञा लोकांस जाहीर झाली पाहिजे असा विचार करून आमच्या बंधूनी प्रतिज्ञेचा एक श्लोक तयार केला तो —

॥ श्लोक प्रतिज्ञेचा ॥

॥ ऐका राष्ट्रीय युद्धभूमीवर ह्या प्राणासी देऊ धका ॥ जे जे भाषण बोललो बहुजनी तो फार्स मानूं नका ॥ धर्मध्वंसक शत्रुवक्षरुधिरा पाडूच भूमिवरी ॥ मारुनीच मरू आम्ही तुम्ही स्वये ऐकाल रांडापरी ॥ ३ ॥

अनुक्रमणिका

यांप्रमाणे श्लोक आम्ही उच्छाहात म्हटले त्यावेळी टाळ्याचा गजर झाला.

### लोकांना आवाहन

यानंतर आम्ही मुंबईस गणपतीचे उच्छाहातही म्हणण्याकरिता म्हणून मी कांही श्लोक तयार केले. मी वर सांगितले आहे की आमची पलटणीत राहाण्याची सर्व तऱ्हेने निराशा झाल्यावर आम्ही इंग्रजाचे खरे हाडवैरी जाहलो.सर्व श्लोकात आमचा मथीतार्थ हाच निघेल की नुसते बोलू नका, काहीतरी कृती करून दाखवा. गणपतीचे उत्साहात आम्हीं दोघे भाऊ मर्दानी पोशाख करून जेणेकरून श्लोकातील अर्थ जमलेल्या मंडळींच्या मनांत चांगला ठसेल अशा रितीने हावभाव करून हे श्लोक म्हणून दिले. ते श्लोक हे होत.

**श्लोक गणपतीचे उत्साहांतले :** अरे मूर्ख हो मर्द झाला कशाला ॥ मिशा मोठमोठ्या धराव्या कशाला ॥ न लज्जा तुम्ही भोगिला दास्य हाय, करा हो तरी जीव जाया उपाय ॥ १ ॥ अरे मारिती वासरे आणि गाई ॥ महादुष्ट चांडाळ जैसेकसाई ॥ हरा क्लेश तिचे मरा आंग्ल मारा ॥ रिकामे नका राहू भूमीस भारा ॥ हिंन्दुस्थान असे जनांत म्हणति लोकासी या सर्वही ॥ येथे आंग्ल कसे स्वराज्य करिती जाणा महालाज ही ॥ नावाला विसरू नका दृढ धरा देशाभिमाना मनी ॥ ठेका दंड उठा भिडा सुयशया दुष्टाचिया कंदनी ॥ ३ ॥ होते पूर्वज आमचे दृढ कसे झंझावया कंदनी ॥ गेले मेळवुनी यशास आपुल्या देशासी या रक्षुनी ॥ त्यांचे पोटी आम्ही कसे निपजले भानूस जैसा शनी ॥ नेले राज्य हरूनी आमुचे तरी लज्जा न वाटे मनी ॥ ४ ॥

याप्रमाणे समाजांत श्लोक म्हणत असता ठिकठिकाणी टाळ्यांचे गजर होत असता कित्येकांकडून आम्हाला सूचना येत की तुम्ही म्हणता खरे पण समाजात गुप्त पोलीस असतात. तेव्हा काळजी घेत जा. आम्ही हे श्लोक मुंबई शहरात चारपांच ठिकाणीच म्हटले पण तेवढ्यांनी आमची लोकांत चर्चा फारच जाहली.

### वार्षिक व्याख्यान समारंभात अपमान

त्यानंतर आम्ही पुण्यास आलो व एके दिवशी आनंदोद्भव थिएटरात वार्षिक व्याख्यान समारंभ होता या ठिकाणी मी एकटाच गेलो होतो. सभेत टिळक हे अध्यक्षस्थानी विराजीत जाहले होते. गोरक्ष जो शिवाजी यांच्यावर भाषण करण्याकरिता दाजी अबाजी खऱ्या हा उभा राहिला होता त्याला पाहताच माझ्या अंगाचा संताप झाला. व असे वाटले की ज्यानी मुसलमानाच्या पंक्तीस गोमांस खाल्ले त्या गोभक्षक अशा गाढवानी गोरक्ष शिवाजीवर संभाषण करायचे आणि ते जमलेले लोकानी निमूटपणे ऐकायचे शरम आहे. असे वाटून मी पुष्कळ मंडळींना सांगितले की जी मंडळी कोणी नवा मनुष्य बोलण्यास आला की त्याची फटफजीती खात्रीने उडवावयाची अशा फाजील मंडळीस मी विनंती करून सांगतो. जो या ठिकाणी जर तुम्ही फाजीलपणा केलात तर तो फाजीलपणा निंद्य खरा, पण स्थळविशेषी या वेळेस तुमच्या हिंदू समाजास भूषण होणार आहे असे परोपरीने मी सांगितले. कोणीही नंदीबैलाने ऐकिले नाही. त्यावेळेस मीच स्वतः विचार केला की आपण जो श्लोक खऱ्यावर केला आहे तो या ठिकाणी म्हणून या स्वधर्मवाल्यांचा उपमर्द करू असा विचार करून मी ज्या ठिकाणी वक्ते बोलण्यास उभे राहतात त्या उच्च स्थानी गेलो. त्याठिकाणी बडे बडे सुधारक आणि मनसुधारक लोक बसले होते. कोणी सांगितले तुम्हाला बोलायचे

असल्यास सभेचे व्यवस्थापकाची परवानगी घ्या. मग बोला त्याप्रमाणे मी सभेचे व्यवस्थापक मौंडी म्हणून कोणी होते त्याना विचारले. पण त्यानी परवानगी दिली नाही. तरी मी त्याच्या परवानगीची पर्वा न करितां श्लोक म्हणण्यास पुढे सरावलो. त्यावेळेस व्यवस्थापकांची आणि माझी बरीच तक्रार झाली. अखेर मला बाहेर घालवून देण्याकरिता कोणी एक तालिंबाज ब्राह्मण पाठविले. वाचकहो, आजपर्यंत मी किंचितही अपमान कधी सहन केला नाही. व या ठिकाणी आमचा मान ठेविला जाणार नाही अशा ठिकाणी आम्ही कधी गेलो नाही. असा मानधनाग्रणी जो मी त्या मला भरसभेत झालेला अपमान किती दुःसह झाला असेल याची कल्पना तुम्हीच करा. असा संताप आला की आज या सुशिक्षित नरपशूला अपमान म्हणजे काय चीज आहे ती प्रत्यक्ष दाखवावी आणि त्याबरोबरच मानी पुरुषही कसे असतात हे दाखवावे. हे कायदेपंडित नेहमी असे समजतात की प्रत्येक गोष्टींचा निकाल न्याय मंदिरातच होतो. पण ठाऊक नाही की कायदा कोणाकरिता आहे. ज्यानी सर्व अधिकारी आपल्या मनगटाच्या जोरावर ठेविले आहेत त्याला न्यायमंदिरात जाण्याचे कारण नाही. हे या आधुनिक विद्वानाना आज दाखवावे. हात धरून घालून देण्याकरिता येणाऱ्या पहिलवानास हस्तयष्टीकेचा मस्तक स्थानी प्रहार करून त्याला जाणवावे की त्याला प्रत्येक ठिकाणी कुस्तीचा पेच उपयोगी पडत नाही आणि मग ज्यानी या महावीराना रवाना केले त्या अध्यक्ष टिळकांचा समाचार घ्यावा. हे ऐकून पुष्कळ वाचक मजवर रोष होऊन म्हणतील की चापेकर हे देशाभिमानी नसून देशशत्रू आहेत म्हणून तेही चोर.

**टिळकांवर टीका**

टिळकाविषयी पुष्कळ लोकांचे मत चांगल्या प्रकारचे आहे हे मी जाणून आहे. पण ते विवेकांध असले पाहिजेत. माझ्या मताने हरहर बिंदूने टवान : (?) या म्हणीप्रमाणे धड सुधारकही नाही आणि धड स्वधर्मनिष्ठही नाही. कारण याला जर स्वधर्मनिष्ठ म्हणावा तर विधवाविवाह प्रतिबंध निवारक मंडळीचा हा सभासद आहे. गोमांस खाणारा जो दाजी आबाजी खरे (गाढव) त्याचा हा प्रियमित्र. समयपरत्वे जाऊन धर्मनिष्ठ बोवा फुशारक्या मारतात. बिस्कुटे खाल्याबद्दल प्रायश्चित घेण्यास या राजश्रींना शरम वाटली पण चहा पिताना शरम वाटली नाही. समाजाकरीता मिशा भादरल्या असल्या तर यांच्या चाळीस पिढ्या नरकांत गेल्या असत्या काय? लग्नकृत्यात तृतीय पंथ काढून स्मृतिकारांच्या पद्धतीत हे बसू पहात होते. याना कधी कोणी कीर्तन पुराण श्रवण अगर देवदर्शन इत्यादि धार्मिक कृत्यांत कोणी पाहिले होते काय? मला नाही वाटत कोणी पाहिले असेल. इत्यादी पुष्कळ गोष्टी ज्या धर्मनिष्ठ म्हणविणाऱ्याला लांछनप्रद होत्या अशा गोष्टी टिळकांचे ठिकाणी वास करीत होत्या. त्यापैकी कांही वर दाखविल्याच आहेत. तेणेकरून टिळकांविषयी आमचे मत चांगले नाही. पण सुधारकांपेक्षा पुष्कळ पटीने हा बरा असे आमचे मत आहे. अलिकडे हा समाजाला धरून चालत असे. तेणेकरून यांच्या स्वैरविहारास बरेच बंधन मिळाले होते. कांही दिवसांनी पुष्कळ पटीने सुधारेल असी आम्हाला आशा होती. सारांश हे चापेकर जे खरे स्वधर्मनिष्ठ आहेत त्यांचे गुलाम आहेत. नाही त्यांचे कट्टे शत्रू आहेत. त्यातून माझी किंमत न करता जो भरसभेत माझा अपमान केला त्याबद्दल मला मी मानी असल्यामुळे संताप उत्पन्न होणे वाजवी आहे. पण असा ज्यावेळेस विचार मनांत आला त्यावेळेस किंचित नेत्रनिमिलन करून कमळी वास करणाऱ्या आत्मारामाला प्रश्न केला की, देवा, याठिकाणी मी काय करू? तेव्हा त्यानी प्रेरणा केली की जो तू प्रतिपक्षाचा भेद करण्याची इच्छा करणारा तो तू स्वजातीवर हात टाकण्यास सिद्ध झालास. विचार कर यांत यशश्री तुला माळ घालणार नाही त्यांनी अपमान केला हे त्यांचे अज्ञान आहे. ते तुला ओळखीत नाहीत. असी इशेच्छा कळून येताच मी किंचितही वेळ न थांबता त्या पहिलवानानी माझा हात धरण्यापुर्वीच मी सभेबाहेर निघून गेलो. त्यानंतर दोनचार दिवस फारच उदास मला गेले. पुढे बंधूच्या आणि माझ्या विचारे असे ठरले की आजपासून

अनुक्रमणिका

कोणत्याही सार्वजनिक कृत्यांत समाजांत जावयाचे नाही असी आम्ही प्रतिज्ञा केली. तेणेकरून आमचा फार फायदा झाला आम्ही कोणत्याही बाष्कळ सार्वजनिक कृत्यात न दिसल्यामुळे आमचे नांव स्वदेशहीचिंतक मंडळीतून निघाले. ते आमच्या पथ्यावर पडले.

**अर्थप्राप्तीसाठी प्रयत्न**

पुढे आम्ही चातुर्मासानिमित्त मुंबईस प्रतिवर्षाप्रमाणे आलो. आम्हाला पैशाची फारच अडचण पडत असे. तेव्हा कांहीतरी पैशाचा मार्ग काढला पाहिजे असा विचार करिता माझ्या मनांत असा विचार आला की यंदा गणपतीचे मेळ्याचे बुक काढून ते विकावे. ही कल्पना मला बरी वाटून मी ते तयार केले. आणि सुवर्ण प्रिंटींग प्रेसमध्ये छापण्यास दिले. हे बुक आमच्या स्वभावाप्रमाणे बरेच कडक झाले होते.

**पुस्तके पोलीसा-कडून जप्त**

छापखानेवाल्यांनी  कुठे कुठे दुरुस्त केले आणि छापले. ते मुंबईस पोलिसचे पाहण्यांत येऊन त्यांनी ती सर्व बुके सुवर्ण प्रिंटींगमध्ये जप्त केली आणि मला दुसऱ्या दिवशी पोलीस कचेरीवर राहण्याची ताकीद केली. कांही बुके विकली गेली होती. पण माझ्याजवळ आणखी कांही बुके आहेत की काय हे पाहण्याकरिता संध्याकाळचे वेळी विठ्ठलवाडीस एक गुप्त पोलीस पुस्तकें विकत घेण्याचे निमिताने मजकडे आले. पण चोराचे पाऊल चोरालाच ठाऊक या म्हणीप्रमाणे आम्ही त्याला ओळखून आणि कोणत्याही प्रकारचा विशेष शोध त्यास लागू दिला नाही. दुसरे दिवशी आपणास पोलीस कचेरीत व्हीनसेंटकडे जावयाचे आहे. तेव्हा पोलीस हे बेमुर्वती असतात. करिता त्या ठिकाणी आपणास अपमान सोसावा लागू नये एवढ्याकरिता परमेश्वराची मी अत्यंत नम्रतापूर्वक प्रार्थना केली की परमेश्वरा माझी अब्रु राख. असी इशप्रार्थना करून मी आणि छापखानेवाला असे दोघे गेलो. तेथे पोलीसानी आम्हास थेट व्हीनसेठपासी नेले. त्याठिकाणी  रोषणअली इन्स्पेक्टर आणि लक्ष्मण जमादार, गुप्तपोलीस इतकी मंडळी हजर होती. प्रथमताः छापखानेवाल्याची चौकशी होऊन त्यास व्हीनसेट साहेबानी  बरेच तीक्ष्ण वाग्बाणाचे प्रहार केले ते ऐकून मला धाक पडला. हा मजवरही असेच तोंड सोडील आणि त्याची आपली चांगलीच झडेल पण लिहिण्यास फार आनंद वाटतो की ईश्वराची करणी त्यानी मला फार शांतपणे आणि हास्यमुद्रेने प्रश्न केले. त्याची उत्तरेही मी मोठ्या युक्तीने दिली. तेणेकरून तो खूष झाला आणि मला सांगितले की तुमची बुके सध्यापुरती जप्त केली आहेत. गणपतीचा उच्छाव झाला की परत न्यावी. मी विचार केला की सुटलो एकदाचा. या खटल्यापासून आम्ही बोध घेतला की पुनः असे पोलीसच्या डोळ्यावर येण्यासारखे काम करायचे नाही. दुसरे एक कविताबंध पुस्तक छापण्यास दिले होते पण हा प्रकार झाला तेव्हा ते बुक मी रद्द केले.

**धर्मांतर केलेल्या वेलणकरावर हल्ला करण्याचा बेत.**

पुढे आम्ही कांहीतरी आपले धैर्य वाढेल असी कामगिरी कोणती हाती घ्यावी या विवंचनेत पड़लो तो नुकताच एक सुशिक्षित हिंदु प्रोफेसर पदवीस चढलेला स्वधर्माला सोडून नवीन धर्माप्रमाणे मिशनरी झाला असे ऐकिले. तेव्हा ते आपणास दंडनीतीला योग्य स्थान आहे असे जाणून आम्ही त्याच्या तपासास लागलो. प्रथम प्रथम विल्सनकडे जात त्याच्या बंगल्याचा शोध केला. बंगला पाहून ठेविला पण कशा रीतीने काम करायचे याविषयी आम्ही उभयतांनी विचार केला. तो असा बेत ठरला की एकानी प्रथम त्याच्याकडे जावे.

अनुक्रमणिका

आणि त्यास आपली मिशनरी दिक्षा घेण्याची इच्छा प्रदर्शित करावी. आणि एक दोन दिवसांनी त्याच्या घरी जाऊन त्याची वागणूक घरदार जाणेयेणे सर्व बऱ्यावाईट सोई पाहून नंतर पुढची तजवीज पुढे करायची असा विचार करून प्रथम कोणी जावे याविषयी नीट विचार करून आम्ही ठरविले की आपला प्रिय मित्र जो भिस्कुटे यास इंग्रजी भाषा कामापुरती येते. करिता यानी जाऊन ठरल्याप्रमाणे इच्छा दर्शवावी असे ठरून आम्ही भिस्कुटे यास बोलावे कसे चालावे कसे इत्यादीक पुष्कळ शिकवून त्यास रवाना केले. त्याला बंगल्यात पाठवून तो येईपर्यंत आम्ही बाहेरच कुठेतरी बसत होतो. तो परत आला की काय नवे बोलणे झाले असेल तसेच त्याला दुसऱ्या दिवशी काय कसे बोलावे याची शिकवण त्याला द्यावी. त्यानी आपले नाव किर्तने असे ठेविले होते. भिस्कुटे ख्रिस्ती होणार असे वेलणकरानी ऐकिले तेव्हा त्यास फार आनंद झाला. असे त्याच्या चर्चेवरून स्पष्ट दिसत होते असे आमचे मित्राने ताडले. भिस्कुटे तीनदा किंवा चारदाच वेलणकराकडे गेला असेल. नंतर ठरले की भिस्कुट्यानी सांगावे की आमचा एक मित्रही ख्रिश्चन होण्याची इच्छा करीतो. करिता त्याला मी आणणार आहे. आणि मग भिस्कुट्याबरोबर आमच्या बंधूनी जावे. ज्यादिवशी यानी जावे त्याच दिवशी त्याला मारावे याप्रमाणे ठरून भिस्कुटे यानी तसे केले. आणि नंतर आमचे बंधु बलवंतरावही त्याबरोबर गेले. आम्ही उभयता बंधु मारक हत्यारे नेहमी गुप्त तऱ्हेने बाळगीत होतो. हे दोघे वेलणकराचे बंगल्यात गेले. मी बाहेर उभा राहिलो. त्यादिवशी इष्ट संधी न मिळाल्यामुळे बंधूनी त्यादिवशी मारावयाचा विचार रद्द केला. त्यादिवशी मिशनरी धर्माबद्दल यांचे त्यांचे पुष्कळ संभाषण आहे. बंधूनी आपले नांव साठे असे सांगितले. हे नांव सांगण्यात आमची फार चुक झाली असे आता आम्हास वाटते. हे नांव जर न सांगता दुसरे एखादे सांगितले असते तर सांप्रत आलेला प्रसंग कदाचित प्राप्त आला नसता. बंधु ज्या वेळेस वेलणकराकडे गेले त्यावेळेस त्यांनी आपला बंगला सोडून त्यानी स्वतः तयार करविलेल्या बंगल्यात तो येऊन राहिला होता. अशा प्रकाराने व्यर्थ खेपा बंधूच्या सुद्धा दोन तीन झाल्या. वेलणकर या दोघांचा फार योग्यतेबाहेर मान ठेवित असे. प्रेमभाव तर फारच दाखवित असे. या सर्वांचेमुळे हे उपदेश घेणार तेव्हा यांना जिकडून खुश वाटेल तो प्रकार या मिशनरी लुळ्यांनी चालविला तो नेहमी त्याना म्हणे की तुम्ही उपदेश घेणार हे ऐकून माझे मित्र मॅकिगनसाहेब यास फार आनंद झाला. आणि ते तुमची भेट घेण्यास फार उत्सुक आहेत करिता एक वेळ आपण तिकडे जाऊ असे तो म्हणत होता. पण आमचे सदाइष्ट मित्र असे मानपान दाखविता काम साधायचे असे माझ्या बंधूचे मत असल्यामुळे ती गोष्ट जाऊ एखादे दिवशी असे म्हणून पुढे ढकलली. असा क्रम चालला असता आम्ही एक दिवस काम निश्चयपूर्वक करण्याचा कायम केला. तो दिवस गोकुळअष्टमीचा होय. या दिवशी वेलणकर यास कृतकर्माचे सौम्य प्रायश्चित्त द्यावयाचे असा आमचा सिद्धीत झाला. वेलणकरानी आम्हास वाचण्याकरिता एक इंडियन यूथ आणि नवा करार अशी दोन पुस्तके दिली होती. ठरलेल्या गोकुळकष्टमीच्या दिवशी मी तिसरा इसमही वेलणकराचे घरी जाण्याचे ठरले. याकरिता अशी तजवीज केली होती की, मी साठे यांचा मेहुणा झालो होतो. मी साठे हे धर्मांतर करणार अशी कुरबुर ऐकून त्यांच्या शोधास आलो होतो. साठे हे वांद्र्यास रहात होते. त्यानी वेलणकरास पूर्वीच सांगितले होते जो दिवस आम्ही कायम केला होता त्या दिवसाचे दोन दिवस पूर्वी भिस्कुटे यानी वेलणकराचे कानावर ही सर्व हकीगत घातली होती. साठे याचे मेहुणे भिडे हे साठ्यास नेण्याकरीता आले आहेत. त्याना घेऊन साठे हे परवाचे दिवशी संध्याकाळी रात्री दहाचे ट्रेनने येणार आहेत तेव्हा आम्ही तिघेजण रात्री अकराच्या सुमारास तुमचे घरी येऊ, आपण जागे असा. अशी व्यवस्था पूर्वीच केली होती. तो दिवस प्राप्त झाला. आम्ही या शुभ दिवशी परमेश्वराचे अनन्य भावाने चिंतन केले. मी परमेश्वराजवळ तू दुष्टनिवारणास्तव कृष्ण अवतार घेऊन कंस चाणुर्मर्दन केलेस तेव्हाही दुष्ट जनांचा अत्यंत तिटकारा असे, करीता दुष्टांचा संहार करण्याकरिताच बद्धपरिकर झालेले जे आम्ही त्या आम्हाला सुयश देवो. अशी देवाची परोपरीने विनंती करून आम्ही घरून सरासरी साडेआठ वाजता निघालो तो ग्रँटरोड स्टेशनवर इष्ट काळाची मार्गप्रतिक्षा करीत बसलो. साडेदहा वाजण्याचा सुमार होता

आम्ही देवाचे नांव घेऊन वेलणकराचे घरी गेलो. त्यावेळेस वेलणकर माडीवर कुणासी गप्पा मरित होता. आम्ही आलो असे त्यास कळताच काही वेळाने तो आला मेणबत्तीचा दिवा हातात घेऊन बंगल्याचे बाहेरचे पडवीत आला आणि त्याठिकाणी आम्ही त्रिवर्ग वेलणकर हे उभे राहून गोष्टीस सुरवात जाहली. प्रथमतः आमची मुलाखत होऊन आम्ही त्यास सांगितले की हे आमचे साठे कुटुंबास सोडून आज किती दिवस इकडे येऊन राहिले आहेत आणि आता त्यांचा विचारही कांही भलताच झाला आहे असे एकतो. करिता आपल्यावर पूर्ण भरवसा आहे. करिता याना कांही या गोष्टीचा उपदेश करून ते आपल्या घरी जाऊन बायकामुलात पडतील असे करावे. ऐकून वेलणकर म्हणाला, भिडे, हे म्हणता हे खरे आहे. पण धर्माच्या कामात जो तो मनुष्य स्वतंत्र आहे. त्यात त्याला अडथळा करणे म्हणजे मोठे पाप होय. मलाही मी जेव्हा धर्मांतर करणार असे सर्वास कळले तेव्हा सर्व आप्तइष्टमित्र यानी पुष्कळ प्रकारे बोध केला पण मी कोणाची पर्वा न करिता जे मला वाटले ते मी केले. करिता या कामात तुम्ही मला पापांत घालू नये हे ऐकून मी निरत्तर जाहलो आणि मग आम्ही दुसऱ्या तिसऱ्या गोष्टी काढल्या. त्यांत अनेक विषय निघाले. अखेर कृष्णकथा निघाली. त्या पूर्ण सनातन कृष्णाला या कुलकलंकानी नांवे ठेवण्यास आरंभ केला. ती निंदा आमच्यानी सहन न होऊन साठे यानी मस्तकप्रदेशी पोलादी काठीचा जबरदस्त तडाखा मारला आणि एक पाठीत साधारण मारला आणि आम्ही निघून गेलो. घरी आल्यावर आम्ही जगनियंत्याचे आभार मानले. ती रात्र गेल्यावर दुसऱ्या दिवशी सर्व मुंबई शहरांत ही बातमी पसरली तेव्हा एकवार हिंदु-मुसलमानास फार आनंद झाल्याचे दिसून आले. पोलिसचा तपासही जारीने चालू झाला. दुसऱ्या दिवशी दुपारी दोन वाजता एक युरोपियन कॉन्स्टेबल आमच्या भागात कावजी चाळीत एकदोन शिपायासह किर्तने आणि साठे यांचे शोधाकरिता आले. ते प्रत्येक खोलीत विचारीत की इथे कोणी साठे, किर्तने आहे काय? आम्ही त्यास सांगितले की इथे कोणी साठे नाहीत आणि किर्तनेही नाहीत. मग ते परत गेले. मग आम्ही विचार केला की आपल्याजवळ ती दोन बुके ती कदाचित पुरावा होतील. करिता ती ठेऊन उपयोगी नाहीत. असा विचार करून ती आम्ही जाळून टाकिली. पुढे टाईम्स, गॅझेट वगेरे इंग्रजी, मराठी वर्तमानपत्रांत या वेलणकर प्रकरणाविषयी जोराची चर्चा सुरू जाहली. त्यांत पोलीसास जो तो शिव्या देई. इतका गुन्हा पोलिसास सापडत नाही. तेणेकरून पोलिसास लाजल्यासारखे होऊन त्यांनी धर मनुष्य की ने वेलणकराकडे, दाखीव त्याला, नाही म्हटले की दे सोडून. हा प्रकार चालला तेव्हा आम्ही विचार केला की या सपाट्यांत कदाचित आपणही यावयाचे.

### वेलणकर प्रकरणी पोलीसास भूलथाप

करीता या पोलिसांला लागलीच भूलथाप दिली पाहिजे असा विचार करून आम्ही एक युक्ति योजिली. ती असी आम्ही त्याला पूर्वी सांगितले होते की आम्ही सर्वजण कोल्हापुरास राहतो. तेव्हा एक पत्र आम्ही बालबोध पण अशिक्षितासारखे लिहून तयार केले. त्यांत मजकूर इतकाच तू स्वधर्म सोडून परधर्मात गेलास आणि आमच्या मराठ्याच्या कुळास कलंक लाविला. या पत्रांत त्याला बुकाच्या व कांही बोलण्याच्या खुणा देऊन आम्हीच ते असी त्यांची खात्री केली होती. असे पत्र तयार करून आम्ही ते भिस्कुटे यांचे हस्ते पुण्याचे पोष्टाचे पेटीत टाकले व पत्रांत कोथरड असे लिहिले होते. असे करण्याचा उद्‌देश इतकाच की आम्ही पायमार्गे हे कोल्हापूरास गेले असे त्यांचा अंदाज झाला पाहिजे. ते पत्र वेलणकर यास पोचून त्याने ते पोलिसास दाखवून त्यांना सांगितले की आता व्यर्थ तुम्ही शोध करून लोकास मजकडे आणू नका. माझी खात्री आहे की ते कोल्हापुरास गेले असे पोलिसास समजताच त्यांची खटपट थंड पडली आणि आमच्या मनासारखे झाले. तथापि इंग्रजी पत्रे मधून मधून चर्चा करीत होती. सगळ्यात मॅकीगन साहेबास फार

संताप आला असे आम्हास कळते तेव्हा त्याचाही बंगला आम्ही पाहून ठेवला. पुढे थोड्याच दिवसांत या ग्रंथीकतापाची साथ मुंबईस सुरू झाली.

### इंग्रजांची निंदा

मध्यंतरी पुन्हा आम्ही पलटणीत राहण्याची खटपट केली पण ती निष्फळ झाली. तो आमची शेवटची निराशा जाहली आणि इंग्रजांची खुप निंदा केली की यांच्यासारखी राज्य चालविण्याची क्रूर पद्धती जगाच्या पाठीवर शोध करिता कोठेही आढळणार नाही. प्रत्यक्ष हातात तलवार घेऊन बकऱ्यासारखे गळे चिरणारे जुलमी यवन राजे मागे झाले ते फार बरे पण इंग्रज खोटे केसानी गळा कापणारी हरामजादी जात पृथ्वीवर दुसरी आढळणार नाही हे खात्रीने सांगतो. परमेश्वरानी जसे प्रत्येक मनुष्याचे रूप निरनिराळे केले आहे तसेच त्यांचे स्वभावही भिन्न आहेत व त्या स्वभावधर्माप्रमाणे त्यांच्या आवडीही निरनिराळ्या असायच्या. सत्व,रज आणि तम हे तीन गुण अधिक प्रमाणाने प्रत्येक मनुष्यास वास करितात आणि तदनुसार मनुष्याच्या भिन्न भिन्न आवडी आचार रूपाने जगात दृष्टीस पडतात. अशा ईश्वरनिर्मित मनुष्यस्वभावास म्हणजे आवडीस राजाने प्रतिबंध करणे म्हणजे निरपराधी मनुष्यास ईच्छेविरूद्ध अमुकच काम तू केले पाहिजे असे सत्तेच्या जोरावर सांगणे म्हणजे त्यास सक्तमजुरीची शिक्षा दिल्यासारखे होत नाही काय? जर कदाचित नितीपंथाला सोडून त्यांची इच्छा दिसून येईल तर त्याला प्रतिबंध करणे ठीक आहे. पण आमचे मागणीत कायदेशीरपणा असून त्या मागणीची दाद नाही. अशा स्वैरविहारी सत्ताधिकाऱ्यास राजे कोण म्हणेल. आजपर्यंत या हिंदुस्थानांत पुष्कळ क्रूर यवनी राजे झाले पण त्यांनी अमुक चाकरी हिंदूस द्यायची नाही आणि तमूक द्यायची असे नियम नव्हते केले. मुख्यप्रधानासारखी नाजूक आणि विश्वासाची कामेही आमच्या लोकानी बजावल्याचे इतिहासप्रसिद्ध आहे. हे ज्यामध्ये ही शौर्याची कामे करून जाहागिरी मिळविली त्याचे वंशज अद्याप या भूतलावर वास करीत असलेले दाखविता येतील तेव्हा विचार करिता आमचे मन या इंग्रज लोकांविषयी अत्यंत कलुषित झाले. आम्ही नियम केला की आता या इंग्रजांच्या पाठीमागे लागायचे आम्ही जाणून होतो की आम्ही एकदोघे आणि ज्यांच्याशी आम्ही वैर करणार ते आमच्यापेक्षा कितीतरी पटीने मोठे आहेत. आकाश-पाताळचे अंतर होय. विवाद वैर आणि प्रिती ही समान म्हणजे सारख्या बरोबर करावी. असे असून आम्ही हा भलताच ग्रह मनांत काय आणला असे पुष्कळ लोक म्हणतील पण मित्र हो, हे शास्त्र मी तुमच्यापेक्षा फार निराळे लावतो.

विवाद करणे तो सारख्याबरोबर करावा म्हणजे आपल्यासारखे कुलीन, चांगल्या कुलात निर्माण झाले, आपल्याप्रमाणे मनाचे मोठे उदार, इत्यादी मनुष्याचे अंतःस्थित गुण पाहून करावा. बाहेरची संपत्ति पाहून करू नये. याप्रमाणे कित्येक थोर पुरुष दरिद्री का असेना पण चांगला वर पाहून मग आपली संपत्ति त्यास देऊन कन्या अर्पण करितात. तद्वतच प्रिती आणि वैर ही मनाचे मोठेपणावर आहे. दुर्दैवाने संपत्ति नसली म्हणून काय झाले? जो मोठा तो मोठाच. संपत्ति नसली नैसर्गिक त्यांच्या मनाचा मोठेपणा किंचितही कमी होत नाही. हे सूज्ञानी विसरू नये.

अनुक्रमणिका

## स्वकुलाची थोरवी

यद्यपी आम्ही धन-कनकविहित आहोत तरी आम्ही अभिमानपूर्क सांगतो की आमचे कुल थोर आहे. आमचे मातापितर कुलीन आणि थोर, उदार आणि पुण्यवान असे आहेत. त्यांच्यापासून आमचे हित आहे. मित्रहो, सुदैवाने सांप्रत काली आमच्या वडिलांची आणि आमची पारख करणारे सूज्ञ लोकांचा अभाव आहे. म्हणून नाईलाजास्तव हा परिणाम समय जाणोन मीहूनच या ठिकाणी मी आपली फुशारकी मारली आहे. या आत्मस्तुतिबद्दल मी आई-बंधूंची माफी मागतो. माझ्या मित्रानी माझे वडील किर्तन करितात आणि आम्ही त्याच्या पाठीमागे टाळ कुटण्याची कामे करतो एवढ्यावर न जाता आमचे वडील मातोश्री आणि आम्ही बंधु यांचे अंतर्बाह्य वर्तन कसे होते याचा तपास बारीक रितीने करावा. म्हणजे सत्य ते त्याना कळून येईल. सारांश इतकाच की यद्यपि आमच्याजवळ फौजफाटा, देशप्रमेदा, पैसाअडका बिलकुल नाही तरी आम्ही मनाचे मोठे असल्याप्रमाणे एका ईश्वरावाचून वाटेल त्याशी स्पर्धा करण्यास समर्थ आहोत.

## इंग्रजांशी वैर करण्यास कंबर बांधली

जय मिळणे न मिळणे हे प्रारब्धावर आहे. त्याचा संबंध आपल्या मोठेपणाशी बिलकुल नाही असे समजून आम्ही इंग्रजांशी कंबर बांधली. प्रथम कोणते काम हाती घ्यावे या विचारांत आम्ही पडलो. जे काम करायचे ते अत्यंत महत्वाचे असले पाहिजे. जे केले असता सर्वतोमुखी त्याची चर्चा होऊन आईबाबास आनंद झाला पाहिजे आणि इंग्रजास अत्यंत वाईट वाटून राजद्रोहाचा स्पष्ट शिक्का आम्हाला मिळाला पाहिजे.

## आंग्लराणीच्या पुतळ्याची विटंबना

अशी महत्वाची वस्तू कोणती या गोष्टीविषयी विचार करिता आम्हास स्फूर्ति झाली की कोटामध्ये चौरस्त्यांत विराजित असलेला आंग्लराणीचा पुतळा हे महत्वाचे ठिकाण आहे. याच बाईने ५७ सालचे बंडानंतर गुळचट थापा मारून हिंदुस्थानांत असती तर बेहत्तर आहे प्राण गेले असते तरी पण प्रत्यक्ष सूड घेण्याची तजविज आम्ही केली असती. अवांतर गोरगरिबास कोण विचारतो. पण मोठ्या दुःखाची गोष्ट आहे की आमच्या दुर्दैवाने ती इथे नसून कधी येण्याचा संभवही नाही. करीता तिची पाषाणमय प्रतिमा ही तिच्या ठिकाणीच मानून श्रीमनमहा करून घ्यावा असा विचार करून आम्ही त्या उद्योगास लागलो. प्रथम ते ठिकाण चांगल्या तऱ्हेने पाहून सोई गैरसोई लक्षांत आणल्या आणि त्या पुतळ्यास काय करायचे या विचारांत पडलो. तो प्रथमतः आमचे असे मत होते की एका हातोड्यानी इचे मस्तक चूर्ण करून टाकावे. पण पूर्ण विचारांती थोड्या वेळांत असे होणे कठीण आहे असे आम्हास वाटून तो नुसता विद्रूप करून टाकावा यापेक्षा जास्त शक्य नाही. तेव्हा ठरले की बोलल्यासारखे जो मनुष्य वागत नाही त्याचे तोंड काळे होत असते. करिता हीच सिक्षा आपण ईला करू असे मनांत आणून आम्ही या गोष्टीचा व्यूह रचू लागलो. पुढे आमचे ठरले की एक चरणसंपुटाची नवरत्नमईमाळा ही अत्यंत प्रेमपूर्वक अर्पण करावी. पण ही नवरत्ने आणावी कोठून ही मोठी नसून लहान असली पाहीजेत म्हणून आम्ही प्रयत्न करु लागलो. दुसरी गोष्ट ती चरणसंपुटे नवीन नसली पाहीजे. जितकी जुनी मिळतील तितकी उत्तम. तेव्हा असा योग कसा यावा. हा पदार्थ बाजारात पैसे खर्चून मिळण्यासारखा नाही तो आणावा म्हणून आम्ही पुष्कळ उकिरडे पाहिले पण एकही रत्न आम्हास प्राप्त झाले नाही. पण खरी निष्ठा असलेमुळे परमेश्वर आम्हाला साध्य आहे. मुंबईस मी

आलो स्नानसंध्या नमस्काराकरिता वागळे म्हणून कांदेवाडीत एक सभ्यगृहस्थाचे घर आहे. त्याच्या इथे मी प्रशस्त जागा म्हणून जात होतो. त्याठिकाणी मी रत्न शोधत असता एका अडगळीचे ठिकाणी जिन्याखाली ही चरणसंपुटे टोपल्यात असलेली आढळली ती मी मोठ्या शिताफीने चोरून आणली आणि मग त्याची माला तयार केली. माळेच्या मध्ये आम्ही फारच अमंगळ पदार्थाचे गोंडे लाविले होते. हा पदार्थ कोणता हे मी लिहू शकत नाही. या माळेत असणारी चरसंपुढे तीन चार जातीची होती. असी ही माळा तयार करून ठेविली. हा सर्व विधि दसऱ्याच्या मुहूर्तानी करायचा काय. आमचे पूर्वज या दसऱ्याच्या सुमुहूर्तावर निघूनच शत्रूला जेर करीत असत. ही आपली पुरातन वहिवाट लक्षात आणून आम्ही हा श्रीमनमाहा करण्याचे योजले. जोतिषशास्त्राप्रमाणे दसऱ्याचे दिवशी पहाटे एक सुमुहूर्त सापडला आणि एक दसऱ्याच्या दुसऱ्या दिवशी रात्री दोन वाजता हे दोन मुहूर्त फार उत्तम होते. प्रथम काम शास्त्रोक्त रितीने करायचे, असा आमचा संकल्प होता. तेव्हा ठरल्या मुहूर्तालाच काम करायचे असा आम्ही निश्चय केला. सहा आण्याचे डांबर आम्ही विकत आणले आणि ते अतिशय पातळ होते. आणि तो वज्रलेप झाला पाहिजे म्हणून आम्ही त्यांत हरभऱ्याचे डाळीचे पीठ आणि वर सांगितलेला अमंगळ पदार्थ त्यांत मिश्रण करून ते तयार करून ठेविले. ते एक लांब नळकांडे होते. त्यात भरून ठेविले आणि सुमुहूर्ताची वाट पहात बसलो. दसऱ्याचा दिवस प्राप्त झाला. आम्ही परमेश्वराची मनोभावाने प्रार्थना करून आरंभिलेल्या कामात यश देण्यास विज्ञप्ती केली आणि पहाटे उठण्याकरिता निश्चय केला पण होणारी गोष्ट आम्ही त्यादिवशी उशीरा निजून उठलो. त्यामुळे आमचा सर्व बेत फसला. दुसरा मुहूर्त मात्र चुकविण्याचा नाही असा आम्ही निश्चय केला. त्या दिवशी परमेश्वराचे चिंतन करीत जागेच राहिलो. रात्री आठ वाजताच आम्ही डांबराचे भांडे आणि चरणसंपुटाची नवरत्नमाळा एका खुणेच्या जागी पूर्वीच नेवून ठेविली होती. रात्री दोन वाजण्याचा समय येताच आम्ही गजाननाचे स्मरण करून निघालो. त्यावेळेस चांदणे चटक पडले होते. ठिकठिकाणी पोलिस रस्त्यावर स्तब्ध उभे राहिले होते. मी एक काना इतकी लांब काठी हातात घेतली होती आणि मी निराळाच चाललो होते. बंधूच्या हातात लोखंडी नळी होती. अशा रितीने पृथक पृथक चाललो. आम्ही सडकेने न जाता मरीन बदानू [ड्राईव्ह] चे मैदानांतून पुतळ्यापाशी असलेल्या गेटापाठी मागून पुढे गेलो. आणि तेथे एके ठिकाणी की जरा बसून बंधू पुतळ्याकडे एकदा जाऊन आले आणि मग असे ठरले की एकानी पुतळ्याची पूजा करावी आणि एकाने त्याचे संरक्षण करावे. यदापि मध्ये अडथळा आला तरी पूजा करणाराने आपले काम संथपणे शेवटास न्यावे आणि संरक्षण करणाराने अडथळ्याचे निवारण न बोलता शेवटल्या उपायाने म्हणजे दंडानी करावे असे ठरून त्या कामाकरिता मी बाहेर संरक्षण करण्याचे पत्करले आणि बंधूनी पुजा पत्करली. दोघे निघालो. ठरल्याप्रमाणे बंधू हे पुतळ्याचे उजव्या बाजूने कंपाउंड ओलांडून आत गेले. आणि मी सडा होऊन गेटाचे बाजूस उभा राहिलो. त्यावेळेस गेटात एक हातात घेण्याचा कंदिल अंधुक जळत होता. एकदोन शिपाई बिडी पीत असल्याचे अंधारात अस्पष्ट दिसत होते. मी अशा ठिकाणी उभा राहिलो होतो की ज्या ठिकाणी पुतळा स्पष्ट दिसावा आणि गेटातील चाहूलही चांगली समजेल. बंधू पुतळ्यावर चढावयाचे सुमारास एक इसम रस्त्यावरून गेटाचे बाजूने जो रस्ता जातो त्या रस्त्याने गेला. हा इसम पोलीस हवालदार किंवा जमादार असावा असा आमचा अंदाज आहे. ह्या इसमाच्या नजरेस आपला प्रकार पडून आपणास कामगिरी पडेल असे मला वाटले. व तसा प्रकार न होता तो धडक निघून गेला. इतक्यात बंधूंची पूजाही आटोपली. माळ गळ्यांत घातली तेव्हा तिचा उरस्थळावर प्रहार होऊन आवाज जाहला. पण शिपायाचे लक्ष इकडे लागले नाही. बंधू कंपाउंड ओलांडून पार जाहले. तसा मीही त्याना जाऊन रस्त्याला मिळालो. काम पडले तर निरनिराळे रस्ते पाहून आम्ही ठेवले होते पण काम न पडल्यामुळे आम्ही नीट राजरस्त्याने घरी निघून गेलो. घरी पोहचल्यावर नियमाप्रमाणे परमेश्वराची स्तुती स्तोत्र केले आणि निजलो. दुसऱ्या दिवशी सकाळी आम्ही तिकडे गेलो. त्याठिकाणी पुष्कळ लोक हिंदु, पारशी, मुसलमान, आणि युरोपियन जमले होते. युरोपियनावाचून सर्वांस आनंद झालेला दिसला. त्याठिकाणी पोलीसही

अनुक्रमणिका

जमले होते. नवरत्नमाला पोलीसानी कापून गेटात ठेवली आणि मोठ्या जोराचे पाणी उडवून डांबर काढू लागले. इतक्यात पोलीस अधिकाऱ्याकडून मनाई आली की सध्या बंद ठेवा. उपाय करू नका. इतका प्रकार पाहून आम्ही घरी परत आलो. सुमारे बारा वाजता ही पुकार गांवात झाली. रात्री तर सर्वातमुखी या गोष्टीची चर्चा सुरु झाली. सर्व लोक हे काम करण्याचे छातीचे वर्णन करू लागले. इंग्रजी पत्राचे कलमाचे कलम या विषयावर भरू लागले. आमची मराठी पत्रे मनांत तर खुष जाहली. त्यावर कांही आपल्या पत्रात या डांबीसाला पकडून शिक्षा झालीच पाहिजे इत्यादी उद्‌गार काढू लागली. अनेकाचे अनेक तर्क होऊ लागले.

**ह्या कृत्याबद्‌दल हिंदूचे नांव जाहीर करण्याचा प्रयत्न**

कोणी म्हणे हे काम हिंदुमुसलमानाचे नसून युरोपियनांचे आहे. कोणी म्हणत मुसलमान जात म्हणे की हे काम इतक्या धर्माचे, हिंदूकडून होणेच नाही. अशी कर्णकटू अक्षरे कोणाच्या तोंडी ऐकिली की आम्हास फार राग येत असे. तेव्हा हिंदूचे नांव हे काम केल्याबद्‌हल जाहिर झाले पाहिजे म्हणून आम्ही अगोदरच तेथे राणीच्या बैठकीवर एक पत्र लिहून ठेविले होते. पण ते पोलिसाचे हाती लागले नाही असे कळते. यावरून ते वाऱ्याने उडून गेले असावे असे दिसते. टाईम्समध्ये सर्व वर्णन आहे पण माळेतील पत्र कोठे वर्णनांत आले नाही. सबब आम्ही टाईम्सला एक पत्र पाठविण्याचा विचार केला. पण आम्हास इंग्रजी लिहिता येत नसल्यामुळे एक युक्ती योजिली ती अशी की, समस्त पत्रांत ज्या कांही धोरणाकरिता ते पत्राबद्धल लिहून येणे इष्ट होते, म्हणून अशी खुबी केली की ठाणे येथे स्वदेश नांवाचे वर्तमानपत्राचे एडिटरास आम्ही एक निनावी मराठीत पत्र पाठविले. त्यांतील मजकूर येणे प्रमाणे होता. आम्ही दंडपाणी नांवाची एक कंपनी काढली आहे. आमचे ब्रिद स्वधर्माकरिता मरणे आणि मारवाणे. ही मंडळी गेल्या दसऱ्याचे सुमुहूर्ताने स्थापन होऊन तिने आपले पहिले काम काळ्या गोऱ्यात भेद ठेवण्याकरिता जी राहीली तिचे तोंडास काळीमा लावणे हे केले. या कामावरून ही मंडळी जगांत जाहीर करीत आहे की, या दंडपाणी मंडळीला कोणाची भिड नाही. तिच्या पलीकडची कोणी असो. आणि तो करणारा कोणी का असेना ते मंडळीचे शत्रूस्थान होईल. इतक्या विस्तारावरून मंडळीचा उद्देश लक्षांत येईल. मंडळीस हस्तेपरहस्ते मदत करणे हे सर्व आर्यबांधवाचे काम आहे. करीता थोडी तकलीफ देतो की खाली लिहिलेल्या मजकूराचे पत्र इंग्रजीत टाईम्सला पाठविणे तेणेकरून मंडळीस मदत केल्याचे श्रेय आपणास येणार आहे. पत्राचा सारांश इतकाच होता की, ते पत्र माझे मित्र ब्रुईनसाहेब याचेजवळ होते ते छापावे असे माझे मत आहे.

वर लिहिलेले पत्र सूर्योदयाचे एडिटर याला पाठविले पण टाईम्समध्ये आमचे पत्र प्रसिद्ध झाले नाही तेव्हा आम्ही समजलो की त्यांनी टाईम्सला पत्र पाठविले नाही. पण ते त्यांनी पाठविले असे आता समजले. अशा रितीने हे रात्रीच्या पुरते प्रथम कृत्य पार पडले. मात्र हिसाबात खर्च कमीजास्त अद्यापपर्यन्त चालूच होता. त्यांत कांही गंमतीच्या गोष्टी निघत त्याचा शतांश जरी लिहून आला तरी विचार फार होणार आहे.

अनुक्रमणिका

# इंग्रजी शिक्षणावर टीका

### ग्रंथीक सनीपाताची साथ सुरु

ग्रंथीक सनीपाताची साथ वाढत्या प्रमाणावर होती. सरकारी हुकूम जिकडे तिकडे इंग्रजाचे जाहले. वंचना होऊ लागली मुंबई सोडून लोक देशोदेशी पळून चालले. बाहेरगावचे लोक साथीला भिऊन येईनासे झाले. अशा संधीस मॅट्रीक परीक्षेचा समय आला. येथील परीक्षेसाठी भव्य मंडप कुलाब्याजवळ दरवर्षाप्रमाणे पडला. रोगाची साथ क्षणोक्षणी वाढत चालली.

### इंग्रजी शिक्षणावर टीका

देशोदेशीचे लोक या आधी कांही लोकास परीक्षा पुढे ढकलण्याविषयी अगदी कंबर बांधून झटू लागले. पण हे अधिकारी आपला हट्ट सोडीनात. तेव्हा आमच्या मनांत आले की हे काम आपण हाती घ्यावे म्हणजे हे काम उरकेल, अशा आमची खात्री जाहली. दुसरे, या फाजील शिक्षणावर आमचा फार कटाक्ष आहे. असे आमचे मत आहे की आमचे जे शारिरीक नुकसान जाहले त्याचे कारण म्लेंच्छ विचार हे होय. एकंदर जनसमाज विद्येच्या पाठीमागे लागून फाजील विचारी झाला आणि तेणे बद्दल मर्दपणास मुकला. आता कोणी आम्हाला लाथाबुक्या खाली जरी चेचले तरी आम्ही आणि अर्ज करून विचार करिता बेजार, इतके जरी या विद्येपासून नुकसान जाहले आहे परंतु आमचे विद्वान लोक दोन्ही हातानी दर्शवित आहेत की सरकार आम्हावर हायर एज्युकेशन जसे व्यसनी असून गरीब मनुष्य आपले व्यसन भागविण्याकरिता एखादा श्रीमंताचा मुलगा पाहून आपल्या पदरचे पैसे खर्च करून प्रथम त्यास व्यसन लावावयाचे नी मग त्याला चांगले व्यसन लागले की आपला हात आखडून त्याच्या पैशाचा शेवट होई पर्यंत तो आणि आपण मजा मारायची त्याप्रमाणे इंग्रज लोक जेव्हा हिंदुस्थानचे राज्यसूत्र चालू लागले तेव्हा त्यांना वाटे की हिंदु लोकांचा उग्रपणा घालविण्यास विद्यावर्धन त्यास लाविले पाहिजे. असा विचार करून आपल्या पदरचे देतो खरा पण आता हे व्यसन आमचे अंगी चांगले जडले असे पाहून आता हात काढून घेत आहेत. हे जो जो हात काढू लागतात तो आमच्यातले लोकाना वाटते की आमच्या खरा हिताचा मार्ग हाच होय. ते उच्च शिक्षण घेण्यास काकू करतात असे वाटून उलट विद्यार्थ्याच्या पाठिमागे लागतात पण माझ्या बांधवानो, यात तुमची चूक आहे. तुम्हास शिक्षण दिल्यापासून त्याचा तो मनसुबा उलटण्याचा ठराव आहे. ते जे शाळा आणि कॉलेज बंद करू पहातात ते शिक्षण बंद करण्याकरिता हेतू खर्च कमी करण्याकरिता. त्याना सूख आहे की आता जरी आपण या शिक्षणातून अंग काढून घेतो तरी व्यसनी लोक स्वतःची शाळा कॉलेजेस काढावयास आमच्या बंगल्यावर खेपा घालतील आम्हास पानसुपारी करतील आणि परवानगी देतील आणि याप्रमाणे कसून प्रकार चालू आहेत. जर यांना शिक्षण द्यावयाचे नाही तर बायकांना शिक्षण देण्यास का इतके तडफडतात. हलक्या जातीत शिक्षण देण्याकरिता का हे नेहमी उद्योग करतात याचे कारण ज्या जातीत हे व्यसन चांगले लागले नाही त्याना लाऊन मग मनचाही बसायचे. अलिकडे मराठे वगैरे जागीरदार ओरडतील की आम्हाला शिक्षण मिळत नाही. ब्राह्मण मात्र खुशाल घेतात. पूर्वी ब्राह्मण लोकानी असेच आपलपोटेपणा करून आम्हास अज्ञान ठेवून आपण हुशार होत असत. करिता मायबाप सरकारनी दयाळू होऊन आम्हास शिक्षण द्यावे असे अर्ज ते वारंवार करीत. पण कळत नाही की विद्या विकून ब्राम्हण लोकानी सर्वत्र देवधर्म, जातगोत, नीति आणि मर्दनामर्दपन या सर्वाचा सत्यानाश केला. हे धडधडीत प्रकार या

शिक्षित मंडळीचे ठिकाणी हरदम दिसत असून जर त्या ज्यातक विद्या देशी दुर्दशा आणील तर बेलाशक शिका आणि बायका व्हा. असो. हे शिक्षणाविषयी विचार आमचे आम्ही विरूद्ध धरतो. हे ऐकून पुन्हा लोक आम्हाला मूर्ख ठरवितील. म्हणोत बिचारे. ज्याच्या गावांत धोतर नेसणाऱ्याशी मूर्ख ठरविणाऱ्या ह्या सूज्ञ लोकाचे जो ऐकिल तो शहाणा ठरले. या संबंधाने पुष्कळ जास्त लिहता येईल पण विस्तार करून लिहित नाही. सारांश इतकाच की आम्ही पाहिले की प्रस्तुत लोकसमाजाविरूद्ध ही युनिव्हर्सिटी वागत आहे. आणि आपल्याला विनवित आहे. करीता हिच्या नुकसानी करीता आपण प्रयत्न करू असा विचार करून आम्ही त्या परीक्षेच्या मांडवाच्या तपासास लागलो.

**परीक्षेचा मंडप जाळला**

तपास करिता मांडव कुलाव्याजवळ तयार होत आहे असे ऐकिले. मांडव परिक्षेच्या आदले दिवशी जाळावा असे आमचे मत होते याचे कारण, पुनःकरणाची सवलत मिळाली पाहिजे. म्हणजे अलबत परीक्षा पुढे ढकललीच पाहिजे. पण मग विचार केला की आदले दिवशी जर न संधी मिळाली तर दुसऱ्या दिवशी परीक्षा सुरु होणार करिता एक दोन दिवस अगोदर जळाला तरी हरकत नाही. असा विचार करून मंडप पाहून कोणते बाजूने काम करावे याचा निश्चय करून आम्ही त्या तयारीस लागलो. अपरात्री इतक्या लांब जाणे कठीण जाईल असे जाणून हे काम नऊ वाजण्याचे पोटांत करावयाचे ठरले.

त्या प्रमाणे करावयाची वाट कंपाउंडची कायम केली. प्रयोगास साहित्य आणि क्रिया फिलिप्स कंपनी पुणे बुधवार पेठ येथील मिशनरीच्या माडीवर ज्या रितीने आम्ही अग्नी लावला तीच क्रिया या ठिकाणी उपयोगांत आणली. चोरवाटेने आम्ही कंपाऊंड उतरून पार झालो व विरूद्ध दिशेने चर्नीरोड स्टेशनकडून आम्ही घरी आलो. आम्ही बरेच लांब आल्यावर आगीचा उजेड दृष्टीस पडला घरी आलो तो आमच्या चाळीतून चांगली दिसत होती. पण लोक म्हणाले की ही आग मांडवाची आहे. मात्र सगळी चाळ माडीवर चोरासारखी कशाला आग लागली म्हणून मजा पहात होती. त्या मंडळीत आम्ही उभे राहिलो. यद्यपि सर्व न देता त्यांच्या बरोबर आम्ही आश्चर्य चकित होऊन पहात होतो. दुसऱ्या दिवशी चांगल्या तऱ्हेने लोकांत ही गोष्ट कळली की मांडवास आग लागली तेव्हा सुशिक्षित लोकांस विशेषे करून परमानंद जाहला. ही आग दोन गाडीच्या बादचे ठिणगीपासून लागली असे पोलिसाने कळविले. त्यांनी आपली जबाबदारी आपल्यावरची निवारण केली. पण लोकानी ही आग कोणीतरी पुणेकरानी लावली अशी दाट वंदता होती. राणीच्या तोंडाला काळे लाविल्या बद्दलही पुणेकरांचा संशय इंग्रजी पत्रात प्रसिद्ध आहे. मग काय आधारावरून तर्क करीत होते कोण जाणे पण आम्हाला या पेशवाई पुणे शहराचा मोठा अभिमान असलेमुळे आम्हाला हे ऐकून आनंदच होत असे. याप्रमाणे मांडवाची आहुती झाल्यानंतर अधिकाऱ्यास परीक्षा पुढे ढकलणे भाग पडले. अशा प्रकारे लोकोत्तर, काम केल्यामुळे मोठी तारीफ ऐकून झाली ती आम्हास फार आनंद होत असे. हे काम झाल्यानंतर थोड्याच दिवसांनी आम्ही सहकुटुंब पुण्यास आलो.

**स्वधर्म निंदकांचा छळ करण्याचा बेत**

पुण्यास आल्यानंतर आम्ही पुण्यास महत्वाचे काम पाहू लागलो. पण लवकर लक्षात येईना. पण काही तरी कामगिरी करून धर्मभष्टांचा छळ आणि स्वधर्मनष्टांचा गौरव हाच आमचा धंदा असल्यामुळे यावाचून आम्हा उभय भावाना चैन पडत नसे. काय करावे, कसे करावे या विचारांत आम्ही नेहमी निमग्न असायचे. आमच्या सूक्ष्म दृष्टीत धर्मनष्टाचे नफानुकसान लपून रहात नसे. सगळ्यात आमचा कटाक्ष सुधारक

आणि ज्ञानचक्षु या पत्रावर फार असे या उभय पत्राचे चालक आणि मालक हे आम्ही पूर्ण रितीने माहिती करून घेतले होते. सुधारकाच्या एका एडिटरास काही दिवसापूर्वी दंड करून नंतर ताकीदपत्रही पाठविले याचे स्मरण वाचकांस असेलच. पण लिहिण्यास फार दुःख वाटते की आमच्या ताकीदीप्रमाणे पहिला अंक मात्र आमच्या म्हणण्याप्रमाणे काढला. तो पण पुढे आपला हिनधर्म ठरेल असा अपमान केला हे आम्हास सहन झाले नाही आणि निश्चय केला की देवधर एडिटराचे मस्तक भयंकर रितीने कापून स्वधर्मनिंदेपासून उत्पन्न होणाऱ्या पातकाला दंड किती भयंकर असतो हे जगास दाखवावे. पण याबद्दल पूर्ण विचार करता असे ठरले की प्रथम एखादा युरोपियन अपराधी पाहून त्याला दंडाची शिक्षा देऊन नंतर या नरपशूना पुन्हा ताकीद द्यावी की ज्याच्या जीवावर हे तुम्ही उड्या मारता त्याची दशा आणि अब्रु उडविली, करीता अजून सावध रहा. अशी ताकीद देऊन जर हे आपल्याच घमेंडीत रहातील तर त्यांची दया न करता एकदम भयंकर शिक्षा द्यावयाची असा विचार करून आम्ही या विद्वान शिरोमण्याकडे दुर्लक्ष करू लागलो.

**भावे स्कूलच्या मास्तरांवर हल्ला**

इतक्यात आमचा प्रिय मित्र भिस्कुटे यानी वर्दी दिली की भावे स्कूलमध्ये थोरात या नावाचा एक मास्तर आहे. तो फार वाईट आहे. तो वाईटपणा कोणता म्हणाल तर सृष्टीविरूद्ध कर्म करणे. चांगली चांगली स्वरुपवान कोवळी पोर पाहून हा सुशिक्षित मास्तर त्या गुलनार पोरीवर फार प्रिती करतो आणि त्यांनाच वर मार द्यायचा असा परिपाठ आहे. हा थोरात असा असल्याबद्दल आम्हास पूर्वीच कळले होते.

जितके म्हणून वाईट चालीचे लोक आहेत त्या सर्वांची आम्ही नोंद ठेवीत असतो. आमचे यादीत पुष्कळ असे नराधम आहेत की ज्यांची दुःखद वेदना क्रमाक्रमाने आम्ही अलाहिदा करणार होतो. पण परमेश्वराची मर्जी या जन्मात आमचेकडून ही कामगिरी होण्याचे दिसत नाही. ईश्वरेच्छा बलियसि. जितके म्हणून विद्वास आहेत तितके दुर्गुणविमंडीत आहेत. बहुधा हा शिक्षणाचा परिणाम आहे. अस्तु. थोरातांची वर्तणूक या प्रकारची आहे. अशाबद्दल आम्ही भावे स्कूलच्या नांवावर कित्येकदा निनावी पत्रे पाठविली होती की या मास्तरांस शाळेत ठेवणे चांगले नाही. यापासून मुलास फार वाईट रीत लागली. तरी आपण त्यास शाळेतून काढून टाकणे आपले हितास्तव होते. अशी निनावी पत्रे आणि आम्ही मागे पाठविली पण मनासारखा बंदोबस्त जाहला नाही. पुढे पुढे याचे विशेष गुह्य म्हणजे यास देवधर्माची निंदा क्लासांत करणे इत्यादी बरेच कळले. तेव्हा यास आपल्याकडून शिक्षा जाहली पाहिजे. असे भिस्कुटे याचे मत आहे आणि हे काम भिस्कुट्याचे हाताने त्याला देय ठेवण्याकरिता करविण्याचे ठरून त्याच्या घराचा सर्व नकाशा पाहिला व मंत्र्याच्या वाड्यात माडीवर रुमावरचे खोलीत रहात असे रुमाचे बाजूस एक लहानशी खिडकी आहे त्यावाटे आमचा बंधु आणि भिस्कुटे हे दोघे आत जाऊन पाहतात तो, तो जागा होता. कापडाचे बोळात हा निजला होता. याला चाहूल लागताच त्याने हळूच कोण आहे कोण आहे असे वारंवार तोंडाने बोलू लागला. तसा बंधूनी त्यास तडाखा मारला. पण तो अगदी घाबरेपणामुळे साधारण बसला तसा तो ओरडला मग बंधुनी दुसरा तडाखा जरा बरा दिला आणि मोठ्या जलदीने खिडकीतून उडी टाकून निघून गेले. खाली उडी टाकताच हातातील दोन लोखंडी नळ्या वरच राहिल्या त्या पोलिसाचे ताब्यात गेल्या या गोष्टीचा गवगवा गावात दुसऱ्या दिवशीच झाला. पण त्यांत आमचा हेतू स्पष्ट झाला नाही. लोक म्हणत की कोणी चोर चोरी करण्याकरिता आले होते. पण त्यांना साधली नाही. म्हणून निघून गेले. असे जो तो म्हणे पण त्यांच्या दुर्गुणांचा उच्चार कोणी करीना. याचे कारण तो मनुष्य प्रसिद्ध नव्हता. या कामापासून आम्हास विशेषसा आनंद जाहला नाही. कारण या कामात आमचा धर्माभिमान व्यक्त जाहला. यानंतर आम्ही कांहीतरी करायचे म्हणून सुधारक याची ऑफिसची पाटी एके रात्री काढून तो नंतर रस्त्यांत खासगीवाले

अनुक्रमणिका

यांचे शेत खड्ड्यात लाविली आणि शेतखड्ड्यांत असलेल्या अमंगळ पदार्थाचे एक मडके जेथे सुधारक ऑफिस आहे त्या ऑफिसच्या दाराच्या कडीवर टांगून ठेविले आणि त्या मडक्यावर माकड आमचा गुरु असा लेख लिहिला होता. असा प्रकार रात्री करून दुसऱ्या दिवशी ती मजा पहाण्यास सकाळी आम्ही गेलो पण हा प्रकार फार वेळ टिकला नाही. त्यामुळे ती मजा लोकास मनसोक्त पाहण्यास मिळाली नाही. तरीपण गांवांत थोडी चर्चा जाहली. नाही अशी नाही.

**युरोपियनाने आणलेला खेळ बंद पाडण्याचा प्रयत्न**

हा प्रकार झाल्यानंतर काही दिवसांनी नवे मंडईत एका युरोपियनानी एक प्रकारचा खेळ आणलेला पाहिला. प्रथमतः त्याचे अगडबंब सामानच दोन दिवस पूर्वीच येऊन पडले होते. त्या सामानाच्या देखाव्यावरून हा काय अपूर्व खेळ आहे याचा आम्हाला उलगडा होईना. पण जेव्हा त्याने रचून उभा केला भ्रम फिरला. या खेळाचे वर्णनरुपाने एखादा वाचकापुढे मांडणे जरूर आहे. मित्रहो, हा खेळ मोठासा अपूर्व नव्हता पण आमचे लोकांचे अज्ञान मात्र अपूर्व आहे. आपल्या या हिंदुस्थानांत ज्या ज्या ठिकाणी जत्रा आणि सामान भरतात त्या त्या ठिकाणी हा खेळ गरीब लोकांनी आणलेला माझ्या पहाण्यांत आहे. एक मोठा खांब पुरायचा नी त्या स्तंभावर एक छत्री फिरावयाची आणि त्यास हत्ती, घोडे, उंट असतात त्यावर एकेक पैसा खेळून बसावे. या लाकडी घोड्यावर बहुतेक मुले किंवा ग्राम्य लोक बसत. सज्ञान लोक बसत नाहीत. असा आपल्या इकडचा रिवाज आहे. अर्थात इतका ग्राम्य तो खेळ आपण समजतो तोच खेळ मार्का गांव येथला होता. भेद इतकाच की त्यांत काही सुधारणा केली होती. या छत्रीस दोन मजले केले. दुसऱ्या मजल्यावर एक प्रकारचा थाट केला होता. या मजल्यावर मध्ये मध्ये काच ठेवली होती. या छत्रीस नकली सामान लावून फाजील शोभा आणली होती. छत्री फिरत असता एक प्रकारचा बाजा वाजत असे. रात्री कंदिलाचा चकचकाट मागे असे. याचे दोन दर ठेविले होते. खाली दोन आणे आणि वर चार आणे ही सत्री फिरू लागली म्हणजे जो आनंद किंवा सुख आपल्या त्या ग्राम्य छत्रीत असे, तोच या छत्रीत पण हा युरोपियनानी आपला असल्यामुळे आमच्या इकडचे हे दिडशहाणे भूतासारखे पहाण्यास जात, ज्या खेळास आमच्याइकडे पैसा पैसा देऊन गरीब लोक पोट भरतात. त्याला आमचे लोक आम्ही सभ्य म्हणून आश्रय देत नाहीत. आणि युरोपियन पहाताच आपला दर्जा विसरून चार चार आणे देऊन वारंवार पोरासारखे खेळ टाकतात. तेव्हा या विद्वानांना काय म्हणावे हे मला कळत नाही. या खेळास सुधारक आणि त्यांच्या बायका पुष्कळ येत असत. ही सुधारक जात आमच्यात कलंकरुपाने जाहली आहे. या मोठ्याना स्वाभिमान म्हणून काय आहे ठाऊकच नाही. इंग्रजांनी किती जरी अक्कल खर्चून कला निर्माण केली तरी त्यावर आम्हा उभय बंधूना कधीही आनंद उत्पन्न होणार नाही. फोनोग्रामसारखेच चमत्कार वाटण्यासारखे खेळ हिंदुस्थानांत आजपर्यंत आपण लोक पैसे देउन आग्रह करीत असता आम्ही अभिमान पुरःसर खेळ पाहिले नाहीत. कदाचित् पाहिले असल्यास कौतुक वाटले नाही. याचे कारण अभिमान. आम्ही परकीयाचे अपूर्व खेळ पाहिले नाहीत म्हणून काही उपाशी राहिलो नाही व स्वाभिमानशून्य सुधारकानी ते पाहिले म्हणून काही ते विशेष पुष्ट दिसत नाहीत. परगृहस्थ मात्र आम्हास लुटून आपली तुंबडी भरून निघून जातात. हा प्रकार पाहून आम्हाला संताप येत असे. पण उपयोग काय आमच्या या अडाणी (ते म्हणतात की आम्ही विद्वान आहोत पण यांची किंमत आम्ही अडाण्यामध्ये करीतो.) अशा लोकास काय सांगा? यांना सांगण्यापेक्षा या दर्शनी भुलविणारे खेळाचे उच्चाटन येथून करणे सोईवार होईल असा विचार करून आम्ही ठरविले की या छत्रीस आग लावून द्यावयाची आणि त्याप्रमाणे फॉस्फरस आणून त्याच्या चकत्या करून त्याला टाचण्या लावून तयार केल्या भिस्कुटे आणि बंधू बापूराव यांनी वर मजल्यावर जाउन त्याठिकाणी याचा प्रयोग करावा आणि मी खाली त्याच्या खासगी तंबू आहे त्यावर प्रयोग करावा आणि उभय तंबूंस एकदम आग

लावावी अशी तजबीज केली. बंधु याप्रमाणे वर गेले. व ते उतरायच्या संधीस मीही खालचे बाजूस यासरशी खाली आग लावली. सर्व प्रेक्षक मंडळी ती आग विझविण्याच्या तयारीस लागली. आम्ही वाट पहात होतो. इतक्यात छत्रीची अगदी लागट होईल पण काय जाहले असेल ते असो ती आग काही लागली नाही. मग बंब येउन आग विझविली गेली. बरेच नुकसान जाहले. मग दुसऱ्या दिवशी बंदोबस्ताकरिता पोलिस आले त्यादिवशी आम्ही थोडासा हल्ला केला त्यांत त्याचे बरेचसे कंदिल आणि घोडे उंट याचे नुकसान जाहले. अखेर तो युरोपियन त्रासून त्या ठिकाणाहून तो खेळ काढून स्टेशनजवळ गेला. मग आम्ही त्याचा नाद सोडला. या कामापासून फारसा आनंद आम्हास झाला नाही. इतकेच रिकामपणी उद्योग करीत आहोत असे वाटले.

**साथीचा जोर**

इतक्यात शहरात ग्रंथीक सन्नीपाताचा आजार वाढत चालल्याची वार्ता ऐकू येउ लागली. सरकार या विषयी चांगला बंदोबस्त करते असे अनेक लोक बोलू लागले. तो बंदोबस्त मुंबईसारखाच होणार असेही लोक म्हणत.मुंबईत जो बंदोबस्त होता तो आम्हास बिलकूल पसंत नव्हता. तेव्हा आमचा नियम झाली की तर या ठिकाणी मुंबईसारखा बंदोबस्त सुरु जाहला तर आपण या विरुद्ध ओरड करायची याप्रमाणे विचार करतो तो हळूहळू ती पद्धती सुरू जाहली.

**त्याच्या बंदोबस्तासाठी रॅंड साहेबाची नेमणूक**

आणि थोड्याच दिवसांत ऐकण्यात आले की कोणी रॅंडसाहेब म्हणून आले तो या कामावर नेमला. शोध करता हाच रॅंडसाहेब बहादूर सभ्य गृहस्थास कैदीची शिक्षा देणार. मग आम्ही विचार केला की कचेरीच्या इतर अधिकाऱ्यांना त्रास देउन त्यांना सावध न करितां मुख्य इसमास शासन करावे. रॅंडसाहेबाची आम्ही तो चांगला आहे की वाईट आहे याबद्दल चांगल्या तऱ्हेने चौकशी केली. ती सर्व शहरात सर्वतोमुखी तो दुष्ट आहे असे ऐकण्यात येईल. याबद्दल सर्वप्रसिद्ध आहे. तथापि आपल्या शहरांत त्याचा दुर्गुण दृष्टीस पडण्याची आमची फार इच्छा जाहली रॅंडसाहेब नेमला इतके ऐकिल्यापासून आम्ही दोघे भाऊ आणि भिस्कुटे असे तिघे त्याच्या तपासास लागलो. पण तो दृष्टीस पडेना. कोण म्हणे तो असून आला नाही. कोणी म्हणे आला. अशा अनंत गप्पा शहरांत पसरत. आम्ही लष्कर हद्दीत दररोज हेलपाटे घालू लागलो पण त्याच्या बंगल्याचा शोध लागेना. कमेटीवर पुष्कळ वेळा गेलो. त्याठिकाणी हंगकांगचा बेव्हरीन कर्नल फिलिप्स डाकतर वगैरे गोरे दिसत. त्यापैकी कर्नल फिलिप्स हाच आम्ही रॅंडसाहेब समजत होतो. पण तो भ्रम एके दिवशी चांगल्या आधारावरून पिटला. हा कसा समजेल या चिंतेत आम्ही निमग्न होतो. कोणाला प्रसिद्ध रितीने विचारता येईना. कटवार शोधायचा असा किती दिवस आमचा प्रयत्न नुसता रॅंड साहेब दृष्टीस पडण्यास लागला याचे कारण तो त्यावेळेस इथे आलाच नव्हता. उगाच गप्पा लोकांत पिकत की तो आला आणि कामावर रुजू जाहला पण पुष्कळ दिवसानी तो कामावर रुजू जाहला असे आमचे मत आहे. त्यादिवशी ही मूर्ति आम्हासा स्पष्टपणे पहाण्यास मिळाली तरी आम्ही तोच रॅंडसाहेब आहे अशाविषयी बहुमुखानी खात्री करून घेतले. नंतर त्याची गाडी पाहिली आणि मग गाडीवाल्यास भिस्कुट्याकडून विचारिले की रॅंडसाहेब कोठे रहातात. तेव्हा कळले की रॅंडसाहेब क्लबमध्ये रहातात. मग आम्ही क्लबमध्ये बाहेर खेपा घालू लागलो पण पत्ता लागेना. मग लष्करमध्ये जाणे सोडून आम्ही गाडीचे मागून तपासणीवरच जाऊ लागलो. त्या ठिकाणी सकाळ संध्याकाळ तो आम्हास पहाण्यास मिळे. तपासणी सुरू झाल्यापासून तो रोज सकाळी बुधवारांत येऊन नंतर ज्याठिकाणी तपासणी असेल त्याठिकाणी जात असे.

अनुक्रमणिका

बुधवारांत येई त्यावेळेस त्याला पाहण्यास पुष्कळ लोकांची गर्दी होत असे. प्रथम दिवशीच तपासणी जाहली ती बुधवारांत जाहली. त्यावेळेस जो देखावा दृष्टीस पडला तो अपूर्व होता. लोकास या तपासणीचा प्रकार माहीत नसल्यामुळे ते बेसावध होते. त्याना जर ठाऊक असते की ही तपासणी म्हणजे जीवनलूट आणि तपासणी करणारे गोरे हे बंडखोर आणि त्यांचे नाईक कर्नल फिलिप्स लुई गोरे होते. रँडसाहेब या बंडखोरीवर हुकूम फर्माविणारे मुख्य आहेत. ही बुलूट इंग्रजांचे मनांत चरायची म्हणून पूर्वी जॉन म्हणून एक डाकू नेमून त्याच्याकडून सर्व लहानथोर गोरगरिबांच्या घरास मोठमोठी भगदाडे पाडली. याचे कारण इतकेच की पुढे आपणास दिवसाढवळ्या दरोडा घालण्यास यायचे आहे. त्यावेळेस त्यांत असलेल्या तिजोरीच्या पेट्या किंवा चीजवस्तु दिसावी म्हणून कांही इंग्रज बंडखोरांनी ही अगोदर तजवीज करून ठेविली. जॉनसाहेबांनी प्रथम साधारण तपासणी करून गरीब कोण श्रीमंत कोण याची बारीक तपासणी केली. नंतर त्याची नोंद बंडखोरांना प्रथम दिली असते.

अनुक्रमणिका

# रयतेवर जूलुम

## रयतेवर जूलुम

आमच्याइकडे दरोडेखोर प्रथम बारीक तपासून मग रात्री दरोडा घालतात. तोच प्रकार कायद्याच्या ढोंगाखाली हिंदु लोक गरीब पाहून इंग्रज बंडखोरानी चालविला. हे मायबाप सरकार आपल्या रयतेचे गळे अशा रितीने कापत असे. जर प्रथम लोकास कळले तर कोठेतरी जीव लपविण्यास चीज वस्तु सोडून गेले असते. पण त्याचा हा प्रकार ध्यानांत येऊन तो आपल्या घरी पडले होते. इतक्यांत पहिल्या दिवशी या बंडखोरांची टोळी बुधवारांत आली. बरोबर नाकेंबंदी करून कुलुपे तोडून दुकाने फोडण्यास आरंभ झाला. असा होता तो देखावा. खरोखरीच असा प्रकार राजाकडून प्रजेवर झालेला कधी कोणीही इतिहासांत वाचला नसेल की ऐकिला नसेल, परशत्रूकरिता तयार ठेवलेल्या फौजेचा उपयोग परचक्र आल्यावर कोण करील पण हे आमचे इंग्रज हकदार आणि यांची मर्दानी फौज बंदुका आणि संगीना घेऊन अभागी झालेल्या अर्धमेल्या रयतेवर स्वारी करून त्यांना काबीज करून इस्पितळांत रवाना करतात. धन्य आहे की नाही त्यांची. नाहीतर आम्ही. त्यांची फौज कोणीही मारील पण विशेष म्हणजे आजारी झालेलेना त्यांचे एक पाऊलही वाया जात नाही. त्या लोकास हस्तगत करणे हाच मर्दानी होय असे आमचे इंग्रजांचे म्हणणे. म्हणून तर त्यांनी त्याकरिता कवाईत शिकवून तयार केलेली पलटण उपयोगांत आणली. अशा तऱ्हेने या बंडखोराची लूट सुरू झाली. या लुटीबरोबर आम्ही नेहमी जात होतो. जावयाचा उद्देश, अन्याय स्वचक्षूने पहावयाचा, मी त्याला तपासणी म्हणण्यापेक्षा लूट म्हणणे पसंत करीतो. ही लूट चालू असली म्हणजे रँडसाहेब मुख्य त्यामध्ये. असे बडे बडे कांही इकडून तिकडे फिरत असायचे म्हणजे कुलुपे कशी तोडतात, माल लांबवितात कसे, झोटिंगशाही काय चालली आहे. बरोबर काम करितात की नाही याची देखरेख यांचेकडे होती. त्यावेळेस यांच्या डोक्यांत एक प्रकारची धुंदी असते. तीमुळे ते कोणाही हिंदु गृहस्थास ओळखत नाहीत. बंडखोर मंडळीना नाही तिकडे जाळपोळ पाडतोड, धरपकड याखेरीज दुसरे आढळत नसे. ज्यांनी हा देखावा पाहिला असेल तो या नराधमाना बंडखोरावाचून दुसरी उपमा देतील असे मला वाटत नाही.  ही लूट कोणत्या प्रकाराने होई याविषयी नियम केले होते. त्या लेखी नियमांत पुष्कळ सौम्यपणा ठेविला होता. वर्तणुकीमध्ये त्याच्या अंगी अगदी उलट प्रकार दृष्टीस पडत असे. नियमांत कोणाच्या देवधर्म सोवळेओवळे याचा जेणेकरून उपमर्द होईल अशी वागणूक कोणी करू नये असा स्पष्ट उल्लेख आहे. पण वागताना हे गोरे मुद्दाम आम्हाला चीड उत्पन्न होईल अशी वर्तणूक अमलांत आणीत असत, आणि हा प्रकार रँडसाहेब मोठ्या खुषीने पहात असे. यावेळेस जी आमच्या मनाची स्थिती होत असे ती लिहिण्यास आम्ही असमर्थ आहोत.

## रँडसाहेबाचा खून करण्याचा निश्चय

आम्ही निश्चय केला की याचा जीव घ्यायचा, सोडायचा नाही. असा एक निश्चय झाल्यावर आम्ही त्या तयारीस लागलो. आमच्याजवळ नुसत्या तलवारी होत्या. दोन पिस्तुले होती. पण दारू नव्हती म्हणून ती निरुपयोगी होती शीघ्र काम करण्यास पिस्तुले चांगले. पण काय करिता, साहित्य आणा कुठून. तरवारीनेच आम्ही काम करावयाची उमेद धरली. आमच्या जवळ असलेल्या तलवारीहून दोन तलवारी

अनुक्रमणिका

निवडून काढल्या. त्याला गळ्यांत अडकविण्याकरिता पट्टे लाविले. काळे म्यान होते त्यास पागोटेगुंडाळून ते पांढरे केले अशी तयारी करून आम्ही जागा शोधू लागलो. पण आम्हाला दुसरी कोठे जागा आढळेना. मग आम्ही हे काम कमिटीच्या ऑफिसापाशीच करावयाचे ठरविले. एवढीच अट होती की संध्याकाळचे आठ तरी निदान वाजले पाहिजेत. गावातल्या रिकामटेकड्या लोकांनी रँडसाहेबास निनावी पत्रे धमकीची पाठवून त्यास सावध केला जातो. तेणेकरून आम्हास फार त्रास झाला होता. रात्र तरश करीना. जाता येता बरोबर स्वार ठेवू लागला. तरी आम्ही आपली हिंमत किंचितही कमी होऊन दिली नाही. आम्ही दोघांना ठार करण्याचा निश्चय केला. तरवारी घेऊन आम्हास रात्रीशिवाय निघता येईना आणि तो काही रात्र करीना, असे किती दिवस जाहले. गांवात जुलुम आणि तापाची साथ वाढली. सर्व शहर उजाड झाले. आमच्या वडिलास लांब लांबहून बोलावणी आली की तिकडे तापाची साथ वाढली आहे तर आपण इकडे यावे. वडीलही जाण्यास तयार जाहले. पण आम्हास हे काम कर्तव्य असलेमुळे दूरदेशी जाणे आम्हास पसंत पडेना. म्हणून आम्ही वडिलांच्या जाण्यास हरकत घेऊ लागलो. पुणे सोडावयाचा त्यांचा अगदी आग्रह दिसला, तेव्हा आम्ही ठरविले की दूर जाण्यापेक्षा जवळ आपले घरी चिंचवडला जाणे सोईस्कर होईल. चिंचवड हे पुण्यापासून पाच कोसावर आहे. आम्ही विचार केला की जर चिंचवडास गेलो तर रोज तेथे येऊन काम करून जाउ. असा विचार करून आम्ही चिंचवडचा सल्ला दिला आणि तो वडिलांना पसंतही पडला. म्हणून त्यांनी चिंचवडास आमचे चुलत्यांना पत्र पाठविले. पण त्यांनी अनेक हरकती लिहून चिंचवडास येणे चांगले नाही असा आपला अभिप्राय कळविला अशा रितीने आपले बंधुप्रेम व्यक्त केले तेव्हा जवळ आसपास दुसरी जागा आढळेना. अखेर आम्ही प्रयत्न करून आमचे व्याही परसावे यांची बाग खडकीस आहे ती त्यांची विनंती करून मिळविली. ती आम्हाला चिंचवडपेक्षा सोईस्कर वाटली आणि त्या ठिकाणी आम्ही सुमुहूर्त पाहून गेलो. आम्ही तिघे या भयंकर कृत्याच्या पाठी लागलो असा संशयसुद्धा कोणास उपजू नये याबद्दल आम्ही फार सावधगिरी ठेवित होतो. खडकीच्या बागेत असताना त्या ठिकाणी आणि एक आरनोन्रस नांवाचा मिशनरी खडकी बाजारांत राहतो. त्याची आमची ओळख, त्याच्यापासून आम्ही पंचवीस-तीस केप मागून घेतले. पण दारू कोठे मिळेना, पण इतक्यांत कोथरूडचे बागेत कचरे म्हणून माळी आहे त्याच्या इथे दारू सापडण्याचा संभव आहे, असे सांगितल्यावरून आम्ही तिघे एक रात्री मजेखातर म्हणून गेलो आणि दारू छरे चोरून आणिले.

**रँडसाहेबाच्या जुलुमाची पराकाष्टा व लोकात असंतोष**

रँडसाहेबाचे जुलुमाची पराकाष्ठा झाली. सर्वतोमुखी रँडसाहेबास मारावयाच्या गोष्टी ऐकू येऊ लागल्या. सर्व लोक आपल्यात कोणी स्वधर्माभिमानी मर्द नाही म्हणून खेकसू लागले. गांवात दररोज नवीन जुलमाचे प्रकार होऊ लागले. कित्येक ठिकाणी देवस्थाने भ्रष्ट केली. कित्येक ठिकाणी बायकांच्या अब्रूवर अपहार केला. देव फोडले. गोरगरिबाचे अतोनात या बंडखोरानी नुकसान केले. असा प्रकार चालला असता दररोज खडकीहून पुण्यास येऊन पुन्हा संध्याकाळी परत जात होतो. ऐन उन्हाच्या वेळी खडकीहून पुण्यास जाणे आणि खडकीस येणे हे कृत्य आमच्या वडिलास आवडले नाही. त्यानी आम्हास परोपरीने सांगितले बाळानो हे तुमच्या प्रकृतीस मानवणार नाही. पण आम्हाला हे काम कर्तव्य असल्यामुळे लपून छपून पुण्यास जाणे सोडले नाही. हे वडिलास समजून ते रागवले आणि पुण्यास येऊन राहिले. तसे आम्ही सर्व मंडळींसह खडकीचा बाग सोडून पुण्यास येऊन राहिलो. तापाची साथ शहरांत जोराने चालू होती. पण आम्हाला एक आनंद जाहला की आता प्रयत्न करावयास सुलभ जाहले.

**तापाच्या साथीत भिस्कुटेचा मृत्यू**

इतक्यात आमचा प्रियमित्र भिस्कुटे दत्तात्रय या दुष्ट तापाने आजारी झाला. ज्या दिवशी तो तापाने आजारी झाला त्या दिवशी तो आमच्याकडे येऊन ताप आला म्हणून बोलला पण त्यानीच सांगितले की घाबरू नका. ताप साधा आहे. असे म्हणून तो घरी निघून गेला. तो पुन्हा आम्हास भेटला नाही. त्याची आमची मित्रता आहे असे त्याच्या घरच्या माणसाना ठाऊक नव्हते म्हणून आम्हाला त्यांच्या घरी समाचारास जाता येईना. म्हणून मी धाकटे भावास त्याच्या तपासास पाठविला पण या बंडखोराची भीती ज्याच्या त्याच्या मनांत असलेमुळे कोणीही भिस्कुटे आजारी आहे हेच कबूल करीना. हरहर परमेश्वरा! काय ही आम्हा हिंदू लोकांची पराधीनता कळसास जाऊन पोचली. भिस्कुट्याचा पत्तासुद्धा आम्हास कळेना. या दुष्टाचे पारिपत्य करूनही खबर भिस्कुट्यानी आजारीपणांत ऐकली पाहिजे. असे म्हणून आम्ही फार परिश्रम केले. पण तसा योग न येता भिस्कुटे आमचा त्याग करून परतले. अशी वार्ता मात्र आमच्या कानी येऊन आदळली त्यावेळेस आम्हास परमावधीचे दुःख जाहले. अशा कामी जिवाचा मित्र मिळणे किती कठीण आहे याचा विचार प्रत्येकाने करावा. आमच्या दुर्दैवाने तो आम्हास लाभला नाही. आम्ही गावाबाहेर जाउन वर वर हात करून आकाशाकडे पाहून तोंडाने बोललो की तू आमच्याबरोबर स्वधर्म हिताच्या कामास पुष्कळ झटलास याबद्दल ईश्वर तुला सद्गति देवो. लौकरच चांडाळाची रवानगी यमलोकास करून देतो. तू काळजी करू नकोस. यापेक्षा तुझी आशा फेडण्यास दुसरा मार्ग आम्हास नाही. असे भिस्कुट्यास बोलून देहाच्या क्षणभुंगुरपणविषयी विचार करीत करीत गांवात आलो. मित्राची उडालेली दशा पाहून आम्ही फारच जगाबद्दल निराश झालो. असे वाटे की परमेश्वर आम्हास सुद्धा असेच एखादे दिवशी उचलून नेणार. करिता जे होईल ते होवो. आता रात्रीची संधि न सांपडली तर दिवसा काम करावयाचा पण सोडायचा नाही असा विचार करून भिस्कुटे गेले म्हणून आम्ही किंचितही विचार कमी न करता आमचा उद्योग उलट जारीने चालविला.

**रँडसाहेबास मारण्याचा बेत**

होता होईल तो आपला बचाव करून काम करावयाचे, न सापडल्यास एकाची आहुती झाली तरी हरकत नाही. बंडखोराची टोळी ज्या वाटेस आमच्यापर्यंत येई त्यावाटेस आम्ही सज्ज होऊन बसत होतो. कारण न जाणो या गोऱ्या तोंडानी जर अमर्याद वर्तणूक आपले घरी केली तर एकच प्रायश्चित्त द्यावयाचे असा निश्चय होता. या हलक्या सोजरास मारण्याला भूल नाही. करिता अशा वेळी रँडसाहेब मिटला पाहिजे. करीता आम्हापैकी एक भाऊ रँडसाहेब कुठे उभा आहे हेही पाहून ठेवित होता. कदाचित घरांत कमी जास्त वर्तणूक यांनी दाखविली की त्याला मी टहलकावे आणि बंधूनी रँडसाहेबास अशा तयारीने प्रत्यही तयार रहात होतो. पण सुदैवाची गोष्ट की आमच्या घरी ते आमच्या सांगण्याबाहेर वागत नव्हते. कधीकाळी असेही झाले की आमचा भाऊ अनाडी होता. त्यावर हे बंडखोर आले त्यावेळी आम्ही अगदी सशस्त्र होऊन तयार होतो. मी या शहरांत कोणी स्वाभिमानी आहे, हे या बंडखोरास दाखवावयाचे अशा बेताने होतो. आम्ही आपल्या घरी या बंडखोरासाठी खुबीने वडिलांचे मांडीवर आणि बंधूच्या खोलीत मात्र मोडून जात होतो. बाकीच्या भागांत देवघर, स्वैयंपाकघर बायकांचे घर इतक्या ठिकाणी आम्ही या नरपशूना जाऊ देत नव्हतो. आणि आमच्या घरापाठीमागील बाजूस आमची म्हैस बांधली आहे, ती या गोऱ्या तोंडास पाहून मारायला धावे. तिची भयाण मुद्रा पाहून हे गोरे पाठीमागच्या बाजूस जात नसत. अशी आमच्या घरी म्हैस सुद्धा होती याबद्दल आम्हाला फार अभिमान वाटे. अशा रितीने आम्ही तयार असल्यामुळे ईश्वरास काळजी वहावी लागत असे. आमच्या घरी ते आमच्या सांगण्याप्रमाणे वागत असत. नाही

म्हणण्यास एके दिवशी एक गोरा म्हणाला की तुमच्या घरांत मला गेले पाहिजे. तेव्हा आम्ही उभयतानी सक्रोध मुखाने सांगितले की जाणे होणार नाही. तेव्हा काय त्याला ईश्वराने बुद्धी दिली तो जास्त प्रकार न करिता निघून गेला. बाहेर मात्र जुलुम जाहलेले मी स्वतः पाहिले. आपण पण आमच्या घरी काही एक चीड उत्पन्न होण्यासारखा प्रकार न झाल्यामुळे आम्ही सावकाशपणे या रँडचे काम करीत होतो. साधारण तक्रारी आमच्या त्या गोऱ्या सोजराबरोबर पुष्कळदा जाहल्या पण त्या रस्त्यावर आम्ही हून काढलेल्या कुरापतीवरून झाल्या.

**शिपायाच्या बंदुका पळविल्या**

अशा रितीने ही तापाची आणि जुलुमाची साथ वाढून परमेश्वर इच्छेने कमी कमी होण्यासही लागली. कांही दिवसांनी तपासणी बंद जाहली तरी स्मशानभूमीवरचा गेट मात्र उठू लागला नाही. या प्रत्येक गेटावर दोन दोन शिपाई हत्यारबंद असत. त्यांच्या बंदुका पार करावयाची इच्छा आम्हाला जाहली म्हणून आम्ही सर्व गेट पाहून ठेवली. त्यात आम्हांला लकडी पुलावरचे गेट सोईवार पडले. त्या ठिकाणी मी पुजाऱ्याचा वेष घेऊन चार पाच वेळ गेलो होतो. एके दिवशी बलभिमास नमस्कार करून त्याची आज्ञा मोडून मी त्या घरी घेऊन आलो. दोन बंदुका आणिल्या. आम्हा उभयतास त्या पाहून फारच आनंद झाला. तो किती झाला हे लिहिण्यास आम्ही समर्थ नाहीत. आम्हास इतकी उमेद आली की आम्ही फौजेबरोबर सुद्धा तोंड देऊ. पण आमच्या दुर्दैवाने ते दिवस आम्ही पाहिले नाहीत. पुन्हा दिसावयास संभव नाही. बंदुका आणल्या पण काडतुसे कोठे होती. काडतुसाचा प्रयत्न आम्ही पुढे करणार होतो. बंदुका चोरीस गेल्याची बातमी दुसरे दिवशी गावांत पसरली. त्यांत कवायती शिपायांची आणि त्याच्या शौर्याची लोक तारीफ करू लागले व नेणारेबद्दल आश्चर्य दाखवू लागले सर्व कामात आम्हास या गोष्टीचा फारच आनंद झाला. काडतुसे नसल्यामुळे बंदुका या कामात उपयोगी पडण्याचा बिलकुल संभव नव्हता. म्हणून त्या नीट नेऊन ठेवून दिल्या. तपासणी बंद झाल्यापासून रँडसाहेबाचे येणे जाणे शहरात नियमवार राहिले नाही वाटेल तेव्हा तो येई आणि जाई. त्यामुळे शहरांत काम करण्याचा उपाय खुंटला. मग आम्ही लष्कर हद्दीत क्लब मध्ये जाऊन त्याचा बेटीचा तपास चालविला ती खोली पाहून ठेवली आणि पाहून दररोज संध्याकाळचे वेळी बुधवारी आणि रविवारी तो प्रार्थनेस जाई त्या ठिकाणी एका युरोपियन कान्स्टेबलचा आणि आमचा संवाद झाला होता तेव्हा आम्ही विपर्यास करून क्लबमध्ये गेलो होतो. तेथून आठदहा वेळा जिमखान्यावरही गेलो होतो जिमखान्यावरही एके दिवशी एक युरोपियन कॉन्स्टेबलची आणि आमची झकमक झाली होती. अशीरितीने आम्ही किती प्रयत्न केले याचा साद्यंत वृत्तांत लिहीता विस्तार फार होईल. करिता तांत्रिक माहिती घेऊन मी त्याप्रमाणे आटपते घेतो. प्रयत्नांती परमेश्वर असे म्हणतात ते काही खोटे नाही आमचा एकसारखा प्रयत्न चालू होता. आमचे मुंबईला जाणे अगदी नजीक आले. आता आमच्याकडून हे काम परमेश्वर कसे करून घेणार या विचारांत आम्ही पडलो. परमेश्वराची परोपरीने आम्ही प्रार्थना केली की देवा, हे काम आमच्या हातातून करवून धर्मसेवा तू घेतली पाहिजे. लोकांचे जुलमांविषयी उद्‌गार ऐकले की आम्हास वाटे की हे सर्व लोक नवीन राजास गाऱ्हाणे सांगतात तसे आम्हालाच हे सांगत आहेत. त्यामुळे आम्हास असे वाटे की आपण या लोकांचे ऋणी आहोत. हे जर काम न जाहले तर सर्व लोकांचे ऋण आमच्या बोडक्यात तसेच राहून लोकास तोंड दाखविण्याची आपणास शरम वाटणार आहे. करीता देवा, याची तुला लाज आहे. असे आम्ही वारंवार श्री गजाननाची प्रार्थना करीत होतो.

अनुक्रमणिका

**जुबिलीच्या समारंभाचे वेळी स्तूत्य कृत्य करण्याचा निश्चय**

होता होता जुबलीचा दिवस नजीक येऊन ठेपला. जुबलीचा बडा सण होणार, तो कसा होणार, काय होणार, याविषयी वर्तमानपत्रातून उल्लेख होऊ लागले. तेव्हा आमचा समज झाला की या समयास एकंदर लहानथोर युरोपियन लोक गव्हर्नरचे बंगल्यावर जातील. ती वेळ आल्यास इष्ट आहे असे जाणून आम्ही दोघे तो प्रांत पहाण्यास निघालो. बाजूचे सर्व लहानथोर रस्ते पाहून आम्ही पाऊल ठेविले. सर्व जगाचा विचार करता लकडी पुलाकडून गेले म्हणजे राष्ट्रीय सभामंडप ज्या ठिकाणी पडला होता त्याचे अलिकडे जो पिवळा बंगला आहे त्या बंगल्यापासून पाट गेला आहे त्या पाटावरून गेले म्हणजे गणेशखिंडीतल्या मोठ्या रस्त्यास पिवळ्या बंगल्याकडे मिळावे आणि त्याच ठिकाणी आपले स्तुत्य कृत्य करावे आणि परत जावे असे आम्ही ठरविले. कदाचित पाऊस आल्यास निवाऱ्याची जागा म्हणून आम्ही तेथे आपले बाजूचे रिकामे बंगले पाहून ठेविले. आम्ही ज्यावेळेस पाहणी केली त्यावेळेस पाटावरून जात असता पिवळ्या बंगल्याशेजारी काही युरोपियनाच्या पोरी पाण्यात खेळत होत्या त्याना आम्ही उगीच रागे भरलो. आणि पुढे जगज्ञनीदेवी चतुरसिंगी मातेच्या दर्शनास गेलो त्याठिकाणी तिला विनंतीदाखल एक पद म्हणून प्रार्थना केली.

पद

आई अंबे जगदंबे जोति सत्कर्मी जय दे ॥ रिपुदमर्दनाचा आईभवानी आम्हाला वर दे (आ) आम्ही नाही तुजवाचूनि कोणी जगी आसरा ॥ पुण्य पत्तनी धर्म बुडविला रँडाने सारा ॥ त्या मारा, अविचारा हात आमुच्या, गे अंबे धैर्य शौर्य मज दे ॥ आई अं. ॥ १ ॥

याप्रमाणे तिची स्तुति करून आम्ही घरी परत आलो. घरी आल्यावर आम्ही परमेश्वराची आराधना करावयास आरंभ केला. आम्ही तनमनधन अर्पून गजाननाची प्रार्थना केली. त्या जगदिशास माहित. त्याचे फल गजाननाने आम्हास दिले असे आमचे मत आहे. प्रथमतः हत्यारे कोणती बरोबर घ्यावी याविषयी आम्ही विचार केला. आमचे असे ठरले की, एकेक तरवार आणि एकेक पिस्तुल प्रत्येकाने बाळगावे. माझे बंधु एक कुठार ही बरोबर घ्यावयाचे ठरविले जसा समय प्राप्त होईल तसा ते प्रयोग करण्याचे ठरविले. तरवारी पूर्वीच आम्ही तयार करून ठेविल्या होत्या. हे वाचकास स्मरत असेलच. मजजवळ जो पिस्तुल मी घेण्याचे ठरविले तो बिघडलेला होता. त्याचा एकच बार उपयोगांत येत असे. बापूरावजवळचा एकनळी पण मोठ्या मोळीचा असे. अशी हत्याराची आम्ही गाठबंदी करून वेळेची मार्गप्रतिक्षा करीत बसलो. आम्ही सर्व दिवस ईश्वरचिंतनात घालविला. या कृत्यात यशापयशाचा निश्चय झाल्यामुळे आमचे घरगुती कामात बिलकुल लक्ष नव्हते. हो, एक गोष्ट लिहिण्याची राहिली. जुबलीचा समारंभ ऐटीने करावयाचे सरकारचे मत होते. त्याप्रमाणे गांवात किंबहुना सर्व हिंदुस्थानांत हा जुबलीचा सण राजेराजवाड्यानी सुद्धा मोठ्या जातीने पाळला. वास्तविक पाहिले असता ही वेळ आनंदोत्सव करण्याची नव्हती. मुंबई इलाख्यांत तापाची साथ, कलकत्याकडे धरणीकंप आणि सर्व हिंदुस्थानांत भयंकर दुष्काळ अशी तीन प्रकारचा भयंकर अनिष्ट, गावांत रयत दुःखी असताना ती रयतेची पिडा दूर न करिता दुष्काळांत तेरावा या म्हणीप्रमाणे त्याच्याकडून आपला साठावा वाढदिवस करून घेणे म्हणजे केवढा मोठेपणा होय. हे इंग्लंडच्या राणीवरच शेकणार आहे. राजा आणि प्रजा यांचे नाते पितापुत्राप्रमाणे आमच्या शास्त्रात समजतात. त्या न्यायाने ही आमप्रजेची माता होय. पण हिच्या कृतीवरून हिला प्रजारक्षक माता म्हणण्यापेक्षा मुलाचा फराळ करणारा खवीस कां म्हणू नये. खरी जर थोर मनाची राणी असती तर आता आनंद समयास मुलासारखी आपले प्रजा समजून तिला

माया जास्त वाटून तिचा दुवा घेतला असता, पण तसा प्रकार दृष्टीस पडला नाही म्हणून आम्हास हा उत्सव बिलकुल पसंत पडला नाही. आम्हाला या समयास उच्छाव दाखविण्यापेक्षा निरुत्साह दाखविणे हेच खऱ्या आर्यपुत्राचे कर्तव्य आहे. असे वाटते.

**राणीच्या मूर्तीची रस्त्यांत स्थापना व तीस खेटराची माळ**

उगीच पत्रात अगर आपणा तोंडापुरते बोलून राजभक्ती दाखविणे हे आम्हास बिलकुल आवडत नाही. अशी नेभळी प्रजा प्रस्तुत सर्व हिंदुस्थानांत भरली आहे. इंग्रज सरकारची एकंदर कृती याना पसंत पडत नाही. पण हे अजागळ लोक वर्तमानपत्रांत आणि सभेमध्ये बोलण्यात राजभक्तीची कमाल करून देतात. कोणी कालांतरानी शालजोडीतले जोडे राणीसरकारला मारतात. आणि एकशेचौविसावे कलम लागू केले की माझा ते दिवसाचा असा अर्थ नाही, तसा आहे. अशा वादास उभे रहातात. यापेक्षा प्रत्यक्ष इंग्रजास त्याचे सभेस खेटर मारणे किंवा तिला कलंक लावणे हजारपटीने बरे आहे. खोटे नांवाने आम्ही या कृत्यास प्रवृत्त झालो. हा आठ दिवसाचा उत्सव साजरा करण्यास आमचे लोकाना खुशी नव्हती. तरी सत्तेपुढे शहाणपण नाही या म्हणीप्रमाणे नाखूषीने पण कांहीतरी उत्सव साजरा करीत होते. पण आम्ही हिची आज्ञाधारक प्रजा आहोत असे समजत नाही सबब आम्ही तिचा उत्सव समजून निरुत्साह दर्शविण्याचा विचार केला, आणि या वाढदिवसाचे दिवशी प्रातःकाळी भर बुधवारच्या रस्त्यांत मध्यभागी या आंग्लराणीची मूर्ति योग्यस्थळी विराजित करण्याचा संकल्प केला. आम्ही मुद्दाम पुष्कळ उकिरडे हिंडून मोठ्या प्रयत्नाने जुनी जुनी अतिजीर्ण खेटरे मिळविली. ही खेटरे आम्हास फार मिळाली नाहीत. तरी दहा खेटरे मिळाली. त्या प्रत्येक खेटराचे तळव्यास एकेक राणीची चित्री लावून ती बुधवारच्या राजरस्त्यावर विराजित केली. त्यावर आमचे विद्वान बधु म्हणतील की, तुम्ही प्रत्यक्ष काम कोठे केले. लपूनच की नाही. ही माझ्या मित्रानी यद्यापि आम्ही त्यावेळेस ती कामे लपून केली तरी आम्ही जाणून होतो, आज ना उद्या आम्हाला मैदानांत यावे लागणार आणि मोठ्या अभिमानाने पुढे येऊ. तो आनंदाचा दिवस आज सुदैवाने प्राप्त जाहला याबद्दल गजाननाचे आभार मानतो.

याप्रमाणे सकाळी तो प्रकार करून संध्याकाळ होताच गणेशखिंडीत जाण्यास तयार जाहलो. जातेसमयी आम्ही सर्व घरदार बायकामुले आईबाप इष्टमित्र यांची आशा सोडली. परंतु निघतांना श्रीमंगल मूर्तीस अत्यादरपूर्वक नमन करून आणि तनमन निव्हारी ठेवून वडील-मातुश्रीचे चरणपंकज मनांत आणून सर्व लहानथोर मंडळीचा निरोप मनांत घेतला. फार तर काय, आमच्या अत्यंत प्रीतीतली आमची गरीब म्हैस तिला सुद्धा आम्ही जाताना स्पर्श करून तिच्यासुद्धा सर्व लहानथोर मंडळीस मनात म्हणालो, हे माझे घरांतील प्रिय बांधव हो, तुमच्या सर्वांच्या पुण्याईने आम्हास यश मिळो. असे म्हणून आम्ही बाहेर पडलो. निघताना आम्ही आपले धर्मपुस्तक तेही बरोबर घेतले होते. हा वेळ सुमारे सात किंवा साडेसात वाजण्याची होती. नुकताच दिनकर अस्ताचलास गेला होता. क्षणोक्षणी अंधःकार वृद्धिंगत होत होता आम्ही गावाबाहेर आल्यावर चतुःश्रृंगी भवानीचे मनःपूर्वक पूर्वी म्हटलेले पद म्हटले. थोड्याच वेळांत ठरलेल्या रस्त्याने गणेशखिंडीत पोचलो. पोहोचता क्षणी रँडसाहेबाची गाडी आमच्या दृष्टीस पडली. पण त्या गाडीबद्दल सर्व तऱ्हेने आमची खात्री न झाल्यामुळे आम्ही ती वेळ सोडून जेवायची वेळ कामास कायम केली. समारंभ पाहाण्यास लोकांची गर्दी पुष्कळ झालेली. त्यांत आमचे ब्राह्मण फारच कमी होते. डोंगरावर लावलेल्या लाकडाचा प्रकाश आणि लोकांची गर्दी यामुळे आम्हास तरवारी घेऊन वागणे कठीण पडे. म्हणून आम्ही तरवारी बंगल्याजवळच एक दगडी पूल आहे त्या पुलाखाली त्या दोन तरवारी आणि एक अशा रीतीने ठेवले की प्रसंग आला तर आम्हाला घेता येतील. नंतर आम्ही सडसडीत होऊन हिंडू लागलो. कदाचित कोणी

ओळखीचा भेटेल म्हणून आम्ही रस्त्यांत न हिंडता अंधारात एका शेतात खुशाल ईशचिंतन करीत बसलो. जेव्हा गाड्या शहरांतून येणे संपले आणि परत शहरांत गाड्या जाऊ लागल्या त्यावेळेस मी फाटकापाशी जाऊन उभा राहिलो. आमचे ठरले की मी गाडी पकडून आणावी आणि माझ्या बंधुनी मला पिवळ्या बंगल्यापाशी काम करीत असता मदत करावी. मी गाडीबरोबर धावत येत असतो. खुणेकरिता गोंद्या असा ध्वनि करावा आणि त्या ध्वनिवर बंधूनी समजावे. की गाडी आली आणि त्यानी तयार असावे असा विचार होईन मी फाटकाजवळ गेलो.बऱ्याच गाड्या गेल्यावर पाठीमागून ही गाडी आली. मी पूर्ण तऱ्हेने ओळखली आणि तिच्यापासून १५ पाऊले पायी मागे धावत चाललो. जसा पिवळा बंगला नजीक आला तसा मी गाडीस लगट करून गोंद्या, असा ध्वनी केला. तो करताच माझा प्रिय बंधु मला येऊन मिळाला. मी गाडीचा पाठीमागचा पडदा गुंडी काढून उघडला आणी सुमारे वीतभर लांबून निशाण मारले असावे.

**गणेशखिंडीत रँडसाहेबावर गोळी झाडली**

आमचे प्रथम असे ठरले होते की दोन्ही पिस्तुल रँडसाहेबसच मारावे म्हणजे त्याच्या जीविताची शंका राहणार नाही पण बंधु मागे राहिल्यामुळे माझ्या पिस्तुलाचे निशाण बघून रँड साहेबाची गाडी निघून गेली. पाठीमागचे गाडीत कोणी आम्हाला पाहून कुजबूजत आहे असा संशय बंधूस येऊन त्यांनी गाडी पाठीमागून त्याच्या डोक्याचे निशाण धरून गोळी झाड़ली. आणि आम्ही आलेल्या मार्गाने शीघ्रगतीने निघून गेलो. तरवारी दुसऱ्या दिवशी नेण्याचा आमचा विचार होता. घरी आल्यावर परमेश्वराचे अत्यंत आदरपूर्वक स्तवत केले त्या रात्री आनंदामुळे आम्हास झोप आली नाही. पहाटे स्नानविधी करून फराळ खावा म्हणून वरून ह्याबद्दल काय गडबड आहे ते पहाण्याकरिता आम्ही गेलो. पण कांही हाती लागेना. सुमारे दहा अकरा वाजता गांवांत बातमी पसरत चालली. संध्याकाळला जिकडेतिकडे चर्चा होऊन आनंदही आनंद होऊन गेला. गरीबापासून तो श्रीमंतापावेतो, लहान मुलापासून म्हाताऱ्यापर्यंत सर्वास ज्याअर्थी आनंद वाटला त्याअर्थी आम्हाला किती जाहला असेल याची कल्पना वाचकानीच करावी. लोकास आनंदी बघून आम्हास आनंद. नाहीपेक्षा रँडसाहेबांचे आणि आमचे कांही एक वाकड़े नव्हते. त्यानी जर आमचे धर्मात हात घालण्याकडे दुर्लक्ष केले असते सोजीर कायदेशीर वागतात की नाही, हे जर पाहून वागता तर आम्हाला असे करण्याचे काम पडले नसते.

**रँडसाहेबाचे गुण**

रँडसाहेबाचे पाठीमागे आम्ही सरासरी तीन साडेतीन महिने संचार केला. तितक्या सहवासांत आमचे मन त्याचे विसी फारच उत्तम होते. नव्हे आम्ही मानी आहोत तसाच रँड साहेबही मानी होता. रँडसाहेबास कोणतेही व्यसन नसावे असे आमचे मत आहे. त्याचे ठिकाणी बालंटपणा बिलकुल नव्हता. जिमखान्यात तो लँटेनीस खेळत असता आम्ही पाहिला. तो कधीही लेडीबरोबर खेळत नसे. यावरून परस्त्रीचा त्याला तिटकारा होता. इत्यादी बरेच गुण त्याचे आमचे लक्षांत आले. पण उपयोग काय? तो आमचा धर्मशत्रू बनला. त्यामुळे त्याचा सूड घेणे आम्हाला जरूर पडले. त्याला इलाज नाही.

**हत्यारे लपविली**

त्यानंतर मोठी गडबड उडाली व याबद्दल गावांतही अनंत गप्पा जाहल्या. कोणी म्हणे घराची तपासणी करून हत्याराचा झाडा घेणार. तेव्हा आमचा विचार जाहला की आपणास मुंबईस जाणे आहे तेव्हा येथे हत्यारे टाकून जाणे इष्ट नाही असा विचार करून आम्ही ती सर्व हत्यारे एके ठिकाणी मजबूत बांधून ती लोटे यांचे घरी विहिरीत बुडविली व पुलाखाली राहिलेल्या तरवारी पोलीसांनी फरासखान्यांत नेल्या होत्या असे आम्हास कळले. तेव्हा तिकडे आम्ही गेलो नाही. पण जाऊन तिची खणानारळाने ओटी भरली आणि तिचा निरोप घेऊन दुसऱ्या जगदंबेच्या दर्शनास दिवशी आम्ही सर्व कुटुंब मंडळीसह दुपारी १॥ दिडाचे गाडीस मुंबईस जावयास निघालो. वाटेत स्टेशनावर जाताना आम्ही मुंबई पोलिसची मंडळी गाड्यातून भेटली त्याना पाहून आम्ही ताबडतोब ओळखले अशा वेळी आमचे रहाणे येथे असावे असे आमचे मत होते. पण नाही. तेही बरे जाहले. काल इथे असतो तर काही कमी जास्त करावयाची इच्छा व्हावयाची. असे एकदां बरे वाटे. एकदा वाईट वाटे.

**मुसलमानाना दोषी ठरविण्यासाठी प्रयत्न**

या प्रकारे आम्ही मुंबईस आलो. त्यांनी तर या कृत्यामुळे किती त्रास या इंग्रजास आणि या रयतेस पडला याचा एक मोठा ग्रंथच होईल. करीता त्याचे वर्णन करणे मात्र इष्ट वाटत नाही. याचा सर्व रोख ब्राम्हणजातीवर होता तो निघून मुसलमानावर जावा म्हणून आम्ही एक युक्ती योजिली. ती अशी की, एक काझी नावचे पत्र पाठवावे पण ते मुसलमानीमध्ये पाठवावे हे चांगले. पण ती भाषा जाणणारे आमच्यात कोणीही आढळेना. म्हणून इंग्रजीत पत्र पाठविले असता चालेल असा विचार करून मागे जसे राणीच्या पुतळ्याच्या वेळी आम्ही सूर्योदयाचे एडीटराकडून पत्र पाठविले तसेच आताही मुंबईचे नावे एडीटरास लिहून त्यास असे कळविले की तुम्ही माझ्या वतीने इंग्रजीत पत्र पाठवा की हे काम आम्ही केले आहे त्याची नकल पोलीसात असेल ते या पत्रात छापावे असे माझे मत आहे.

असे पत्र आम्ही पाठविले पण यापासून फायदा न होता उलट तोटाच झाला. या पत्रावरून ब्रुईनसाहेबांनी ताडले की राणीचा पुतळा, वेलणकर, ही कामे ज्यांनी केली त्यांनीच हे काम केले असावे असा अंदाज त्यांनी करून त्याप्रमाणे शोध चालविला हे आम्हास कळले. पण झाली चूक सुधारता येईना. वेलणकराचे कामी आमची मोठी चूक जाहली होती. तो आम्हाला ओळखीत होता ते मोठे साधन यांना कळून याविषयी पोलीसाना संशय येई त्याला हे वेलणकराकडे घेऊनजाऊन खात्री करून घेत असा क्रम चालला.

**खून केल्याची कबूली**

आम्ही सावधगिरीने मुंबईस तीन महिने घालविले. इतक्यांत एके दिवशी एकाएकी पोलिसचे साधे बोलावणे आले ते गोपाळराव साठ्यासंबंधी होते. त्याच्या बोलावण्याप्रमाणे मी निघालो. त्यानी मला पुण्यास आणिले आणि ब्रुईनसाहेबाजवळ नेले. त्या ठिकाणी मी लोकहिताचा विचार करून कांही विशेष अटीवर पोलीस, पो. सु. ब्रुईन याजजवळ मी खुनाची कबूली करून त्यासंबंधी सर्व बारीक सारिक हकिगत मी मोठ्या अभिमानानी यशाकरिता सांगितले. त्याची खात्री पटण्याकरिता दुसऱ्या पुष्कळ बारीकसारीक गोष्टी मीहून कळविल्या. इतकेच नव्हे तर ते पुराव्यानिशी सिद्ध करून दिले. राणीचे तोंड काळे करण्याबद्दल

वागळे यांचे जोडे असल्याबद्दल खात्री करून दिली. वेलणकरांबद्दल त्यांची समक्ष रुजवात करून दिली. मुंबईस ह्या मिल्टन साहेबापुढे जबानी दिली. त्यावर मी सही केली. प्रथमतः हे कृत्य मी एकट्यानेच केले असे मी पोलिसास कळविले पण ते माझे बोलणे हत्याऱ्याच्या गळ्यांत पागोटे आणि नाडी निघाल्यामुळे परत घेणे भाग पडले. दुसरा कोणीतरी यात असावा असा मंडळीचा ग्रह झाला. करिता मी भावाचे नांव सांगून त्यालाही या यशाचे वाटेकरी केले. या कृत्यांत सर्व पुरावा मीच दिला. यानंतर पोलिस सु. केनेडी व पोलीस सु. ब्रुईन या उभय साहेबांची माझी बोलाचाली झाल्यावरून मी फार दिवसापासूनचा माझ्या अंगी खिळलेला इंग्रजाविषयी द्वेष विसरून गेलो. त्यानी माझ्या विषयीचा सत्यपणा अद्यापपर्यंत दाखविला. असाच तो पुढेही परिणामपर दाखवेल असे मी परमेश्वराजवळ मागतो.

मुंबईहून पोलिसांनी पुण्यास कसे आणले तेव्हापासूनची सदयंत हकीगत पुढील भागी विस्ताराने येईल हे रँडनिधनवृत्त पुरे केले.

# परिशिष्ट क्र. १

## चापेकरबंधु रचित पदे

(१) पद (रमाकरी मम मनी क्रीडा)

सुखा आधी दुःख भोगावे-लोक जैसे जाणुनी सुजने-देशहिताते लागावे ॥ धृ ॥ क्लेश सोसुनी तप आचरती सोडुनीया सदना मदना प्रभु नामधना रसना सेवी सुख भोगाते टाकुनी सेवटी स्वर्गसुखाते मुनी पावे ॥ सु ॥ १ ॥ शिवाजी राजा होऊनी गेला. ज्यात जनी अभिमान मनी सकला सधनी गुणी शूर असा भोगियले बहु क्लेश आधी मग राज्यसुधा आणि यश पावे सुखा ॥ २ ॥ आर्यबंधुनो देशहितास्तव नित्य झटा-करी घेई पटा तरवार वीटा जरी सैन्य कटा-स्वधर्म कर्ती निधन पाउनी भूमीयश मिळवूनी मोजावे ॥ सु ॥

(३) पद

नका नका भोगू तुम्ही परवशता आंग्लों जनाच्या खाता लाथा नाही तयाची लाज-पाव भिस्कुटे खाऊनी पिवूनी बनला दारुबाज ॥ नका ॥ शिवाजी बाजी होऊनी गेले गाजविली तलवार वंशज त्यांचे असोनी तुम्ही बनला सगळे नार ॥ नका ॥ २ ॥ राव सदाशिव भाऊ पेशवे छातीचे सरदार दिल्ही अटकेवर तो त्याने विक्रम केला फार ॥ नका ॥ ३ ॥ जीवित्वाचा काय भरवंसा तृण ऐसे माना धन्य व्हा जगी देशहितास्तवदेऊन माना ॥ नका ॥ ४ ॥

(३) श्लोक (शिवाजीचे उच्छावांत म्हटलेले)

असे मूर्ख हो मर्द झाला कशाला-मिशा मोठ्या मोठ्या धराव्या कशाला, निर्लज्या तुम्हा भोगिता दास्य हाय-करा हो तरी जीव जाय. उपाय ॥ १ ॥ अरे मारतो वासरे आणि गाई-महादुष्ट चांडाल जैसे कसाई-हराक्लेश तिचे मरा-आंग्ल मारा, रिकामे नका राहु भुमीभारा ॥ २ ॥ हिंदुस्थान असे जनांत म्हणतो लोकास या सर्वही आंग्ल कसे स्वराज्य करिता जाणा महालाज ही - नांवाला विसरू नका दृढ धरा देशभिमाना मनी ठोका दंड उठा भीड सुयशया दुष्टाचिया कंदनी

(४) श्लोक-टिळक, प्रो. जिनसोवाले प्रो. भानु यांचे सभेत म्हटलेले (बाळकृष्ण कृत.)

वाक्शौर्याद्भव उच्च वृक्ष सुपत्ता नाही कधी ऐकिले, स्वप्नी स्त्रीमुख चुंबनी नच कधी संतान ही जाहले-बोलावे परी दृष्टीहीनधनसे गर्जनकर सो असे रंडा नीति पराक्रमाविण जनी होते तियेचे हसे ॥ १ ॥ नाही होत स्वतंत्रता शिवकथा घोटोनी भाटापरी घ्यावे लागतसे शिवाजी बाजी परिही मस्तक स्वहस्तावरी हे जाणोनी तरी आता सुजन हो। घ्या खड्ग ढाला हाती मारा थाप भुजावरी अरीशिरे तोडू असे ख्यात ती ॥ ३ ॥

(५) श्लोक (प्रतिज्ञा)

ऐका राष्ट्रीय युद्ध भूमीवरी त्या प्राणास देवु धका- जे जे मानस बोललो बहुजनी तो फार्स मानु नका-धर्मध्वंशकशत्रुवक्षरुधिरा पाडूच भूमीवरी मारुनिच मरू आम्ही तुम्ही स्वये ऐकाल रांडापरी ॥ १ ॥

अनुक्रमणिका

# परिशिष्ट क्र. २

## वडिलांना लिहिलेले पत्र

श्री गजानन प्रसन्न                                   ता. १२-१०-९७

वडील मातोश्री याचे चरणी दामोदराचे कृतानेक शिरसाष्टांत नमस्कार विज्ञापना विशेष.

ईश इच्छेने प्राप्त जाहलेल्या स्थितीत मी आनंदात आहे त्यांतून वडील मातुश्रीचे कृपेकरून याठिकाणी माझे मित्र ब्रुईन व केनेडी यांनी जी माझी उत्तम व्यवस्था ठेविली आहे ती पाहून मी अगदी शत्रूभाव विसरून गेलो आहे. अर्थात मला राजकीय कैदी समजून खायला, प्यायला, ल्यायला या तीन गोष्टींत कोणत्याही प्रकारची आडकाठी नाही. वाटेल त्याला भेटावयाची परवानगी आहे. दुपारी बाहेर फिरावयास जातो. त्यावेळी आप्तइष्ट मित्रास भेटतो. माझा देवधर्म सोवळेओवळे ही उत्तम प्रकारे पाळली जातात. तेणेकरून मला कोणत्या प्रकारचे दुःख वाटत नाही. आता आपला उभयता वडील मातुश्रीचा वियोग जाहला खरा पण त्यास उपाय नाही. आजपर्यंत आपण उभयतानी आम्हास पुष्कळ प्रकारे करून बोध केला. परंतु आम्हास रुचला नाही. व अजूनही आम्ही केले हे वाईट केले असे आम्हास वाटत नाही. इतकेच नाही तर पुढे फासावर जातानासुद्धा वाईट वाटणार नाही याविषयी आम्ही पदर पसरून माफी मागतो. आम्ही ज्यावेळी भयंकर कृत्यास हात घालीत होतो. त्यावेळी ही पुढील भावी स्थिती मनात येत असे नाही. पण त्याची पर्वा करीत नव्हतो व आताही आम्ही करीत नाही. लग्न समारंभात निघालेल्या मिरवणुकीपेक्षा आम्ही या अंतकालच्या मिरवणुकीस जास्त महत्त्व देतो. यावरून आमचा कल वडिलांच्या ध्यानात येईलच. यापूर्वी अनेक कारणामुळे वडिलास खुलास कळविणे झाले नाही. म्हणून याठिकाणी जरा जास्त लिहिले आहे. याबद्दल खात्री असावी. परवा मी मुंबईस ज्यावेळी आलो त्यावेळी माझा विचार नव्हता की आपली भेट घ्यावी. कारण यावेळेस जितका निकट संबंध ठेवावा तितका तुमचा प्रेमवृद्धिंगत व्हावयाचा संभव आहे असे समजून भेट घेण्यास तयार नव्हतो. पण ब्रुईनसाहेब यांच्या अत्याग्रहावर मी त्यांना सांगितले की त्यांना पोलिस चौकीत न आणता वागळे यांचे घरी आणावे आणि त्या ठिकाणी भेटू त्याप्रमाणे त्यांनी तो योग जुळवून आणिला. त्या भेटीत मजकडून अमर्यादा जाहल्याचा आपल्यास भास जाहला असेल असे आता मला वाटते. म्हणोन हे पत्र पाठवून कळवितो की मी तेथे आल्यावर सर्व प्रकार पाहिला. येताक्षणीच गंगीने अण्णा म्हणून वारंवार मारलेल्या हाकाही ऐकिल्या. मी वडिलांचा सद्गदित झालेला चेहराही पाहिला. मी मातोश्रीची माझ्या विरहाने अशक्त झालेली मूर्तीही पाहिली. तसेच इतर सर्व लहानथोर मंडळीचे मजकरिता रडवे व केविलवाणे चेहरे पाहिले.

पण तो समय मोहजालांत पाडण्याचा असल्यामुळे मी तिकडे मोठ्या कष्टाने दुर्लक्ष केले. आता उभयतांनी चिरंजीव वासुदेवाकडे पाहून दिवस आनंदात न्यावे. चिरंजीव बाळकृष्णाने मोठा अविचार केला. वासुदेवाचे लहान वन मनांत न आणिता त्याचा उगाच घेऊन गेला. याविषयी मला फार दुःख होते परमेश्वर त्याला सद्बुद्धि देवो आणि वासुदेवास घरी येऊन तो माझ्या दुःखाचा वाटेकरी होण्यास मला भेटावयास येवो. म्हणजे आम्हाला तुमची काळजी उरणार नाही. मी रँड साहेबाचे मारण्याचे स्तुत्य कृत्य आम्ही दोघानी केल्याचे साफ, कबूल केले आहे. तेव्हा देशोदेश भटकून त्यास ही खरी हकिगत जर ज्यास समजेल तर खात्रीने तो मला येऊन भेटेल. आम्ही आपल्या पोटी जन्म घेऊन आपल्या किंचितही उपयोगी पडलो नाही. उलट क्लेश मात्र दिले. याविषयी आम्ही उभय बंधु तुमची क्षणोक्षणी माफी मागतो. प्रस्तुत आम्हाला या

अनुक्रमणिका

जगांत एक परमेश्वर किंवा आपण वडील मातुश्री याखेरीज कोणालाही ओळखत नाही. साम्राजलक्ष्मीस लाविलेला अक्षई डाग या गोष्टीची चांगली साक्ष देत आहे. सरतेशेवटी मी सर्व श्रोते मंडळीची प्रार्थना करतो, आम्ही तर पोटी जन्म घेऊनही वडिलांस सौख्य दिले नाही. तुम्ही मात्र वारंवार समाजात वडील मातुश्रीचा सांभाळ आजपर्यंत करीत आला तशीच सद्बुद्धी परमेश्वर तुम्हास पुढे देवो. असीही आम्ही परमेश्वराजवळ प्रार्थना करीतो. राहिल्या मंडळीस आमचे विचारणे कळवावे. ती मातुश्री आदीकरून मंडळीचे शांतवन सर्व विवेककरून करण्यास वडील समर्थ आहेत. आता एकदा भेटलो काय आणि पुष्कळदा भेटलो काय शोकास कारण होणार आहे. म्हणून मी कोणालाही पुण्यास येण्याची तकलीप देत नाही. मात्र विश्वनाथ लक्ष्मण पतंगे यांस पाठविण्याची योजना व्हावी म्हणजे मला कांही खासगी गोष्टीत त्यांचा सल्ला घेणे आहे. ती इच्छा पूर्ण होईल. अखेर परमेश्वराजवळ मी एवढेच मागतो की जन्मोजन्मी असे मातापितर, बंधु-भगिनी आदिकरण मंडळीची अशीच जोड मिळून आमचा स्वधर्माचे ठिकाणी असलेली भक्तीही अशीच राहून वडिलांच्या पुण्यप्रतापाने उत्तरोत्तर चढत्या प्रमाणावर असो. ती. नानास फार फार नमस्कार कळवून समयी जाहलेल्या उपराधीची क्षमा कर म्हणावे याहून जास्त काय लिहू.

परमेश्वर आम्हास इष्टगती देवो.

माझी स्तोत्रपाठाची पोथी साहेबाबरोबर पाठवून देणे.

आपला- दामोदर हरि चापेकर

अनुक्रमणिका

# परिशिष्ट क्र. ३

## नातेवाईक मंडळी

पुणे-१ आजी कासीबाई-विध्वंस याची मुलगी-त्या विध्वंसाचे ठिकाण पुणे, बुधवार पेठ, हुजूर पागेसमोर.

इंदूरकडे-२ चुलता-रामचंद्र विनायक चापेकर हाली इंदूरकडे राजपुताना माळवा रेल्वेकडे कुडस्टेशनवर तारमास्तर आहे. परंतु हाली तेथे आहेत किंवा नाही ती माहिती नाही. उमर ४०.

इंदूरकडे -३ बापाची बहीण-गोदावरीबाई इंदूरनजीक हातोळे गावी भाऊसाहेब कापसे सावकार यांचे चिरंजीव बलवंतराव हाली मयत याजला दिल्हेली आहे. उमर ४५.

इंदूरकडे-४ चुलता-भरत विनायक चापेकर हाली ब्रह्मचारी होऊन इंदूरकडेस मंडाळेश्वर येथे आहेत.

इंदूककडे-५ बापाची बहीण-सखूबाई इंदूर येथें कृष्णपुऱ्याचे मारुतीनजीक सुबरावजीचे पिछाडीस नारायणराव साने याजला दिलेली होती ती हाली मयत उमर २५.

पुणे-६ दुसरी आजी-विनायक रानडे याची मुलगी ठिकाण जोगेश्वरी बोळ पुणे

चिंचवड-७ सावत्र चुलता-गणेश विनायक चापेकर उमर ४८ धंदा वैद्यकीचा रहाणार चिंचवड ता.खेड,जि. पुणे.

चिंचवड-८ सावत्र चुलता :- गोविंद विनायक चापेकर उमर ३५ रहाणार चिंचवड हाली मयत.

चिंचवड-९ सावत्र चुलता :- विष्णु विनायक चापेकर उमर वर्षे ४० रहाणार चिंचवड धंदा नाटकामध्ये मृदंग वगैरे वाजविण्याचा.

नासिक-१० सावत्र चुलता :- लक्ष्मण विनायक चापेकर उमर ३५ धंदा गवई हाली वस्ती नासिक.

उमरावती-११ बापाची सावत्र बहीण : आंबुताई ही उमरावतीस भिडे वकील यास दिल्हेली होती. हाली दोन्ही उभयता मयत.

सोलापूर-१२ बापाची सावत्र बहीण :- वेणुताई सोलापूर येथे कामेरकर यास दिल्हेली होती ती हाली मयत.

पुणे-१३ आई दामोदर याची नांव द्वारकाबाई रामभाऊ लोंढे ठिकाण सदाशिव पेठ, यांची मुलगी.

अनुक्रमणिका

पुणे-१४ बहीण येसूबाई उमर वर्षे १४ ही विष्णू सदाशिव परांजपे यांचा पुतण्या भिकाजीपंत यास दिल्ही आहे. भिकाजीपंताचा रहाण्याचा गांव आडिवरे तालुका राजापूर जि.रत्नागिरी. हाली रहाणार पुणे भोलाईची खाण हा भावे स्कूलात शिकत आहे.

पुणे-१५ बहीण मथूताई उमर वर्षे २ ही नारायण गोविंद काळे ठिकाण रविवार पेठ, गुळव्याचे वाड्यांत रहातो व नथू स्कूलमध्ये इंग्रजी शिकतो.

पुणे-१६ दामोदरची बायको दुर्गाबाई ही केळकर रहाणार पिंपरीस मेंढऱ्याचे तळेगांव नजीक हाली रहाणार पुणे डोळकर आडपत्र्या मारुतीचे समोर.

पुणे-१७ बाळकृष्ण याची बायको यमुनाबाई साठे यांची मुलगी साठे याची बायको याजपाशी रहात नसोन सदाशिव पेठेत कासिनाथ गोविंद नातू वकील यांचे घरापलिकडे आबाटे यांचेघरी रहाते व साठे सासरा भटकत असतो.

पुणे-१८ वासुदेव याची बायको सिताबाई बाबूसेठ रावभट ठिकाण शुक्रवार पेठ, बदामी हौदावजवळ फॉरेस्ट आगर मोजणी खात्यांत नोकर आहे त्याची मुलगी.

अनुक्रमणिका

# परिशिष्ट क्र. ४

## स्वतः जमविलेल्या हत्यारांचा तपशील

| | |
|---|---|
| १ | बीड- हैदराबादकडील येथून एक गुपती किंमत रुपये ५ ची सहासात वर्षावर आणिली. |
| १ | रिवालवर-पाच बारी एक हे बीड येथे दुकानावरून चोरून आणिली सदरी गुपती घेतली तेच दुकान सहा-सात वर्षावर |
| १ | गुप्ती मोठी किंमत रुपये १५ ही नागपूर येथील दुकानाहून विकत आणिली चारपाच वर्षावर |
| ३ | पिस्तुले पैकी दोन नळ्याचे एक व नळीचे मोठे एक व लहान एक पैकी दोन भिस्कुटे दत्तात्रय हाली मयत याणे आणिली व एक लक्षांत नाही. |
| १ | नळी एक पिस्तोलची भिडे वकील ग्वाल्हेरचे यांचे वाड्याहून महादेव विनायक रानडे भिडे दामोदर ठिकाण जोगेश्वरीचा बोळ यानी चोरून आणिली. |
| ४ | तरवारी चार चांदीचे मुठीच्या नकशीच्या |
| २ | तरवारी दोन सोन्याचे मुठीच्या नकशीच्या |
| १ | सुरा एक-भिडे वकील ग्वाल्हेरचे ठिकाण जोगेश्वरीचा बोळ यांचे वाड्याहून महादेव विनायक रानडे व दामोदर बलवंत भिडे याणी चोरून आणिली त्यास वर्षे ६/७ |
| ३ | बंदुकी एक नळीच्या |
| ३ | कवच तीन छातीचे संरक्षण करण्याचे व त्याचे मुलाम्याचे |
| १ | खेळावयास पाट्याचा दस्ता सोनेरी मुलाम्याची |
| २ | गुप्त्या दोन दामोदर बलवंतराव भिडे याणे आणिल्या तीन वर्षे जाहली |
| १ | जंबिया एक |
| ३ | तिरकामटे तीन-पाचोरा येथून आणिले २ वर्षापूर्वी |
| ३ | तीर तीन-धार येथून आणून दिले वर्षावर २॥ |

अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| २ | दोन तरवारी मेणासहित | } | खासगीवाले नानासो व बापू यांचे वाड्याहून |
| २ | दोन ढाली | | दामोदर भिडे याणी व आम्ही चोरून काढिली |
| १ | कुऱ्हाडे | | २ वर्षावर |

२ बंदुकी दोन व बँगनोट एक इंग्रजी लकडी पुलानजीक मारुत्तीचे देवळाहून स्वतः मी दामोदर याणी चोरून आणिल्या. शिपाई लोकाच्या

१ भाल्याचे फाळ एक दामोदर बलवंत भिडे याने पाचोरा येथून आणिला

१ भाल्याचा फाळ एक आठवत नाही

-----

४०

पंडिता रमाबाई इजकडे हत्यारे गेली ती

१ तरवार एक चांगली हिऱ्यामाणकाची धार येथून पुराणिकाचे नजीक एक सरदार रहात असे त्याचे येथील चोरून आणिली.

१ कराबिन एक

१ तिरकमटा एक

१८ तीर आठरा

-----

२१

-----

६१

**मुलांना नेमबाजीचे शिक्षण**

येणेप्रमाणे ६१ हत्यारे जमा केली व पोर सुमारे १५ तालमीत होते व ती तालीम बुधवार पेठेत जोगेश्वरी बोळामध्ये खासगीवाले यांचे वाड्यांत २ वर्षापूर्वी होती तीन महिने चालली होती.

| | | |
|---|---|---|
| १ | त्यांची नावे | उमर |
| २ | दामोदर बलवंत भिडे | २५ |
| ३ | शंकर रामचंद्र निचुरे | १६ |
| ४ | विनायक काशिनाथ खासगीवाले | ८ |
| ५ | महादेव विनायक रानडे | २० |
| ६ | केशव काशीनाथ अगाशे | २० |
| ७ | सदाशिब वामन भट | २१ |
| ८ | नीळकंठ द्रवीड | १९ |
| ९ | घाणेकर | २० |
| १० | अभ्यंकर | १६ |
| ११ | सध्यस्तक | १५ |
| १ | दत्तात्रय भिस्कुटे मयत उमर | २१ |

याचेपूर्वी सुमारे एक महिना सुमारे १०० मुलगे माझ्या घरावर गोफणी खेळण्यास येण्यास तयार जाहले. त्यास सांगितले की बाजारातून लहान बैलाच्या जुपण्या विकत आणा त्याच्या आपण गोफणी करून परवतीचे बाजूस टेकडीवर निशाण्यास मारण्यासाठी सिकण्यास जाऊन त्यापैकी त्यानी आणून तयार केल्यावर मी त्याजबद्दल नियम व कायदा लिहिला तो येणेप्रमाणे संध्याकाळी ५ वाजतां नेमलेल्या ठिकाणी सर्वानी यावे व तेथे जमल्यावर दोन टोळ्या करून एक बाजूस मी व एक बाजूस माझा भाऊ बाळकृष्ण असे होऊन दोन बाजूस दोन दोन निशाणे ठेविली होती त्यापैकी एक निशाण भगवे म्हणजे जिंकल्याबद्दलचे व दुसरे लाल निशाण कोणास दगड लागून जखम जाहल्यास गोफणी मारण्याचे बंद करण्यासाठी दाखविण्याचे हे काम सुमारे दीड महिना चालून बंद जाहले. कारण साठ्यांचा मुलगा याजला दगड लागला व त्याने पोलिसास खबर दिल्यावरून व ज्ञानप्रकाश व डेकनपत्र यामध्ये प्रसिद्ध केल्यावरून बंद केले व मुलगे जिकडे तिकडे गेले.

**गोफण्या मारुतीची स्थापना**

**दामले मेहुणपुऱ्यातील “मारुती” दामोदर भिडे याणी चोरून आणिला व त्याची स्थापना परवतीचे नजीक टेकडीवर केली. त्याचे नांव गोफण्यामारुती ठेवले.**

अनुक्रमणिका

# परिशिष्ट क्र. ५

## दामोदर, बाळकृष्ण व वासुदेव यांचे वर्णन

| | |
|---|---|
| नंबर १<br>दामोदर उर्फ अण्णा चापेकर उमर वर्ष ६७ उंची ५ फूट ५ इंच, अंगाने सडपातळ रंग गोरा, तोंड लांबट, मान लांबट, पायाचा पंजा रुंद, कानांत एक एक रुद्राक्ष, डोळे घारे, डोकीस सेंडी लहान, डोकीवर जखमा जाहल्याचे डाग आहे. उपरणे रेशमी किनारी, ब्राह्मणी जोडा मराठी लिहिणे येते इंग्रजी साधारण येते | नं. २<br>बालकृष्ण उर्फ बापू चापेकर उमर वर्ष २४ अंगाने जाड उंची ५ फूट ४ इंच सेंडाचे बाजूस थोडा घेरा राखलेला आहे. अंगात सफेद अंगरखा, डोकीस तांबडे पागोटे, कानात रुद्राक्ष दोन आहेत. मिशा लहान काळ्या-तोंड वाटोळे पायांत ब्राह्मणी जोडा-जात कोकणी ब्राह्मण चांगले लिहिता वाचता येते,चाल साधी रंग गोरा-नाक सरळ, डोळे घारे-अंगावर करवत काठी उपरणे, नेसणेस मांजरपाटी धोतर. |
| नं. ३<br>वासुदेव उर्फ नाना हरि चापेकर उमर वर्षे १७/१८, रंग गोरा, अंगाने सडपातळ, उंची ५ फूट ३ इंच, तोंड लांबट, नाक लांबट, डोळे घारे, मिशा आलेल्या नाहीत. सेंडी लहान बाजूस घेरा आहे. डोकीस काश्मिरी टोपी-अंगात सफेद अंगरखा, अंगावर करवतकाठी उपरणे, नेसणेस मांजरपाटी धोतर, पायात ब्राह्मणी जोडा, मरा लिहिणे चांगले येते. | |

अनुक्रमणिका

# परिशिष्ट ६

## ब्रुईन साहेबास लिहिलेले पत्र

श्री

मित्रवर्य ब्रुईण साहेब यांस कृतानेक आशीर्वाद

पासून आम्ही या ठिकाणी प्रकृतीने ठीक आहोत. आपण..................सांगून केलात की मी..........माऊलीस भेटून फार आनंद झाला होता. पण आज ती-वडिलाचे पत्र ............माझे वडिलास त्रास होत असल्याचे वांचून फार वाईट वाटले................हे काम नाही. हे लक्षांत आणून आपण............जाऊन त्यांचा समाचार घेऊन त्यांना जो त्रास होत होता......... केशव..........तर तुमची माझी मित्रता राहणे इष्ट आ..........येऊन भेटाल अशी मी इच्छा करितो. इकडील सुभेदार मंडळी खुशीत आहेत का जास्त लिहित नाही.

ता/ब्रुईण सो/ यास आपण ये..................करून तुम्ही इकडे आल्यावर जरा ...................कडे वर्दी द्यावी. तेहि त्यास कळवून.................त्यांच्या सोधा ............(फाटले आहे).

हे पाहताच माझा भाऊ बापूराव मला येऊन भेटेल आपण मसलत केल्याप्रमाणे मी सर्व हकिगत जाहीर करून दिली व माझी इच्छा अशी आहे की सरकारास त्रास न देता आपण आपला मोठेपणा हजर होऊन दाखववावा. तुम्ही मजला येथे येऊन भेटावे. मी खुशीत आहे. म्हणजे मला कोणत्याही प्रकारची तसदी नाही. परमेश्वराची लीला अगाध आहे. जसे आपण दोघेजण हरएक कामात सोबत होतो तसे आताही आपण एकेठिकाणी असावे. जसे मी गोंद्या म्हणून ध्वनी करताच तुम्ही मला मदत केली तसे आता भय न ठेविता माझे सोबतीस येऊन शेवटपावेतो सोबत असावे. आपला कनिष्ठ बंधु वासुनाना हा वडील मातोश्रीचे सेवेत आपल्या पाठीमागे राहो असे माझे मत आहे. तो तुमचे संगतीने दोषी होण्याचा संभव आहे. करिता त्याला घरी पाठवून आपण माझ्या यशरुपधनाचे वाटेकीर व्हा. चि. वासुननाने अद्याप जगाचा अनुभव घेतला नाही. ति. मातोश्री त्याकडे पाहून दिवस नेतील याचा विचार करा हे आशीर्वाद.

आपला
**अण्णा**

अनुक्रमणिका

# परिशिष्ट क्र. ७

२९-१०-९७

## मातोश्रीस पत्र

(फाटले आहे) मातुश्रीचे चरणी दामोदरचे कृतानेक शिरसाष्टांग नमस्कार विनंती विशेष आपले आसिरवाद पावले आपणास पोलिसाकडून त्रास होतो. हे वाचून वाईट वाटते. आपण तर माझे जन्मदाते आहांत पण त्यांचा माझा कोणताही अल्पंसंबध नाही. केवळ स्वजातीय समजून त्यांना आलेला (फाटले आहे) ज्या दामोदरास कीव येऊन लोकहिताकरिता जिवाची पर्वा न करिता (फाटले आहे) कसा पोलिसास मारुन दिल्हा. ज्याने आपल्या भावाचे नांव सांगितले तो अधम (फाटले आहे) सांगणार नाही काय हे बुर्दनसाहेबास कळणे जरूर होते. हल्ली ब्रुर्दूण साहेब मुंबईस आहेत. त्यांना मी पत्र निराळे पाठविले आहे. त्यांत आपणास त्रास न देण्याबाबत मी लिहून कळविले. त्याप्रमाणे व्यवथा केली आहे की नाही ते मला पत्राने त्वरीत कळवावे मी वाट पहात आहे. याहून जास्त तजवीज करण्यास मी प्रस्तुत असमर्थ आहे. माझ्या बोलण्याचा मान ब्रुईनसाहेब ठेविल अशी मला खात्री आहे. आपणाकडे कोणी पोलीस आल्यास आपण सांगावे की आम्हास शोध मिळाल्यास आम्ही ब्रुर्दनसाहेबास कळवू, वारंवार येण्याचे कारण नाही. मला जितका शोध लागेल तो मी देतो. ईश्वर करून लवकरच बालकृष्णास ही हकीकत समजून तोडून येईल अशी माझी खात्री आहे. तो मरणास भिणारा मनुष्य नव्हे. पोशी तिथेच असावी. (फाटले आहे) तरी पाठवावी विश्वनाथपंत बरे होईल (फाटले आहे) तर बरे होईल. याहून जास्त लिहित नाही. सर्वास (फाटले आहे).

अनुक्रमणिका